
# तुमचें स्थान कोणतें ?



म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 1909



REFBK-0009455

श्री. वा. काळे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

अनुक्रम ........२२५५८ वि ........

क्रमांक ........११०१.. नों: दि: ..............

30/11/56

# तुमचें स्थान कोणतें ?

# तुमचें स्थान कोणतें ?

८४५५
दा. क्र.

श्रीपाद वामन काळे
संपादक "अर्थ", पुणें

REFBK-0009455

१९५७

दोन रुपये

श्री. वा. काळे १९१०–

पहिली आवृत्ति, १९५७

मागणी अंक

फ४२ } R43
वं.६झ७ } w6J7

मुद्रक : के. ग. शारंगपाणी, आर्यभूषण मुद्रणालय, ९१५।१ शिवाजीनगर, पुणें ४

प्रकाशक : श्रीपाद वामन काळे, दुर्गाधिवास, ८२३ शिवाजीनगर, पुणें ४

# प्रास्ताविक

आपल्यापैकीं बहुतेकांचें जीवन, म्हणजे दारिद्र्याशीं हरघडीं सामना ! असें असूनहि, तें जीवन केवळ सुसह्यच नव्हे तर उजळ व समृद्ध करणें कित्येकांना साधतें, हें आपण पाहतों. त्यासाठी उपयोगी पडणाऱ्या 'लाख मोलाच्या भांडवला'चा कळसा वास्तविक आपल्याहि खाकेस असतो. पण, परिस्थिती-बरोबरच्या दैनंदिन झगड्यांत त्याचा विसर पडला, म्हणजे मग काय, "अडाणी कुणबी, दुप्पट राबे" अशी आपली स्थिति होते.

सामाजिक व कौटुंबिक गुंतागुंतीमध्ये आपण नेमकी कोणती भूमिका वेळोवेळ पत्करली पाहिजे, ह्याचें धोरण राखणें रोजच्या धकाधकीच्या मामल्यांत अवघड होऊन बसतें. बुद्धिबळाच्या डावांत मात करावयाची, तर पहिल्या खेळीपासून थेट अखेरपर्यंत खेळाडूला योजनाबद्ध अवधान ठेवावें लागतें. व्यापक जीवनांतहि हाच नियम लागू आहे.

ह्यासंबंधी, वेगवेगळ्या प्रसंगांच्या आधारें येथे केलेली मनमोकळी, प्रकट चर्चा वाचकांना त्यांच्याच मनांतील विचारांशीं व उपपत्तींशीं सुसंगत वाटेल.

प्रस्तुत संग्रहांतील लेख प्रथम अमृत, उद्यम, किर्लोस्कर, केसरी, चित्रमय-जगत्, नागरी जीवन, भगिनी, सह्याद्रि, स्त्री व ज्ञानेश्वर ह्यांत प्रसिद्ध झाले होते. ते येथे समाविष्ट करण्यास त्यांच्या संपादकांनी तत्परतेने संमति दिली आहे. लेखकाचे चित्रकार-मित्र, श्री. अनंत गोखले, ह्यांनी पुस्तकाच्या मुखपृष्ठावरील चित्र आत्मीयतेने काढून दिलें आहे.

आर्यभूषण मुद्रणालयाच्या चालकांनी नेहमींची आपुलकी व कार्यक्षमता दर्शविली आहे आणि मुद्रणाच्या शुद्धतेचे बाबतींत मुद्रित शोधक मंडळ, पुणें, ह्या संस्थेचे कार्यवाह श्री. य. ए. धायगुडे ह्यांनी जबाबदारी उचलली आहे.

ह्या सर्व साहाय्यकांचा लेखक अत्यंत ऋणी आहे.

२४ ऑक्टोबर, १९५७ श्री. वा. काळे

## ह्याच लेखकाच्या इतर कृती

### कण आणि क्षण

पृ. सं. १६८ — किं. अडीच रुपये

पहिली आवृत्ति — ऑक्टोबर, १९५३

दुसरी आवृत्ति — जुलै, १९५४

### સુખી જીવનની પગદંડી

( प्रा. शशिन ओझाकृत गुजराती अनुवाद )

पहिली आवृत्ति — फेब्रुवारी, १९५५

दुसरी आवृत्ति — नोव्हेंबर, १९५५

### पुढे पाऊल

पहिली आवृत्ति — ऑक्टोबर, १९५६

~~~~~~~~~~

*छापत आहे.*

**पुढे पाऊलचा गुजराती अनुवाद**

( अनुवादक : प्रा. शशिन ओझा, एम् ए. )

*तयार होत आहे.*

**कण आणि क्षणचा हिंदी अनुवाद**

( अनुवादक : श्री. पं. मु. डांगरे, बी. ए., बी. टी., रा. भा. कोविद, संचालक, महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार समिति )
~~~~~~~~~~

●●●

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | तुमचें स्थान कोणतें ? | ५ |
| २ | मधुमालतीची शानदार कमान | १३ |
| ३ | लाख मोलाचें भांडवल | १९ |
| ४ | सुशिक्षित स्त्रियांचे समृद्ध संसार | २९ |
| ५ | मुलां-मुलींचे परस्पर-संमतीने विवाह | ४२ |
| ६ | पतीच्या कायद्यांत पत्नीच्या दुरुस्त्या | ५४ |
| ७ | मैत्रीच्या मळ्याची मशागत | ५७ |
| ८ | म्हातारा झाडूवाला आणि त्याचा अखंड सराटा | ६३ |
| ९ | खोट्या प्रतिष्ठेचे बळी | ६६ |
| १० | लष्करी अधिकाऱ्याची सहचारिणी | ७० |
| ११ | मधुचंद्र | ७९ |
| १२ | दांडीवरलें धुणें | ८५ |
| १३ | अपकारक शालीनता | ९० |
| १४ | चहा-फराळाचे प्रसंगांची गोडी | ९४ |
| १५ | आपण सहल काढूं या. | ९८ |
| १६ | आधुनिक ग्रामदेवता | १०२ |
| १७ | गैरसमज | १०८ |
| १८ | रेडिओ आणि पुस्तकें | ११२ |
| १९ | थांबण्याची कला | ११४ |


●●●

●●●

“ विचारा,
खुलासा मागा,
चर्चा करा,
सुचवा,
दोष दाखवा,
खरडपट्टी काढा,
कांहीहि करा.

*पण,*

आपली प्रतिक्रिया
प्रकट होऊं द्या;
कृपा करून
आपल्या चैतन्याची
चुणूक दाखवा. ”

●●●


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ...... वि: ......
क्रमांक ...... नों. दि: ......

# तुमचें स्थान कोणतें ?



“या अफाट जगांत मी कसाहि वागलों तरी त्यामुळे माझें अगर समाजाचें आणखी काय बरेंवाईट होणार आहे ?” लहानमोठ्या दोषांवर पांघरुण घालण्यासाठी कळत नकळत या विचाराचा अनेक प्रसंगीं उपयोग केला जातो.

वास्तविक, ही विचारसरणीच मुळी मानसिक दुबळेपणाची आहे. कारण, मनांत आणलें तर आपण प्रयत्नपूर्वक स्वतःची उन्नति खासच करूं शकूं आणि समाजाच्या प्रगतीसहि फार मोठा हातभार त्यामुळे लागेल. कसें तें पाहा :



हिंदी राष्ट्रगीताचें नुकतेंच स्पॅनिश भाषांतर झाल्याची बातमी वृत्तपत्रांत वाचली तेव्हा कितीतरी आनंद झाला. भारत स्वतंत्र झाल्याबरोबर परदेशीय लोकांची आपल्याकडे पाहण्याची दृष्टि बदलली आहे, सुधारली आहे. आपले वडे लोक 'शेकहँड' करण्यासाठी हात पुढे करीत असतांना व्हाइसरॉय लॉर्ड माउंटबॅटननी स्वातंत्र्याच्या पहिल्याच दिवसापासून 'नमस्ते' करण्यास प्रारंभ केला. राजघाटावरील महात्माजींच्या समाधीस वंदन करण्यासाठी वेगवेगळया देशांचे पुढारी आणि प्रतिनिधि अनवाणी जातांना चित्रांत पाहिलें म्हणजे आपल्या भावनांबद्दल परकीय लोक किती आदर दाखवूं लागले आहेत हें समजतें. कातडी बूट घालून आलेल्या गव्हर्नर-व्हाइसरॉयांना थेट देवाजवळ आपण होऊन घेऊन जाणाऱ्या मंदिरांच्या ट्रस्टींची व पुजाऱ्यांची आठवण झाली म्हणजे तर हा फरक लागलीच मनावर बिंबतो.

हिंदी पुरुषांनी युरोपियन स्त्रियांशीं विवाह केले, तर पूर्वी नवऱ्याला बायकोचे जोडे उचलावे लागत. कारण, बायको ही जेत्या राष्ट्राची नागरिक होती. नवरा बायकोच्या मातृभाषेंत बातचीत करूं लागे. तिला येथील भाषा नोकरांना हुकूम सोडण्याइतपत आली म्हणजे पुरें होई ! अशीं दांपत्यें गावाबाहेरच्या वसाहतींत राहात. त्यांच्या मुलांचीं नांवें जॉर्ज, मेरी, रिचर्ड, रिटा, अशीं ठेवण्यांत येत. आता हिंदी-युरोपियन दांपत्यांचें नातें अधिक स्वाभाविक झालें आहे आणि युरोपियन पत्नी साडी नेसून कुंकू लावूं लागली आहे ! सरकारी अधिकारी हिंदींतून, मराठींतून बोलूं लागले आहेत आणि आपल्याच संस्कृतीबद्दल अनादर दाखविण्याची त्यांची पूर्वीची वृत्ति पालटली आहे. आपल्या देशांत आपण आपल्या नव्या परिस्थितीस व दर्जास साजेसें वागूं लागलों आहोंत.

स्वतंत्र असल्याचा हा आनंद जितका मानसिक आहे, तितका तो व्यावहारिक, आर्थिक स्वरूपाचा नाही, हें मात्र मान्य केलें पाहिजे. आपण राजकीय दृष्ट्या स्वतंत्र झाल्याबरोबर आपला उद्धार होईल ही

अपेक्षा अद्याप प्रत्यक्षांत उतरलेली नाही. युद्धकाळांतील चलतीशीं तुलना केली, तर आता सर्वत्र निराशेचें, विषण्णतेचें व अगतिकतेचें वातावरण पसरलें आहे. वास्तविक, आपल्या तोंडचा घास हक्कानें हिरावून घेणारा परकीय कोणीच उरलेला नाही. आपण जें अन्न पिकवूं तें आपणच खाणार. आपण जें कापड विणूं तें आपणच वापरणार. आपल्या कष्टाचें फळ आपणच चाखणार. कोणीहि परदेशीय त्याचा माल आता आपल्यावर लादून येथील उद्योगधंदे मारूं शकणार नाही. परदेशी मालावर बहिष्कार घालण्याची चळवळ पारतंत्र्याच्या काळांत करावी लागली, तशी आता करण्याची आवश्यकता उरलेली नाही. आयात कशाची व किती होऊं द्यावयाची हें आपलेंच सरकार ठरवीत असतें. गरिबांवर कर किती कमी बसवावा, श्रीमंतांवर तो किती लादावा, शेतकऱ्यांना शेतींसाठी भांडवल–पुरवठा कसा करावा, मजुरांचें हित कसें बघावें, कोणते कारखाने काढावे व वाढवावे, धरणें कोठे बांधावीं, कालवे कोठे खोदावे, महागाई आटोक्यांत कशी आणावी, उत्पादन कसें सुधारावें, हे सर्व प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न आपणच निवडून दिलेले लोक करीत आहेत. तेव्हा बाहेरील दडपणाबद्दल आता तक्रारीस जागा उरलेली नाही.

एक गोष्ट खरी, की आपण स्वातंत्र्यप्राप्तीपासून भरमसाठ अपेक्षा बाळगून होतों. स्वातंत्र्य मिळण्याचा अवकाश, की आपलीं सर्व दुःखें संपतील आणि सुखाचे दिवस येतील, ह्या सुखस्वप्नांत आपण मग्न होतों. त्या कारणाने आपल्या आजच्या परिस्थितीबद्दल आपण अधिकच कष्टी झालों आहों. केवळ स्वातंत्र्यामुळे आपले प्रश्न आपोआप सुटणार नव्हते, तर ते सोडविण्याचा फक्त अधिकार आपणांस प्राप्त झाला, त्याची जबाबदारी आपल्याकडेच आली, ही महत्त्वाची गोष्ट आपण विसरलों! इंग्रज गेल्यावर आपल्या जिव्हाळयाच्या पुढाऱ्यांनी मोठ्या उमेदीनें राज्यकारभार हातीं घेतला; परंतु पुरेशा अनुभवाच्या अभावीं, उत्साहाच्या

अतिरेकामुळे आणि भरमसाठ आश्वासनांमुळे जनतेची दिशाभूल झाली. ‘आपल्या स्वार्थत्यागी पुढाऱ्यांचें बनलेलें नवें सरकार सर्व कांही करणार आहे, आपण फार तर थोडी वाट पाहावयाची’, ह्या विश्वासाने आपण आयतीं फळें चाखण्यास आतुर झालों आणि प्रत्येक गोष्टीसाठी सरकारकडे बघूं लागलों.

राष्ट्रीयीकरणाची टूमहि त्याचीच निदर्शक आहे. खासगी व्यवस्थेपेक्षा सरकारी व्यवस्था अधिक चांगली, ह्या कल्पनेमुळे राष्ट्रीयीकरणाचें स्तोम माजलें आणि कांही उद्योगांचें राष्ट्रीयीकरण झालेंहि. परंतु त्याची व्याप्ति वाढविण्याची अव्यवहार्यता पटून तो प्रश्न आता मागे पडला आहे. सरकारने सर्व कांही करावें अशी अपेक्षा; परंतु त्यासाठी सरकारचे हात मजबूत करण्यास मात्र आम्हीं तयार नाही. सरकारकडून कशाची व किती अपेक्षा करावी ह्यास सुमारच नाही! परदेशांचा दाखला येथे देण्यांत येतो. त्या अपेक्षेचा आपल्या स्वतःच्या प्रयत्नांशी किती मेळ असावा ह्याचा कोणी विचारच करीत नाही; येथे मात्र परदेशांतील लोकांचें उदाहरण कोणी दाखवीत नाही!

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सरकार आपल्याला सर्व कांही घरबसल्या कसें देऊं शकेल ह्याचा विचार कोणीं केला आहे काय? ज्याने त्याने सरकारकडे मागण्या कराव्या; परंतु त्या पुऱ्या पाडण्यासाठी जरूर ती जबाबदारी पत्करण्यास कोणीतरी तयार आहे काय? ‘आपल्या सर्व दुःखांस सरकार जबाबदार आहे आणि प्रत्येक साधी गोष्टसुद्धा सरकारने करून दिली पाहिजे’ अशी आपली समजूत झाली आहे. आपल्या सरकारजवळ पुरेसें आर्थिक बळ आहे काय? वाटेल ते कर बसविण्याचा त्याला अधिकार असला, तरी करांचें उत्पन्न त्याचा सर्व खर्च भागवूं शकेल काय? आवश्यक त्या योजना हातीं घेण्यासाठी सरकार भांडवल उभारूं शकतें काय? सरकारी अधिकारी व नोकरवर्ग कार्यक्षम, कर्तव्यदक्ष, हुषार, कष्टाळू व सचोटीचा आहे काय? केवळ सरकारी प्रेरणेने

व नियंत्रणाने इष्ट त्या सर्व गोष्टी घडून येतील काय ? ह्या प्रश्नांचा आपण शांतपणें विचार केला म्हणजे आपली कल्पना आपणांस बदलावी लागेल.

भारत सरकारच्या पंचवार्षिक योजनेची ह्या दृष्टीने चिकित्सा केली, तर काय आढळतें ? अगदी मर्यादित उद्दिष्टें गाठण्यासाठी लागणारें भांडवल पुरविण्याचीहि सरकारची ताकद नाही आणि परकीय राष्ट्रांच्या मदतीवर व देणग्यांवर आपण फार मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहात आहों. कर आणि कर्जें ह्या रूपाने पुरेसा पैसा सरकारला उभारता येणार नाही, अशी परिस्थिति आहे. 'आम्हांलाच पोटापुरते पैसे मिळत नाहीत, तर आम्ही बचत कशी करणार आणि सरकारी रोख्यांत पैसे कोठून गुंतविणार ?' ही लोकांची तक्रार खरी असली तरी सरकारच्या योजनांस लागणारा पैसा अखेर दुसऱ्या कोठूनहि मिळूं शकणार नाही, जनतेनेच तो पुरवावा लागेल, हेंहि तितकेंच खरें आहे. सरकारी योजना म्हणजे समाजासाठी, समाजाच्या वतीने, सरकारने हातीं घेतलेल्या योजना. त्या पुऱ्या पाडण्यासाठी समाजाकडूनच पैसा मिळाला पाहिजे. दूधवाला शेरभर दुधांत पावशेर पाणी घालूं शकेल; पण सबंध पाण्याचेंच दूध करूं शकणार नाही. त्याचप्रमाणे, सरकारहि तात्पुरता उपाय म्हणून कांही नोटा जास्त छापून उत्पन्न–खर्चांतील तफावत एखाद्या वेळेस अंशतः भरून काढूं शकेल; पण केवळ छापखान्यांत नोटा छापून चलन निर्माण होऊं शकत नाही. त्यास भरपूर उत्पादनाचा आधार असावा लागतो.

थोडक्यांत म्हणजे, सरकारी योजनांस समाजाचा पाठिंबा हवा. त्यासाठी जरूर तो त्याग समाजाने केलाच पाहिजे. नोटा काढण्याचा अधिकार किंवा परकीयांची मदत ह्यांपैकी कांहीच सरकारला आणि आपणाला तारूं शकणार नाही. समाजांतील प्रत्येक व्यक्तीस ही जाणीव झाली पाहिजे. प्रत्येक पैचा विनियोग योग्य प्रकारें झाला पाहिजे. प्रत्येकाने शक्य तेवढी बचत केली पाहिजे. त्या बचतीचें

रूपांतर भांडवली योजनांत होण्यासाठी ती रक्कम सरकारला योग्य अटींवर मिळाली पाहिजे आणि सरकारी कारभार कार्यक्षमतेने चालण्यास लोकांनी भाग पाडलें पाहिजे. आपल्या कौटुंबिक जीवनांत आपल्या प्राप्तीचा फार मोठा हिस्सा भाडेखर्चाने खाल्ला, तर इतर आवश्यक खर्चास पैसाच उरत नाही ! त्याचप्रमाणे सरकारी उत्पन्नाचा फार मोठा भाग लष्करी आणि पोलीस खात्यावर खर्च झाला, तर समाजाच्या उद्धारासाठी पैसा उरणारच नाही. परकीय आक्रमणापासून बचाव करण्यासाठी सुसज्ज लष्कर अवश्य हवें; पण कमींत कमी पोलिसांकरवीं देशांत शांतता व सुव्यवस्था राखतां येण्यासाठी सामान्य नागरिकासहि सरकारला हातभार लावतां येणें सहज शक्य आहे.

सरकारी उत्पन्नाचा कमींत कमी भाग अनुत्पादक कार्यांसाठी खर्च व्हावा आणि अधिकांत अधिक भाग लोकांच्या उन्नतीच्या योजनांस मिळावा, ह्यासाठी जनतेच्या सहकार्याची अत्यंत आवश्यकता आहे. चोर, दरोडेखोर आणि समाजकंटक ह्यांच्यापासून समाजाचें संरक्षण अधिक चांगलें होण्यासाठीहि त्यामुळे मदत होऊं शकेल. स्वतःच्या खर्चांत काटकसर, सरकारी खर्चांत काटकसर होण्यास मदत, कोणाचाहि वेळ वाया जाऊं नये ह्या दृष्टीने राहणी व वागणूक, उपलब्ध साधनांचा जास्तींत जास्त उपयोग करून घेण्याची हातोटी, इत्यादि गोष्टींची प्रत्येकास सवय लागली पाहिजे. उदाहरणार्थ, परवाच आमच्या घरासमोरील रस्ता डांबरी करण्याचें काम चालू होतें, तेव्हा सहज पाहिलें तर माणसें झपाट्याने काम करूं शकत होतीं तरीहि त्यांचा कितीतरी वेळ वाया जात होता. खडी दाबण्याचें एंजिन तर दीर्घ काळ बंदच होतें. म्हणजे एंजिनांत गुंतविलेलें भांडवल पडून राहिलें होतें. म्युनिसिपालिटीच्या पांच एंजिनांऐवजी तीन एंजिनांनीं काम भागलें, तर तेवढा खर्च वांचेल.

कित्येकांच्या घरीं शिवण्याचीं यंत्रें धूळ खात असतात; केव्हातरीच तीं वापरण्यांत येतात. शेजाऱ्यापाजाऱ्यांनी सहकार्याने वागावयाचें ठरविलें, तर प्रत्येकाला वेगळें मशीन घ्यावें लागणार नाही आणि कमींत कमी खर्चांत जास्त काम व बचत होईल. तसेच, स्वतःला न परवडणारीं मोठीं घरें बांधण्याचा मोह मध्यमवर्गीयांस आवरतां येत नाही आणि घरांत पैसे अडकून बसल्यामुळे मुलांच्या शिक्षणावर योग्य तो खर्च त्यांना करतां येत नाहीं, असें कांहीं ठिकाणीं आढळतें. जरूर नसतांना मोटार घेणें किंवा जरुरीपेक्षा ती मोठी घेणें ह्यामुळेंहि व्यक्तींचें नुकसान होऊन देशद्रोहहि घडतो, हें त्यांच्या लक्षांत येत नाही! कारण, तेवढी रक्कम त्यांच्या बँकेंतून कमी झाली म्हणजे समाजाच्या आर्थिक व औद्योगिक संसारासाठी तितकी रक्कम कमी पडते. एवढ्यानेच नुकसान संपत नाही, तर मोठी मोटार जास्त पेट्रोल खाते, त्यामुळे पैशाचा ओघ परदेशाकडे एकसारखा चालू राहतो. व्यक्तिगत काटकसरीमुळे देशहितहि कसें साधतें, ह्याचीं अशीं अनेक उदाहरणें देतां येतील. काटकसरीच्या गुणाचें राष्ट्रीय महत्त्व प्रत्येकास पटलें, तर भारताच्या विकासाचा पाया निश्चित मजबूत होईल.

आपण आज ज्या थोड्या–फार बऱ्या स्थितींत आहोंत, त्यास आपल्यापूर्वीच्या पिढ्यांचे श्रम व तपश्चर्या हीं कारण आहेत. तेव्हा आपणहि आपल्या स्वार्थत्यागाने आगामी पिढ्यांचें शक्य तेवढें हित पाहिलें पाहिजे. आपला देश उघड्या डोळ्यांनी एकदा हिंडून पाहा. मोठमोठीं देवळें, रस्त्याच्या दुतर्फा झाडें, मोठालीं धरणें, हीं काय सांगतात? आपल्या पूर्वजांनी स्वतःकरिता ह्या गोष्टी केल्या नाहीत; तर त्यांनी स्वतः स्वार्थत्याग करून, मागाहून येणाऱ्या पिढ्यांच्या सुखसोयी पाहिल्या. आपल्या मागाहून येणारांसाठी आपण कांही करून ठेवलें आहे काय? फारसें नाही, पुरेसें नाही. आपल्या चैनी व आपलीं दुःखें ह्यांच्यांतच आपण गुरफटलेलों आहोंत. असंख्य पिढ्यांच्या

साखळींतील आपण एक दुवा आहोंत हें न विसरतां, आपणहि पुढील पिढ्यांसाठी कांहीतरी मोठें करून ठेवूंया. मध्यमवर्गीयांनी त्यांची बचत सरकारी रोख्यांत गुंतवावी असें सांगतांना, श्री. चक्रवर्ती राजगोपालाचारी ह्यांनी केलेलें हें आवाहन अत्यंत मार्मिक आहे.

उद्याचा विचार न करतां, आजच्यापुरताच केलेला स्वार्थी विचार व्यक्तीच्या हिताचा होत नाही आणि राष्ट्राच्या बाबतींत तर तो फारच घातुक ठरतो. केवळ आपल्यापुरतें तात्कालिक सुख पाहणाऱ्या व्यक्तींचाच समाज बनला असेल, तर त्या समाजाचा राष्ट्रोद्धारास हातभार लागूंच शकणार नाही, हें स्पष्ट आहे. एखाद्या दिवशींच नाही, तर सबंध आयुष्यभर, एकट्यादुकट्याने नव्हे तर सर्वांनी, अर्धपोटी राहण्याचें ठरविलें, तरच भांडवलसंचय होण्यास कूस मिळणार. हे भांडवलाचे सर्व कण एकत्रित करून ते कामास लावले, तरच पुढील पिढ्यांसाठी कांहीतरी करून ठेवतां येईल. पूर्वजांनी राखून ठेवलेला पैसा अवास्तव खर्च न करतां त्यांत भर घालणें आणि आपल्या मुलांच्या शिक्षणावर आवश्यक तो सर्व खर्च नव्या मिळकतींतूनच करणें प्रत्येकास हितावह असतें. असंख्य पिढ्यांच्या साखळींतील दुव्याची आपली भूमिका लक्षांत आणून प्रत्येकाने वागलें पाहिजे.

कर्तव्याची ही जाणीव झाली म्हणजे पुढील कार्य अवघड नाहीं. एखादी गोष्ट आपल्याला नीट पटली म्हणजे आपण त्यासाठी कसून प्रयत्न करूं लागतों. खरें बोलण्याची व चोरी न करण्याची आपणांस सवय नाही का होत ? खोटें बोलण्यापासून फायदा दिसत असला तरी खोटें सांगण्यास मन सहसा धजावत नाही. चोरी पचवण्याची खात्री असली तरी हात आखडला जातो. प्रत्येक व्यक्तीला समाजघटक म्हणून तिचें कर्तव्य कोणतें आहे हें समजलें, म्हणजे ती त्या दिशेने विचार करूं लागेल. इतर लोक कर्तव्यपालन करीत नाहीत म्हणून ती व्यक्ति स्वतः कर्तव्यच्युत होणार नाहीं. व्रत म्हणून स्वदेशीच जिनसा वापरणारे

लोक ऐटबाज लोकांच्या समुदायांत मागे पडतात म्हणून त्यांना कुठे खंत वाटते ? जर्मन राष्ट्रास हिटलरने आदेश दिला होता, की जें जर्मनींत पिकेल तेंच जर्मनांनी खाल्लें पाहिजे; बाहेरून येणाऱ्या अन्नावर वाढलेली जर्मन प्रजा कधींहि राष्ट्र उद्धरूं शकणार नाही.

हिंदी लोकांनाहि अशाच संदेशाची आज आवश्यकता आहे. अन्न–धान्य पुरेसें न पिकणाऱ्या आपल्या देशानें अन्न–धान्यासाठी परकीयांवर अवलंबून राहणें घातुक आहे. देशांत होणाऱ्या कच्च्या मालाचाच आपल्या कारखान्यांनी पक्का माल केला पाहिजे आणि आपणहि देशी कपाशीच्या सुताचाच कपडा वापरला पाहिजे. देशांत उपलब्ध होणाऱ्या जिनसांवरच आपला आर्थिक संसार चालविला पाहिजे. लोकांना वेळोवेळीं उपदेश करणारे बडे सरकारी अधिकारी आणि जनतेच्या अडचणींचा फायदा घेऊन गबर होणारे व्यापारी, तसेच कांही पुढारी विश्रांतीसाठी परदेशांत जातात आणि त्यांचा उदोउदोहि होतो ! जनतेच्या श्रद्धेस हादरा देणारे हे प्रकार बंद करण्यासाठी सत्याग्रहहि करावा असें कधीकधी वाटूं लागतें ! परदेशी हुंडणावळीची अडचण गरिबांच्या वाट्यास यावी आणि परदेशीं जाऊन पैसा उडविणारांचा सन्मान व्हावा, हें मनास पटत नाही.

ह्यावर उपाय नाही, असें नाही. समाजहिताच्या विरोधी गोष्ट करणारांना समाजांत मानाचें स्थान मिळतांच कामा नये. सामान्य माणसांच्या कर्तव्यपालनाचें तेज सामाजिक जीवनावर पडलें पाहिजे. समाजाच्या प्रत्येक घटकामध्ये राष्ट्राच्या उद्धाराप्रत नेणाऱ्या गुणांचा इतका विकास झाला पाहिजे, की प्रतिकूल वातावरणांतहि ते गुण टिकून राहिले पाहिजेत. व्यक्ति सुधारल्या तर कुटुंब सुधारेल, खेडीं सुधारतील, देश सुधारेल. पण व्यक्ति कच्च्या दिलाच्या आणि आपमतलबी राहिल्या, तर त्यांनी बनणारा समाजहि दुर्बल होईल आणि त्या समाजाचें प्रतिबिंब असणारें सरकारहि क्रियाप्रवण होऊं शकणार नाही. जी अपेक्षा

दुसऱ्याकडून करावयाची, त्याबाबत आपण स्वतः काय करतों हें प्रत्येकाने पडताळून पाहिलें पाहिजे आणि दुसऱ्याची वाट न पाहतां आखलेला योग्य मार्ग आक्रमला पाहिजे.

लोकमान्य टिळकांनी स्वराज्यप्राप्तीसाठी कष्ट सोसले त्यावेळीं त्यांनी इतरांसाठी कोठे वाट पाहिली? महात्मा गांधी किंवा पं. जवाहरलाल नेहरू ह्यांनी तरी इतरांचा पाठिंबा नाही म्हणून कधी धीर सोडला? असे हजारो लहान-मोठे टिळक-गांधी-नेहरू निर्माण झाले, तर समाजाचा व राष्ट्राचा उद्धार होण्यास प्रदीर्घ काळ लागणार नाही. जी गोष्ट योग्य म्हणून पटली ती करीत राहणें, त्यासाठी जरूर तो त्याग करणें आणि आपल्या उदाहरणाने इतरांना तसेंच करण्यास प्रवृत्त करणें हें आजच्या जाणत्या नागरिकाचें आद्य कर्तव्य आहे.

पुणें येथील डेक्कन जिमखान्यावरील एका शाळेंत मुलें-मुलीं जातात-येतात, तेव्हा तेथील मैदानाभोवती जो सार्वजनिक रस्ता आहे तो न वापरतां तीं मैदानांतूनच जातात. एक दिवस शाळा सुटण्याच्या वेळीं मी मैदानापाशीं उभा होतों, तेव्हा एक लहान मुलगा मैदानाच्या कडेच्या रस्त्याने एकटाच परत चाललेला मीं पाहिला. "आपल्या मित्रांच्या बरोबर न जातां तूं असा एकटा कां चालला आहेस?" असें मीं त्याला विचारलें.

त्यावर तो म्हणाला, "आमच्या बाबांनी मला सांगितलं आहे, की मैदान ही खेळण्यासाठी तयार केलेली जागा आहे; तो येण्या-जाण्याचा रस्ता नाही. खेळ चालू नसला तरी मैदानांतून जायचं नाही. कारण, जाण्याची पायवाट पडते; मग त्यांत पाणी साठतं, खड्डे पडतात आणि मैदान खराब होतं."

मीं मुद्दाम खोदून विचारलें, "बाकीचीं सर्व मुलं मैदानांतून जातात. तूं एकटाच फक्त जात नाहीस. त्यामुळं तुला तेवढं जास्त चालावं लागतं आणि मैदान खराब होण्याचं त्यामुळं कुठं थांबतंय्?"

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........


छोट्या विश्वासने निश्चयपूर्वक उत्तर दिलें, "त्यांना जवळ पडलं तरी मला कुठं लांब पडतंय्? मी जवळच्या रस्त्यानंच जातों आहें की! मैदानाच्या खराबींत माझ्यामुळं तर नाहींना भर पडत?"

दुसऱ्याने तिकीट न काढतां प्रवास केला म्हणून आपणहि तिकीट काढावयाचें नाहीं, दुसऱ्याने कर चुकविला म्हणून आपणहि कर चुकवावयाचा, दुसऱ्याने रांग मोडली म्हणून आपणहि रांग मोडून पुढे घुसावयाचें, इतर मुलें परीक्षेंत कॉपी करतात, म्हणून आपणहि करावयाची, ह्या आता दुर्दैवाने सामान्य झालेल्या प्रवृत्तीस विश्वासने दिलेलें चोख उत्तर आणि त्याचें अनुकरण करणारीं माणसें आज आपणांस सर्वत्र हवीं आहेत. त्यांतूनच नवसमाज निर्माण होणार आहे.

अशा प्रकारें आपल्या देशाच्या उद्धारासाठा योग्य त्या घडणीची जनता तयार झाली म्हणजे त्या जनतेच्या चैतन्याचा उपयोग करून घेणें सोपें होईल. त्यासाठी कुशल असे तज्ज्ञ पुढारी लागतील; पण ते जनतेंतूनच निर्माण व्हावयास पाहिजेत व होतील. आपल्या आर्थिक उद्धारासाठी निष्ठावंत नागरिकांची जरुरी आहे; राहणीचा आजचा खर्च आणखी कमी करून, पुढील पिढ्यांसाठी त्याग करण्यांत आनंद मानणारी जनता हवी आहे. प्रत्येकाने हा मानसिक आनंद उपभोगावा आणि त्याबरोबर समाजहितहि साधावें.

'माझ्या चार आण्यांनी देशाला कितीशी मदत होणार' असा विचार न करतां आणि कोणीं किती त्याग केला ह्यावर आपली कृति अवलंबून न ठेवतां, आपल्या सदसद्विवेक बुद्धीस स्मरून योग्य तें करावें! पावतीला एक आण्याचें रेव्हेन्य तिकीट न लावून, कर चुकवून, आगगाडीच्या प्रवासापुरतें मुलाचें वय चोरून, पार्सलाचें वजन मुद्दाम कमी लावून, नोकरी टिकविण्यासाठी आवश्यक तेवढेंच कमींत कमी काम कसेंतरी करून, कायद्यांत न सापडतां शक्य तेवढी लबाडी करून, थोडक्यांत म्हणजे संभावितपणें विविध प्रकारच्या 'चोऱ्या'

करून, त्यावर सदैव चरितार्थ चालविणारांच्या हातून समाजाला काय वळण लागणार? अशा चोरांनीच अधिकाराच्या, मानाच्या व फायद्याच्या जागा काबीज करून मोठ्या 'चोऱ्या' करण्यास व पचविण्यास प्रारंभ केला, तर समाज पुढे कसा येणार? म्हणूनच, बहुसंख्य नागरिकांनीं आपली नीति प्रभावी बनविली पाहिजे आणि अल्पसंख्याक परंतु निर्ढावलेल्या अशा 'चोरां'चा नायनाट केला पाहिजे; त्यासाठीं सरकार-वर वजन आणलें पाहिजे; जरूर तर तें बदललेंहि पाहिजे. त्यासाठी समाजाच्या सुप्त शक्तीस जागें करणारांची संख्या वाढली पाहिजे. समाजाला नाशाप्रत नेणाऱ्या एंजिनाचा सांधा बदलला, तर तेंच एंजिन समाजाला उद्धाराकडेहि नेऊं शकेल.

लोणावळ्याजवळचा वलवणचा तलाव आगगाडींतून जातां-येतां पुष्कळांनी पाहिला असेल. त्या धरणांत साठवलेलें पाणी प्रथम उघड्या कालव्यांतून आणि नंतर नळांतून घाटाच्या तळाशीं खोपोली येथे वीजघरांत नेण्यांत येतें. सुमारे १७०० फूट खाली येणाऱ्या पाण्याच्या वेगवान धारेने चाकें फिरविलीं जातात त्याबरोबर त्यांस जोडलेलीं टर्बाइन्स फिरून प्रचंड वीज निर्माण होते. ह्या विजेच्या शक्तीमुळे कितीतरी लहानमोठे कारखाने व गिरण्या चालून समाजाच्या संपत्तींत व सौख्यांत केवढी मोठी भर पडत आहे! तलावांतील पाण्याचा थेंब स्वतंत्रपणें कांहीच करूं शकला नसता; परंतु असे अगणित थेंब एकत्र आणून त्यांना कामास लावल्यामुळे कितीतरी मोठी प्रेरक शक्ति आपणांस मिळत आहे, हें आपण पाहतों. वलवणच्या तलावांतील पाणी एक-जुटीने व वेगाने चक्रें फिरवून प्रचंड कार्य करून दाखवितें; आपणहि फुटीरपणाने स्वैर वर्तन न करतां समाजाच्या उद्धाराचीं चक्रें फिरविलीं, तर केवढें तरी मोठें कार्य होईल!

—किर्लोस्कर

●●●

संक्रांतीच्या निमित्ताने, मी माझ्या एका स्नेह्यास तिळगूळ देऊन, "तिळगूळ घ्या, गोड बोला" असें म्हटलें. त्यावर त्याने उत्तर दिलें, "अहो, आमच्यांत आता कसचा बदल होणार ? इतकीं वर्षं जसं चाललं आहे, तसंच चालणार !"

खरोखरच, मनुष्यांत बदल मुळीच होऊं शकत नाही की काय ? सिमेंट कॉंक्रीट एकदा पक्कें बसलें की तें वज्रलेप होतें, फोडूनच काढावें लागतें. मनुष्यस्वभावाचें व त्याच्या सवयींचें तसेंच आहे काय ? वातावरणाचा, परिस्थितीचा, अवलोकनाचा, वाचनाचा, अनुभवाचा त्याच्यावर कांहीच परिणाम होत नाही काय ?

भाजक्या मडक्याचा काठ कसा वळणार ? तो ओला आहे, तोंवरच वळेल; त्यानंतर नाही. लहानपणीं, शरीर वाकवावें तसें वाकतें; मनालाहि लावावें तसें वळण लागतें. मोठेपणीं शरीर ताठ होतें व मनहि लवचीक राहात नाही. जडलेल्या सवयी सुटत नाहीत. तरी पण त्यांत बदल करणें, त्यांना कलाटणी देणें, अगदीच अशक्य आहे काय ?

मला वाटतें, बदल प्रयत्नसाध्य आहे; तो घडवून आणण्यासाठी आपण योजना आखीत नाही व चिकाटी धरीत नाही, एवढेंच. मनुष्याने निष्ठापूर्वक एकाग्रता धरली तर त्याच्यामध्ये जरूर ती सुधारणा होणें कठीण जाऊं नये. अर्थात्, त्याप्रीत्यर्थ आवश्यक तो लवचीकपणा यावा ह्यासाठी प्रथम कठीणता धारण करावी लागते व प्रयत्न मधेच सोडून भागत नाही.

एकट्या-दुकट्याने असा प्रयत्न केला, तर तो करणारा नाउमेद होऊन जाण्याचा संभव आहे; पण घरांतील व घरोब्यांतील मंडळींनी सहकार्य करण्याचें ठरविलें आणि कटुता टाळून एकमेकाला प्रोत्साहन दिलें तर कितीतरी कार्य होईल !

"आधी आत्मज्ञान मग ब्रह्मज्ञान", अशी एक म्हण आहे. स्वतःच्या वर्तनाची जाणीव करून घेण्यासाठी आत्मनिरीक्षणाची आवश्यकता आहे, पण तसें करणारे किती थोडे असतील! आपली स्वतःची कसोशीने परीक्षा घेणें सोपें नाही. "दुसऱ्याच्या डोळ्यांतलें कुसळ दिसतें, पण आपल्या डोळ्यांतलें मुसळ दिसत नाही." तेव्हा दुसऱ्यांच्या भूमिकेंतून व दृष्टिकोनांतून आपण पाहिलें, तर आपले डोळे स्वच्छ होण्यास, त्यांतील कुसळ-मुसळ काढून टाकण्यास मदत होईल. अशा रीतीने, जे दोष आपल्या लक्षांत सामान्यतः येत नाहीत, त्यांची जाणीव होईल. पतीनें पत्नीला व पत्नीने पतीला कांही गोष्टी सांगितल्या, त्यावर दोघांनी निवांतपणें विचार केला, तर सुधारणेचा पाया तयार होईल.

तीच तीच चूक पुनः पुनः होत राहते, पण नंतर तरी ती लक्षांत येते, असें प्रारंभीं घडतें. हळूहळू, चूक होते वेळींच ती लक्षांत येऊं लागते, पण चूक घडून जाते; प्रगतीची ही दुसरी पायरी होय. चूक आता होणार हें अगाऊ लक्षांत येतें व ती टाळणें शक्य होतें; प्रगतीची ही तिसरी पायरी. चूक घडणें सवयीने आपोआप टळणें, ही शेवटची पायरी. हळूहळू सौकर्य येत गेलें म्हणजे प्रत्येक वेळीं डोक्याला ताण पडत नाही. वागण्यांत सफाई येऊन आपोआपच, प्रयत्नावाचून सर्व कांही ठीक चालतें.

लहान मुलांच्या अनिष्ट संवयी मोडून काढण्याचा आपण किती कसोशीने प्रयत्न करतों? त्यासाठी त्यांना किती बोलतों, रागावतों, शिक्षा करतों? पण, आपल्या चुकांची गावभर जाहिरात झाली तरी आपल्या स्वतःला त्यांची कोणीच जाणीव करून देत नाही. ती करून देणारास त्याबद्दल कृतज्ञता दर्शविण्याऐवजी, आपण त्याचा तिटकारा करूं लागलों, तर त्याने तरी काय करावें? आई-वडील ज्या दक्षतेने मुलांत सुधारणा घडवून आणतात, त्यामानाने कांही प्रमाणांत तरी आपले हितचिंतक आपल्या बाबतींत जरूर लक्ष घालतील. पण केव्हा?

आपण त्यांच्या सूचनांचें स्वागत करून पटलेल्या सूचना अमलांत आणण्यास लागलीच प्रारंभ केला तर.

रमाबाईंनी सरस्वतीबाईंना नवीन पातळ भेटीदाखल दिलें, की त्या तें पातळ रमाबाईंनाच केवळ नव्हे, तर इतरांनाहि नेसून दाखवितात. ब्लाउजपीस दिला, की त्याचा शिवलेला कपडा घालून दाखवितात. विजयने वसंतला एखादें कॅलेंडर दिलें, तर तें तो भिंतीवर मुद्दाम लावून ठेवतो. त्याचप्रमाणे, दुसऱ्याने आपल्यांत सुधारणा सुचवून आपल्यांतील गुणवर्धन केलें, तर त्याचें योग्य प्रकारें प्रदर्शन करून आपल्या कृतज्ञतेस प्रसिद्धि दिली पाहिजे. दुसऱ्याच्या मदतीचा उलेख कोणासहि कमीपणा आणीत नाही. उलट, तो सर्वांवरच सुपरिणाम घडवून आणतो.

हट्टी मनुष्य हेका सोडून एखादी गोष्ट पटवून घेणारच नाही; व ती पटली तरी ती मान्य करणार नाही. परंतु सर्वच बाबतींत स्वतःचेंच तेवढें बरोबर, असा दुराग्रह धरणारे विरळाच असणार. त्यांच्या घोडचुका त्यांना हळुवारपणें दाखविणारा कोणी भेटत नाही; त्यांच्या नादीं कोणी लागत नाही. पण, बहुतेक लोकांना योग्य माणसाने, योग्य वेळीं, योग्य गोष्ट, योग्य प्रकारें सांगितली तर ते मनाला खूणगाठ बांधल्याखेरीज राहात नाहीत. त्याची प्रकट कबुली देण्याची ते कदाचित् टाळाटाळ करतील एवढेंच.

मनुष्यांत सुधारणा होऊं शकली, तरी त्यासाठी पडणारी किंमत सुधारणेच्या मानाने जबर असतां कामा नये, हें उघड आहे. कांही सवयी बदलण्याचा प्रयत्न केला, तर त्यामुळे होणारे दुष्परिणाम अधिक भयानक होतील, असें कित्येकांच्या बाबतींत घडून येईल. म्हणून, कोणत्या सवयीला किती मुरड घालावयाची, हें तारतम्यानेच ठरविलेलें बरें; आणि कशापलीकडे ताणावयाचें नाही हेंहि लक्षांत आणलें पाहिजे. एखादी वाईट सवय असल्याने मनुष्याची इतर किंमत कांही नाहीशी होत नाही; उलट ती त्याच्या इतर गुणांच्या विकासास कधीकधी पोषकहि ठरूं शकते !

शंभर टक्के यशाचें ध्येय ठेवण्याचें कारण नसतें, आणि ठेवलेल्या ध्येयापैकी कांही टक्के यश हातीं आलें, तरी समाधान वाटतें. यशाच्या पुढील प्रत्येक टक्क्यासाठी अप्रमाण कष्ट पडतात व यातना भोगाव्या लागतात. सुधारणा परवडली नाही, इतर बाबतींत त्यामुळे अप्रियता किंवा अस्वस्थता निर्माण झाली, तर अखेर काय साधलें ? रोग्याला झोप येऊन विश्रांति मिळणें जरुरीचें असतांनाहि, डॉक्टर त्याला झोपेचें औषध एकसारखें देण्यास तयार होत नाहीत; कारण, तें औषधच जास्त अपकारक ठरण्याचा धोका असतो. यांतील रहस्य स्पष्ट आहे.

थोडक्यांत म्हणजे, आपल्या दोषांची स्वतः जाणीव करून घेतली पाहिजे, ती करून देण्यास इतरांना उद्युक्त केलें पाहिजे आणि अशा हितकर्त्यांना आपण जवळ केलें पाहिजे. "आता या जन्मीं शक्य नाही" ह्या कल्पनेनेच प्रत्येक प्रश्नाकडे पाहून, सहज होऊं शकणारी सुधारणासुद्धा तात्कालिक सोयीखातर टाळणें कसें योग्य होईल ? सुधारत चाललेल्या मनुष्याच्या प्रगतीचें इंगित समजलें, म्हणजे तें इतरांनाहि मार्गदर्शक होतें; त्यांच्यांतहिं सुधारण्याची इच्छा निर्माण होते. हा सर्व सहभावनांचा आविष्कार आहे; अर्थात्, त्याला परिश्रमाची जोड मात्र हवी.

अनिष्ट आचार-विचार, बोलणें-चालणें ह्यांत व साध्या लकबींत फरक आहे, तो मात्र लक्षांत यावयास हवा. दुर्गुण नाहींसे होण्याची जितकी आवश्यकता आहे, तितकी केवळ धाटणी किंवा ढब बदलण्याची नाही. हसण्याची पद्धत, हातवारे करणें, बोटें मोडणें, भुवया उडाविणें, चष्मा पुसणें, हातरुमाल नेहमी हातांत धरणें, मनगटावरील घड्याळाशीं किंवा केसांच्या शेपट्यांशीं खेळणें, हीं प्रत्येकामधील वैचित्र्याचीं चिन्हें आहेत. ह्या किरकोळ लकबी मोडून काढण्यासाठी पडणारे श्रम एखादा मोठा दुर्गुण नाहींसा करण्यासाठी उपयोगांत आणणें अधिक फायद्याचें ठरेल.

ज्या लकबीमुळे इतरांना फारसा त्रास होत नाही, ती राहीना का विचारी! कांही लकबी तर चित्ताकर्षक असतात!

पति-पत्नी व स्नेही-सोबती ह्यांनी एकमेकांचे दोष शोधून काढून ते पटवून देण्याचा एकसारखा प्रयत्न करावयाचा, असा ह्या सर्वांचा मुळीच अर्थ नाही. एकमेकांच्या दोषांकडे तिऱ्हाइतांप्रमाणे त्यांनी पाहूं नये, योग्य संधि साधून हळुवारपणें सर्व कांही करावें आणि त्याला अनुकूल असें वातावरण असावें; त्याचप्रमाणे एकमेकांची मनोरचना लक्षांत घेऊन सुरक्षितपणाची मर्यादा ओलांडली जाऊं नये. प्रेम किंवा मैत्री तुटण्यांत त्यांचा परिणाम होऊं नये, इतपतच जातां येईल. खिलाडू वृत्ति असेल तर अशा मनमोकळया बोलण्यामुळे प्रेम व मैत्री वृद्धिंगतच होते, असा अनुभव आहे; आणि अशा ठिकाणींच हा प्रयोग यशस्वी होऊं शकेल. म्हणजे, सर्वांचीच त्यासाठी तळमळ हवी. सामन्यांतील एखाद्या खेळाडूने खेळाच्या नियमाचा भंग केला, तर त्याला सामन्याचा पंच शिटी वाजवून, खेळ थांबवून, सर्वांच्या समक्ष, क्रीडांगणाच्या बाहेर काढतो. असा प्रकार ह्या बाबतींत कसा चालणार?

एखाद्या मोठ्या इमारतीची तपासणी करून, तज्ज्ञ इंजिनिअर कंत्राटदाराचीं बिलें मंजूर करतो, त्या वेळीं त्याने केवळ दोषैक दृष्टि ठेवली तर कितीतरी बांधकाम तो पाडायला लावील, दगड आणि फरशा बदलण्यास सांगेल, लाकूड-काम नापास करील. एखादी वीट जरा कच्ची किंवा जास्त भाजलेली त्याला आढळली अथवा एखादा स्क्रू पिळावयाचा राहिला, म्हणून कांही तो प्रत्येक किरकोळ चूक दुरुस्त करायला लावीत नाही. इमारतीच्या मजबुतीस बाधक, त्याचप्रमाणे डोळयांत खुपणारे दोष मात्र तो काढायला लावील. मनुष्याच्या दोषांच्या व लकबींच्या बाबतींत हेंच तारतम्य बाळगलें गेलें नाही, तर अप्रीति आणि असंतोष वाढून, सबंध प्रपंचाचा विचका होऊन जाईल. स्वतःच्या सुधारणेविषयी ज्याला

तळमळ वाटत नसेल, त्याच्यावर तीं लादण्याचा प्रयत्न केला, तर तो अयशस्वीच नव्हे, तर अपकारकहि झाल्याविना राहणार नाही.

वयाने मोठ्या झालेल्यांना त्यांचे लहान-सहान दोष दाखविण्यासाहि कोणी तयार होत नाही, आणि तीं माणसें तशींच वाढत जातात व त्याबरोबर त्यांचे दोषहि वृद्धिंगत होतात. त्यावर उपाय म्हणजे, कोणत्याहि औषधविक्रेत्याकडे मिळणारें आयतें पेटंट औषध नव्हे; डॉक्टरी साहाय्याने प्रकृति तपासून पेशंटने घ्यावयाचें तें मिक्श्चर आहे. प्रत्येकाने एकमेकाचे डॉक्टर व पेशंट व्हावें, आणि योग्य तें औषध द्यावें-घ्यावें.

मधुमालतीचीं सुमधुर फुलें कित्येकांनी पाहिलीं असतील; त्यांचा आस्वादहि घेतला असेल. ज्या वनस्पतीला हीं फुलें येतात, तिचें स्वरूप काय आहे: वेल, का झाड ? असा प्रश्न कधीकधी उपस्थित होतो. कारण, झाडासारखी अडदांड व रानवट वाढलेली मधुमालती बऱ्याच ठिकाणीं आढळते; पण त्याच वनस्पतीला वळण मिळालें, लावलें गेलें, तर ती शोभादायक कमानहि करून दाखविते. तिचें खोड जुनें, निबर व कडक राहिलें, तरी तिच्या फांद्यांना आकार देतां येतो व त्यामुळे त्या वनस्पतीची कमनीयता वाढून तिला शानदार स्वरूप प्राप्त होतें. आंतील जुनें खोड पार लपून जातें. सुसंस्कृत मनुष्याच्या बाबतींत असा परिपाक अशक्य आहे काय ?

—सह्याद्रि

●●●

पद्माताईंच्या पहिल्या मुलाचें बारसें होतें. त्यांच्यासाठी मोठा बाळंतविडा नेणें नमूताईंना अर्थातच जरूर वाटलें. त्यांनी प्रथम ह्या बाळंतविड्यासाठी किती पैसे खर्च करणें इष्ट व शक्य होईल ह्याचा साधकबाधक विचार केला आणि ४० रुपयांचें बजेट आखलें. पद्माताईंना लुगडें व खण, त्यांच्या आईला खण, मुलाच्या वडिलांना व चुलत्याला शर्टचें कापड, मुलाच्या दोघी आत्याबाईंना ब्लाउजपीस, मुलाला वाटी व बोंडलें, हें सर्व त्यांत बसवावयाचें होतें. कापडाच्या दुकानांत गेल्याबरोबर त्यांनी दुकानदाराला आपल्या बजेटाचा आकडा सांगितला व त्याप्रमाणे कापड विकत घेतलें; सराफालाहि बजेटांत बसेल एवढीच वाटी व चमचा देण्यास सांगितलें; बोंडलें रद्द केलें, तरी सुद्धा खर्चाचा आकडा ५० रुपयांपर्यंत जाऊं लागला. तेव्हा त्यांनी शर्टचें कापड घेण्याचें रद्द केलें आणि ४२ रुपयांत बाळंतविडा बसविला.

नमूताईप्रमाणे चिमूताईंनीहि बाळंतविडा केला पण त्यांनी आपल्या ऐपतीचा आकडा प्रथम ठरविलेला नव्हता. पातळ पसंत केलें, खण व ब्लाउजपीस फाडून घेतले, शर्टच्या बऱ्यापैकी कापडाचेहि सहा-सहा वार तुकडे करून घेतले, आणि बाळाला चांगली वाटी हवीच म्हणून त्यांतहि काटकसर केली नाही. त्यामुळे बाळंतविड्याचा आकडा ६० रुपयांवर गेला; त्याची उधारी आता कित्येक महिने त्यांना सतावीत राहील. पातळ, खण, ब्लाउजपीस, शर्टिंग, वाटी, सर्व कांही पाहिजे व तें चांगलेंहि हवें; प्रत्येकावरील खर्चहि योग्य वाटतो, पण त्या सर्वांची बेरीज मात्र डोळे पांढरे करावयास लावते. बाळ्या, चंदू, अवि, सुधा, कुंदा, सुमन, आशा, सगळीं मुलें व मुली चांगलीं हुशार व देखणीं आहेत. तीं एकएकटीं मोठीं मोहक वाटतात, पण तीं एकाच वेळीं फी किंवा कपड्यासाठी त्रागा करूं लागतात, तेव्हा मनांत वेगळेच विचार येतात !

एका कंत्राटदाराने मला सांगितलें, की त्याने रामभाऊंच्या घराचें काम केलें तेव्हा त्यांना सबंध बिलाची बेरीज एकदम सांगितलीच नाही. खोदाई, बांधकाम, लाकूडकाम, फरशी, रंगकाम, इत्यादींच्या खर्चांचीं टाचणें प्रथम दिलीं. तीं अर्थातच त्यांनी मान्य केलीं. नंतर तीं टाचणें एकत्र करून त्यांना त्यांची बेरीज कळविली ती पाहून त्यांना धक्काच बसला. प्रत्येक बाब स्वतंत्रपणें मान्य केल्यानंतर त्यांना त्यांची एकत्रित रक्कमहि मान्य करणें क्रमप्राप्तच होतें; पण त्यांच्या अंदाजापेक्षा खूपच खर्च जास्त झालेला होता. मूळ नकाशांत व ठरविलेल्या कामांत प्रत्येक वेळीं सुधारणा व वाढ करीत गेल्याचा तो परिणाम होता. प्रत्येक गोष्टीस १००–२०० रुपयेच जास्त लागले; पण अशा १५–२० गोष्टींमुळे ३ ते ४ हजार रुपयांनी कंत्राटदाराचें बिल, रास्तपणेंच वाढलें होतें. कंत्राटदाराला पूर्ण कल्पना होती की, संपूर्ण बिल एकदम दिलें, की रामभाऊ तपशिलाबाबत तंटे करणार. त्यांनी अगोदरच त्याचा बंदोबस्त करून रामभाऊंचें तोंड बंद करून टाकलें होतें.

दिल्ली, आग्रा वगैरे पाहावयास गेलेल्यांपैकी बहुतेकांना काय काय पाहावयाचें व कोणत्या अनुक्रमाने पाहावयाचें, हें निश्चित करतां येत नाही. राहण्याचा, खाण्याचा व वाहतुकीचा खर्च अपेक्षेपेक्षा जास्त होऊं लागतो आणि पाहण्याजोगीं ठिकाणें इतकीं असतात की, प्रत्येक ठिकाण पाहिलेंच पाहिजे असें वाटूं लागतें. त्या कारणाने कधी कधी महत्त्वाचीं ठिकाणेंहि पाहावयाचीं राहून जातात; त्यासाठी पैसा अथवा वेळ किंवा दोन्हीहि उरतच नाही. ट्रिपला जाण्यापूर्वीच आपल्या बजेटांत कोणत्या कोणत्या गोष्टी पाहावयाच्या हें अभ्यासपूर्वक ठरविलें, तर असा प्रसंग येत नाही. वेरूळचीं लेणीं पाहतांना प्रत्येकच लेण्यांत अवास्तव वेळ घालवला, तर प्रत्यक्ष 'कैलासां'तहि राम वाटणार नाही !

खर्चांचें बजेट असावें, त्यांत अनुक्रम असावा, ही गोष्ट सर्वांना तत्त्वतः तरी पटते; पण वेळाच्या बाबतींतहि अंदाज बांधण्याची,

बचतीची, अनुक्रम ठरविण्याची आणि वेळाची एकूण मर्यादा न उल्लंघण्याची तशीच जरूरी असते, हें चटकन् लक्षांत येत नाही. आपण आपला वेळ कसा व किती खर्च करतों ह्याचा साकल्याने विचार केला आणि त्या प्रश्नाकडे स्वतंत्र बुद्धीने, निरीक्षकाच्या दृष्टीने पाहिलें तर आपली उधळपट्टी आपल्या सहज लक्षांत येईल.

साध्या करमणुकीचें, विश्रांतीचें उदाहरण आपण घेऊं या. दिवसाकाठीं किती वेळ त्यासाठी मिळावा? आपलें नित्याचें कर्तव्य कार्यक्षमतेने करतां यावें, ह्यासाठी मधून मधून तें काम बंद ठेवून मन व शरीर ताजेतवानें करणें व नव्या कामास तें तयार करणें हा विश्रांतीचा आणि करमणुकीचा प्रधान हेतु असला पाहिजे. इंग्रजी भाषेंतील 'रिक्रिएशन' हा शब्द हा अर्थ नेमका स्पष्ट करून दाखवितो. रि म्हणजे पुनः आणि क्रिएशन म्हणजे निर्मिति. मनुष्याला उत्साह व शक्ति ज्यामुळे पुनः प्राप्त होते, त्यास 'रिक्रिएशन' म्हणावयाचें. विश्रांति आणि करमणूक ह्यांनी असें नवचैतन्य घडवून आणलें पाहिजे. ५० मिनिटें मार्चिंग केल्यानंतर १० मिनिटें सैनिकांना विसाव्यासाठी देतात; पुढील दौड करण्याकरिता ते त्यामुळे समर्थ होतात. पण ५० मिनिटें विश्रांति व १० मिनिटें दौड, असें केलें तर प्रगति कितपत होईल? आपण रोजच्या २४ तासांत किती तास विश्रांति घेतों, आठवड्यांतून, महिन्यांतून किंवा वर्षांतून किती दिवस सुट्टी उपभोगतों, ह्याचा विचार केला तर कित्येकांना जरूर तो बदल व विसावा मिळतच नाही असें आढळतें. उलट, कित्येकांना फुरसतच जास्त मिळते, किंवा जरूर नसतांनाहि ते विश्रांति उपभोगतात, असें दिसून येतें.

दुपारीं सिनेमा पाहण्यांत दोन-अडीच तास खर्च करून पुनः रात्रीं पत्ते किंवा कॅरम खेळणें, संध्याकाळीं फिरून आल्यावर जेवणानंतर गप्पांसाठी बाहेर पडणें, इत्यादि गोष्टींचें समर्थन ह्या निकषावर करता येणें कठीण आहे. विश्रांति आणि करमणूक हीं जरुरीपेक्षा जास्त

झालीं, तर त्याचा फायदा कमी, कमी प्रमाणांत पदरांत पडतो आणि नंतर विश्रांतीचाहि कंटाळा येऊं लागतो. एवढ्यावरहि गाडें थांबत नाही. करमणुकीच्या कार्यक्रमाच्या ताणामुळे दुसऱ्या दिवशीच्या कामावरहि प्रतिकूल परिणाम होतो. रात्रीं नाटक-सिनेमा, गाणें, ह्यांसाठी जागरणें करावयाचीं व दुसऱ्या दिवशीं कामाच्या वेळीं जांभया व डुलक्या घ्यावयाच्या, ह्यांत काय साधलें ? करमणुकीमुळे फायदा अधिक झाला, की तोटा ?

खऱ्या, माफक करमणुकीमुळे असा तोटा कधीच होणार नाही. त्या मर्यादेंतच करमणूक राखली पाहिजे. तेल घातल्यामुळे यंत्र अधिक चांगलें चालतें, हें खरें आहे. पण, वंगणाचा अतिरेक झाला, तर यंत्राच्या गतीस अडथळा निर्माण होतो आणि वंगण वाया जातें तें वेगळेंच. करमणुकीचें कामाशीं प्रमाण वंगणाप्रमाणेच योग्य तेवढें राखलें पाहिजे. यंत्रसामग्रीच्या दर्जाप्रमाणे वंगणाचाहि दर्जा असावा लागतो; करमणुकीच्या बाबतींत सुद्धा हें खरें आहे. शरिराला व मनाला योग्य करमणुकीचा डोस योग्य प्रमाणांत दिला की शरीर व मन ताजेतवानें होतें; एकाच प्रकारचा डोस सर्वांना हितकारक होत नाही. कामांत बदल केल्यानेंहि मनावरील व डोक्यावरील ताण कमी होतो असा अनुभव आहे.

आपल्या दैनंदिन व्यवहारांत पतिपत्नी एकमेकांसाठी, मुलांसाठी, आईवाडिलांसाठी, मित्रांसाठी किती वेळ देतात व दिलेला वेळ प्रमाणशीर असतो किंवा नाही, ह्याची पाहणी उद्बोधक ठरेल. ह्याबाबत आढावा घेतला, तर कितीतरी जणांना स्वतःच्या गुन्हेगारीची जाणीव होईल. मित्रांशीं तासन् तास चकाट्या पिटणाऱ्यांना पत्नीशीं दोन शब्द बोलण्यास सवड होत नाही किंवा मुलांची चौकशी करण्यास वेळ मिळत नाही ! गांवभर हिंडणाऱ्या पत्नीला सासूबाईंच्या साध्या चहाच्या वेळेचें भान राहात नाहीं आणि मुलांच्या जेवणाच्या वेळा सांभाळतां येत नाहीत; इतकेंच काय, पतीचे मोक्याचे प्रसंग साधून स्वतःचें हितहि

साधतां येत नाही. दिवसांतून किती वेळ शेजारणीशीं बोलण्यांत घालवावा, किती वेळ लोळत कथा-कादंबऱ्या वाचाव्या, ह्याला कांही सुमारच राहात नाही. मग आवश्यक गृहकृत्यांस सवड कशी उरणार ? ह्या बाबतींत कांही अतिशय दोषी असतील, तर कित्येकांना वरील वर्णन लागूच पडणार नाही. पण सामान्यत: प्रत्येकाला थोडी तरी सुधारणा करणें शक्य होईल, हें खास.

विद्याधर व सरस्वती ह्या दोघांनी आपली पैशाची व वेळेची ऐपत पाहून त्याप्रमाणे पूर्वयोजना केलेली असते. त्यापैकी पैशाच्या बजेटाचा विचार येथे करण्याची आवश्यकता नाही. पण वेळेसंबंधी त्यांची योजना विशेष उद्‌बोधक आहे. दिवसांतून किती कमाल वेळ वाया जावा, हें त्यांनी ठरवून टाकलें आहे, आणि वाया गेलेला वेळ भरून काढला पाहिजे, असा त्यांचा संकेत आहे. वेळ भरून काढणें जरा त्रासाचें होतें; त्या कारणाने तशी वेळ येऊं न देण्याकडे दोघांचेंहि स्वाभाविकच लक्ष असतें. आठवड्यांतून किती संध्याकाळीं सरस्वतीने बाहेर जावें, किती संध्याकाळीं घरीं राहावें, महिन्यांतून किती पाहुण्यांना जेवावयास बोलवावें, किती वेळ पत्ते खेळावे, ह्याबाबत त्यांचे अलिखित नियम आहेत. हे नियम अगदी काटेकोरपणें पाळण्याचा त्यांचा उद्देश नसतो; कारण त्यामुळे संसारांतील लवचीकपणा व रम्यता नाहीशी होऊन जाईल. पण, ध्रुवताऱ्याप्रमाणे, मार्गदर्शक म्हणून त्यांकडे ते दोघेहि पाहतात; कधी कधी जाणूनबुजून नियम मोडून मजा मारतात. पण आपण आपला इष्ट मार्ग सोडून चाललेलों नाहीना, ह्याची ते मधून मधून पाहणी करतात. "ह्या महिन्यांत खर्च फार झाला आहे, म्हणून कापडखरेदी पुढच्या महिन्यांत करूं" असें पुष्कळ पति-पत्नी म्हणतात; पण "ह्या आठवड्यांत आपला वेळ फार वाया गेला आहे; पुढच्या आठवड्यांत तो भरून काढलाच पाहिजे" असें म्हणणारे विद्याधर-सरस्वती विरळेच !

पैशाच्या बचतीची गोष्ट वेगळीं; पण वेळेच्या बचतीचा आणि करमणूक व विश्रांति ह्यांवर बंधन घालण्याचा, एवढा आग्रह कां ? आपल्या जीवनाचें यांत्रिकीकरणाचा हा अट्टाहास कां? असे प्रश्न उपस्थित होण्याजोगे आहेत. रोजच्या कटकटींतून मुक्तता होण्यासाठी प्रत्येकजण प्रयत्न करीत असतो; थोड्या विश्रांतीची व करमणुकीची त्याला अतिशय गरज असते. शारीरिक व मानसिक ताण, अपुरी प्राप्ति, नोकरीची अशाश्वति, असमाधानकारक, इतकेंच नव्हे तर असह्य अशीं राहण्याचीं बिऱ्हाडें, तंटे, गैरसमज, तगादे, ह्यांतून कांही काळ तरी सोडवणूक होणें आवश्यक असतें, हें खरें आहे आणि ती प्रत्येकाला अवश्य मिळाली पाहिजे.

खरा प्रश्न आहे तो एवढाच, की ही सोडवणूक व विश्रांति मिळवितांना थोडा विचार केला जातो किंवा नाही ? भूक लागल्यावर पोटांत अन्न जाणें जरुरीचें असतें; अशा वेळीं भजीं किंवा दहीमिसळ किंवा पुरीभाजी किंवा केळीं खाऊन ती भूक भागवितां येते. पोट तात्पुरतें शांत झाल्यासारखें वाटलें, तरी कांही वेळाने तें दुखूं लागतां कामा नये, व शरिराची हानि खरोखरच भरून निघावी, ह्या दृष्टीनेच त्यापैकी अन्नाची निवड नको का करायला ? नुसतेच जिभेचे चोचले पुरविण्याचें योजलें, तर कसें चालेल ? पोट तक्रार करूं लागण्यापूर्वीच जिभेवर बंधन आलें पाहिजे. विश्रांति आणि करमणूक ह्यांच्या बाबतींत हाच न्याय लागू पडेल. त्यामुळे शरीर व मन ह्यांची तक्रार बंद झाली पाहिजे; इतर मार्गांनी ती वाढतां कामा नये. ह्यासाठीच करमणूक, तिचा प्रकार, तिची वेळ, तिला द्यावी लागणारी किंमत, ह्या सर्वांची छाननी करण्याची सवय लागली पाहिजे. पैसे अपुरे पडतात, म्हणून त्याच्या व्ययाबद्दल जबाबदार लोक बेफिकीर राहूं शकत नाहीत; वेळेच्या व्ययासहि त्याच जबाबदारीच्या दृष्टिकोनाची गरज आहे. अपवाद म्हणून कांहीहि करावयास हरकत नाही ! पण, तें जाणतेपणाने !

पैशाची काटकसर करून आपण काय करतों? वांचवलेले पैसे पुनः केव्हा तरी खर्चच करतों की नाही? फरक एवढाच की, त्याच पैशांतून अधिक सुख मिळवूं पाहतों; मोबदला वाढविण्याचा प्रयत्न करतों. कोट-टोपीचा खर्च वांचवला, म्हणून शर्ट-पँट इस्त्रीची वापरतां येते; नऊवारी-ऐवजी पांचवारी पातळें नेसल्याने होणारी कापडाची बचत पातळांची व इतर कपड्यांची संख्या वाढवून खर्च केली जाते. एका तोळ्याचा दागिना करून घालण्याऐवजी त्या पैशांत विजेवर स्वयंपाक करण्याचें साधन उपभोगतां येतें आणि संतति नियमित राखण्यासाठी येणाऱ्या खर्चामुळे किती तरी जास्त खर्चास आळा बसून, संसारांतील अडचणींची वाढ रोखून धरतां येते.

वेळेच्या व्ययाच्या बाबतींतहि संयम आणि दूरदर्शीपणा ह्यांचा अवलंब केला, तर त्याच वेळांत जास्त सुख-समाधान निर्माण करतां येतें, किंवा दुःखाचा भार हलका करतां येतो, अथवा घराकडे जास्त लक्ष देतां येतें. मुलांच्या अभ्यासाकडे वेळींच लक्ष पुरविलें, तर त्या वेळेचें भांडवल पुढे भरपूर व्याज देतें. रेडिओवरील श्रुतिका किंवा शेजाऱ्यांच्या उखाळ्या-पाखाळ्या काढणें, ह्यास प्राधान्य दिलें गेलें, आणि इकडे मुलगा नापास होऊं लागला, तर त्याचा कांही अंशीं दोष पालकांच्याकडेच जाईल, किंवा नाही? मुलांचे पाठ घेणें, त्यांना गोष्टी सांगणें, ह्याकडे अप्रिय काम म्हणून न पाहतां, आवडीने त्याकडे लक्ष दिलें, तर त्यांत कर्तव्य आणि करमणूक हीं दोन्हीं साधूं शकतात.

करमणुकीसाठी नाटक, सिनेमा, इत्यादि बाहेरील साधनांचीच आवश्यकता आहे काय? आपण आपल्या आवडी-निवडीस लावावें तसें वळण लागतें. कांही जणांना नक्षत्र-तारे बघून करमणूक वाटते, तर कांही जण समुद्राच्या लाटांकडे किंवा हिरवळीकडे पाहात बसतात, तर कांहींना दरवाजांत किंवा खिडकींत उभें राहून रस्त्यावरील ये-जा पाहिल्याखेरीज बरें वाटत नाही. पंडित नेहरू पोहायला मिळण्याची

संधि सोडीत नाहीत तर चार्चिल चित्रें काढून करमणूक करून घेतो; आयसेन होअरला गोल्फची गोडी आहे; बाबूराव जगताप सूत काढीत बसतात. ज्याने त्याने आपली आवड सुधारत नेऊन करमणुकीचा दर्जा वाढविला आणि करमणुकीला रोजच्या जीवनांत आवश्यक तें स्थान दिलें, तर तीच करमणूक मनुष्याची कार्यक्षमता वाढवूं शकेल. पण ज्या करमणुकीने मनुष्य तात्काळ किंवा कालांतराने खालच्या पातळीला जाईल ती करमणूक त्याज्यच ठरविली पाहिजे. रेसकोर्सवर जाऊन रेस खेळून करमणूक होते, त्याचप्रमाणे ग्रंथांच्या वाचनांतहि मन रमूं शकतें; इतकेंच काय, आपल्यापेक्षा अभागी लोकांच्यासाठी आपल्या विश्रांतीच्या वेळांत कष्ट केले तरी ते कष्ट मनाला शांतीच देतात. करमणूक म्हणजे पैशाचा, वेळेचा खर्च नव्हे; ती एक किफायतशीर गुंतवणूक आहे.

खाण्या-पिण्यांत सात्त्विक आहाराचें जें महत्त्व आहे, तेंच रोजच्या जीवनांत सात्त्विक करमणुकीचेंहि पण आहे. म्हणून करमणुकीची निवड त्या दृष्टीनेच केलेली बरी. साहित्य, संगीत, कला, इत्यादींचा त्या दृष्टीने विचार होणें इष्ट दिसतें. त्यांची आवड लावून घेतली तर शुद्ध करमणूक सहज शक्य होते. रेडिओचा ह्या दृष्टीने चांगला उपयोग होण्याजोगा आहे. भजनें, स्तोत्रें, नामसंकीर्तन, पूजा, इत्यादींचें आपल्या कौटुंबिक जीवनांतील स्थान नाहिसें होत चाललेलें आहे, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. त्यामुळे सोज्ज्वळ, सुसंस्कृत, धार्मिक वातावरणास आपण मुकत आहों, आणि त्यांची जागा घेणारी करमणूक त्यांचें कार्य करूं शकत नाही. रात्रीं जागरण करून पत्ते खेळणारी मंडळी सिगारेट ओढतात, पान खातात, भलत्या वेळीं पेयें पितात आणि झोप व त्यामुळे येणारें स्वास्थ्य ह्यांस गमावून बसतात. दिवसभर मेहेनत करणारे लोक रात्रभर भजन करतात, पण त्याने त्यांना थकवा येत नाही. उलट, दुसऱ्या दिवशीं ते पहिल्या दिवसाइतकेच हुरुपाने काम करतात, असा अनुभव आहे.

भोजनाला रुचि आणण्यासाठी, पक्कान्नाबरोबर चटणी, कोशिंबीर, पंचामृत, इत्यादि पानांत वाढण्यांत येतात. मुख्य अन्नाचें सेवन चांगलें व्हावें, ह्यासाठी मिरची व कांदा हीं भाकरीबरोबर खातात. पण आपण नुसत्या चटणी-कोशिंबिरीवर व मिरचीवर ताव मारूं लागलों, तर काय होईल? पौष्टिक अन्न पोटांत जाण्याऐवजी उपऱ्या अन्नाचीच भर पडेल; त्यानें शरिराचें योग्य प्रकारें पोषण होणार नाही. त्याचप्रमाणे, रोजच्या कामास करमणुकीनें मदत होण्याऐवजी, कामांत ती व्यत्यय आणूं लागली, तर कसें चालेल? आपण गतायुष्याची छाननी केली, तर वाया गेलेल्या वेळांत आपण काय काय करूं शकलों असतों हें लक्षांत येईल व शक्यतेच्या मानानें, आपण किती कमी प्रतीचे राहिलों, हें समजून आपण ह्यापुढे तरी वेळेचा अधिक योग्य उपयोग करण्याचा प्रयत्न करूं.

जीवन हें उपभोगण्यासाठी आहे; कर्मठपणामुळेच आपण इतके दुःखी व गंभीर झालों आहों, 'एंजॉय' कसें करावयाचें हें आपल्या लोकांना कळतच नाही, असें म्हणणारांनासुद्धा सुखाचा अधिकाधिक उपभोग घेण्याकरिता योजनेचा व अनुक्रमबद्धतेचा फायदाच होईल. सुखसाधनांतहि त्यांना आधी-मागून, चांगलें-वाईट, शाश्वत-अशाश्वत, स्वस्त-महाग, हें पाहून घ्यावें लागेलच आणि कमींत कमी वेळ 'वाया' जावा, हें उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवावेंच लागेल. म्हणून, त्यांच्या दृष्टीनेंहि पैशाप्रमाणे वेळेच्या बचतीचें महत्त्व आहेच. कोणताहि सिनेमा चुकूं नये ह्यासाठी सिनेमाशौकिनांना इतर कांही शौकांचा त्याग करावाच लागतो, आणि तारतम्य वापरावेंच लागतें. तारतम्याच्या ज्ञानाचा उपयोग कोणीं व कशासाठी करावा, हा प्रश्न वेगळा.

पैशाचा विनियोग उदरभरण व सुखसमाधानाची प्राप्ति, ह्यांकडे मुख्यतः केला जातो; त्याचप्रमाणे वेळेच्या बचतीसाठींहि पैसा वापरला जातो. चालत जाण्याऐवजी सायकल, बस, टांगा, रिक्शा, टॅक्सी, ह्यांच्या भाड्याला पैसे देण्यांतील एक हेतु वेळ कमी लागावा, हा असतो.

दळणाचीं घरचीं जातीं कां बंद पडलीं ? घरांत शिवणाचें यंत्र कां विकत घेतलें जातें ? कुकर कां खरेदी केला जातो ? विजेच्या शेगड्यांचा कां प्रसार होऊं लागला आहे ? टेलिफोन खात्याचें उत्पन्न कां वाढत आहे ? विमानांतून प्रवास करणारांच्या संख्येंत कां भर पडत आहे ? पॅसेंजर गाडीऐवजी एक्सप्रेस-मेलमधून जाण्यासाठी जास्त दराचीं तिकिटें लोक कां काढतात ? वेळेची बचत, हा त्या सर्वांच्या बुडाशीं एक हेतु असतोच ना ? म्हणजे पैशाने आपण वेळ विकत घेतों असा अर्थ झाला.

विकत घेतलेल्या इतर जिनसांप्रमाणेच वेळेचाहि काटकसरीने उपयोग करावयाला हवा; वेळ इतर जिनसांप्रमाणे टिकविली पाहिजे, असा त्याचा नाही का अर्थ होत ? ज्याच्या वेळेला महत्त्व नाही, हवा-पाण्याप्रमाणे ज्याच्याजवळ भरपूर वेळ आहे, त्याने वेळ वांचविणाऱ्या साधनांचा उपयोग करून काय साधलें ? नासायला अधिक वेळ मिळेल एवढेंच ना ? पैसा खर्चून वेळ मिळवावयाची, पण ती वाया घालवावयाची, हें समर्थनीय होणार नाही. दुसरी गोष्ट अशी की, आयुष्य हें मर्यादित असल्याकारणाने गेलेली वेळ पुनः मिळवितां येणें अशक्य असतें. काळाला पकडून राबविलें नाही, तो एकदा हातचा गेला, की गेला ! दुष्काळी भागांतील लोक पाणी जपून वापरतात; एकहि थेंब वाया घालवीत नाहीत. गोड्या पाण्याचा उपयोग कपडे धुण्याकडे केला तर खारें पाणी पिण्याची पाळी येईल हें तेथील लहान मुलांसहि समजतें. विचारी माणसाने वेळेच्या व्ययाकडे जाणतेपणाने लक्ष पुरविलें पाहिजे.

" अजून कितीतरी करायचं शिल्लक आहे आणि कितीतरी कमी करून झालंय् " असाच विचार प्रत्येक दिवसाच्या अखेर मनांत घोळत राहणें, हें प्रगतीचें सुचिन्ह आहे.

— सह्याद्रि

●●●

गेल्या पन्नास वर्षांत महाराष्ट्रीय स्त्रीला वाढत्या प्रमाणांत शिक्षण व संधि मिळाली असली तरी तिची कौटुंबिक जबाबदारीहि या काळांत अनेक पटींनी वाढलेली आहे. बदललेल्या परिस्थितींत सुशिक्षित स्त्री किती भिन्नभिन्न कर्तव्यें पार पाडीत आहे याचा नीट विचार केला म्हणजे ती कुटुंबाचें सौख्य कसें वाढवीत आहे तें लक्षांत येतें.

स्त्री-शिक्षणाचा प्रसार आता बराच झाला असून तो आणखी झपाट्याने वाढत आहे. सुशिक्षित स्त्री ही एक केवळ चित्ताकर्षक, चमत्कारिक अशी चीज उरलेली नाही. तिचें वास्तव्य बंगल्याप्रमाणे चाळींतहि आता आढळतें. शिकलेल्या मुलीला तिच्याइतका तरी शिकलेला पति मिळेलच असें सांगतां येत नाही; उलट, ह्यापुढील नोकरांत श्रमिकांचा भरणा जास्त होत गेला, म्हणजे पदवीधर स्त्रियांना त्यांच्यांतूनच पति निवडावा लागणार आहे. संसाराला आर्थिक हातभार लावण्यासाठी स्त्रियाहि वेगवेगळे व्यवसाय व नोकऱ्या ह्यांत शिरल्या आहेत आणि घरचीं कामें संभाळूनाहि त्या मोठ्या उमेदीने द्रव्यार्जन करीत आहेत.

थोडक्यांत म्हणजे, समाजाच्या सर्व पातळींत व क्षेत्रांत सुशिक्षित स्त्रिया आढळतात; कोणत्याहि जातीची किंवा वर्गाची ती मक्तेदारी उरलेली नाही. ह्या कारणाने त्यांच्यापुढील प्रश्नांची विविधता, बिकटपणा, इत्यादींत भर पडत जाते. शिक्षणामुळे नवींनवीं कामें व जबाबदाऱ्या पेलण्याची त्यांच्यावर पाळी येते. काम करण्याची हातोटी वाढली की कामेंहि वाढतात आणि त्यांच्यासंबंधी अपेक्षाहि विस्तार पावतात. इकडे आर्थिक पाठबळ मात्र अपुरें पडूं लागतें. ह्या सर्व अडचणींतून पार पडण्याच्या नैपुण्यानेच स्त्रियांच्या सुशिक्षितपणाची किंमत केली जाणार हें उघड आहे.

आधुनिक स्त्रियांना कौटुंबिक स्वास्थ्य राखतां येत नाही, त्यांचे संसार सुखाचे होत नाहीत, असें म्हटलेलें वारंवार ऐकूं येतें. पूर्वीच्या अशिक्षित स्त्रियांचे संसार कितीतरी समाधानाचे असत असेंहि सांगितलें जातें. पूर्वीच्या व आधुनिक स्त्रियांच्या संसारसुखाची तुलना करतांना गृहीत धरलेल्या गोष्टीहि वास्तविक सारख्याच असावयास हव्यात, हें उघड आहे. भिन्न परिस्थितीचे परिणामहि भिन्न होत असतात; तेव्हा त्यांतील व्यक्ति व त्यांचे व्यवहार ह्यांच्यांतील सरस-निरसपणा ठरवितांना विवेचक बुद्धीच वापरली पाहिजे. पण तसें होत नाही. जुन्या पिढींतील स्त्रियांचे संसार सुखाचे होत असत असें गृहीत धरावयाचें व आधुनिक स्त्रियांच्यापुढील अडचणी लक्षांत न घेतां त्यांच्या संसारांना कमी प्रतीचे ठरवून मोकळें व्हावयाचें हें तर्कशुद्ध खास नाही. एखाद-दुसऱ्या अपवादात्मक उदाहरणावरून सुशिक्षित स्त्रियांबद्दल भरमसाठ सिद्धान्त रचणें आणि मग हा चुकीचा सिद्धान्त सर्व सुशिक्षित स्त्रियांना लागूं करणें, हा शुद्ध अन्याय आहे.

पूर्वीच्या पिढींतील स्त्रियांचे संसार सुखाचे होते असें मानलें तरी तें सुख कोणत्या पातळीचें व प्रकारचें होतें व त्या सुखाने आजच्या स्त्री-पुरुषांचें समाधान होईल काय, हा मोठा चिंतनीय प्रश्न आहे. पूर्वीच्या गृहिणींना सासू-सासरे व पति ह्यांच्या हुकमतीखाली राहावें लागे; स्वतः कोणताहि निर्णय घेण्याची किंवा डोक्याला शीण देण्याची त्यांना पाळीच येत नसे. दुसऱ्याच्या मर्जीप्रमाणे वागणें, आपलें मन मारणें, पटत नसलेल्या गोष्टीहि निमूटपणें मान्य करणें, नेमून दिलेल्या कामापलीकडे कशांतहि लक्ष घालण्यास बंदी असणें, अशा तऱ्हेच्या शिकवणींत वाढलेल्या गृहिणींच्या संसारांत शांतता आढळली तरी ती ताबेदारीमुळे निर्माण झालेली सामसूम होती. कर्फ्यू ऑर्डर जारी केली म्हणजे शहरांत निश्चलता नांदते; पण तें स्वास्थ्य व सुख ह्यांचें लक्षण खास नव्हे. पूर्वीच्या स्त्रियांना आपली तक्रार मांडण्यासहि

मोकळीक नव्हती; आधुनिक स्त्रिया थोड्या बोलक्या झाल्या, म्हणून केवळ संसारसुखच कमी झालें असा अर्थ लावतां येणार नाही.

सुशिक्षित स्त्रियांच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन विवेचक, सारासार विचार करणारा असा वास्तविक असावयास हवा. परंतु त्यांना अपेशी ठरविण्यासाठी इतरांचा प्रयत्न सतत चालू असतो. त्यांच्याकडून भरमसाठ गोष्टींची अपेक्षा बाळगावयाची, त्यांच्या नसलेल्या दोषांची व चुकांची दवंडी पिटावयाची, त्यांच्या अडचणींचा विचारहि करावयाचा नाही, असेंच नेहमी आढळतें. अशा नामोहरम करणाऱ्या परिस्थितींतून सुशिक्षित गृहिणींना मार्ग काढावा लागतो. त्यांच्या अडचणी आणि त्यांच्यापुढील प्रश्न ह्यांची इतरांना कल्पनाहि येऊं शकत नाही.

आजच्या परिस्थितींत पंचवीस वर्षांपूर्वीच्या स्त्रिया कितपत यशस्वी झाल्या असत्या ह्याचाहि विचार झाला पाहिजे. चार-पांच मुलगे व मुली होण्यावर कौटुंबिक सुखाचें मापन करण्याचे दिवस आता राहिलेले नाहीत. “ निमूटपणें काम करणारी गुलामी स्त्री ” ही पत्नीची भूमिका उरलेली नाही व आताच्या पतीचीहि तशी भावना नाही. कधीकधी तोहि तिच्याबरोबर झटतो आणि लहर आली तर तिच्या हाताखाली सैपाकघरांत काम करतो ! घरांत पति-पत्नीच्या नात्यास आता अधिकाधिक महत्त्व प्राप्त होत चाललेलें आहे आणि घरांतील इतर मंडळींपेक्षा, कधीकधी लहान मुलां-बाळांपेक्षाहि, पतीस तिने अग्रस्थान देणें अगत्याचें ठरतें.

तथापि, इतरांकडे दुर्लक्ष करून चालत नाही. म्हणजे पत्नीवरील शारीरिक व मानसिक ताण कितीतरी वाढतो. पतीच्या व्यवसायांत तिने लक्ष घातलें नाही तरी त्याच्या बोलण्याचें आकलन होण्याइतपत व प्रसंगविशेषीं चौकशी करतां येण्याइतपत तरी तिला त्या व्यवसायाचें ज्ञान असावें लागतें. मुलांचें संगोपन व जोपासना, आल्या-गेल्याचें यथोचित स्वागत, शेजारधर्म राखणें, नातेवाइकांशीं स्नेहाचे संबंध

कायम ठेवणें, इत्यादि गोष्टी सुशिक्षित गृहिणीला इतरांच्यापेक्षा अधिक चांगल्या तऱ्हेने करून दाखवाव्या लागतात. नाहीतर तिच्यावर ठपका आलाच म्हणून समजावें! आर्थिक बाबतींतहि तिलाच लक्ष घालून संसाराचें बजेट आखावें लागतें व पतीच्या खर्चासहि वळणदार मर्यादा घालावी लागते. घरखर्चासाठी अत्यावश्यक अशा एकेका पैशासाठी पतीची मनधरणी करावी लागण्याचा काळ केव्हाच बदललेला आहे; आता तिच्यावरच कुटुंबाची मिळकत व गरजा लक्षांत घेऊन स्वतःच तारतम्याने खर्च करण्याची जबाबदारी येऊन ठेपली आहे. पतीलाच उलट सबुरी शिकविणें तिच्या कामांत येऊन बसलें आहे.

जीवन जसजसें व्यापक व प्रगत होत जातें, तसतसे नवेनवे प्रश्नहि निर्माण होतात व सुधारणांबरोबर धोकेहि उपस्थित होतात. नव्या राहणीमुळे अडचणी वाढल्या तरी ताळेबंदांत सुखाचाच वाढावा उरतो व त्या वाढाव्यांत भर पडत जाते. आधुनिक राहणींतील ठेचा व टक्केटोणपे आणि त्यांतील स्पर्धा व चलती-मंदी ह्यांतून यशस्वी होण्यांतील मौज कांही और असते. त्याची प्रचीति ज्यांना नाही, ते सुखी मानले गेले तरी त्या सुखाची पातळी व त्याचा प्रकार वेगळयाच स्वरूपाचा असणार हें उघड आहे.

चाकोरींतून जाणाऱ्या बैलगाडीपेक्षा डांबरी रत्यावरून जाणाऱ्या मोटारगाडीमुळे अधिक गंभीर अपघात होऊं शकतात, म्हणून कोणी श्रीमंताने आपल्या मोटारी विकून बैलगाड्या ठेवल्याचें ऐकिवांत नाही! विमानाच्या अपघाताचा धोका पत्करूनहि आगगाडीपेक्षा विमानानेंच दूरचा प्रवास करणें क्रमप्राप्त आहे. पुढेपुढे जात असतांना पदरांत पडणाऱ्या तोटयापेक्षा फायद्याचें प्रमाण वाढतें हें पाहिलें म्हणजे झालें. जलद जाणाऱ्या वाहनांचे अपघात टाळण्यासाठी आवश्यक ते उपाय योजणें, कार्यक्षमता वाढविणें आणि अपघात झालाच तर त्याच्या दुष्परिणामांची तीव्रता कमी करणें, हा प्रगतीचा मार्ग आहे. पण त्या मार्गाने न जातां,

'बैलगाडीच बरी' असें म्हणून चालणार नाही. वाढत्या स्पर्धेच्या जगांत आपण ओघाविरुद्ध एकटे जाऊं लागलों तर तें हिताचें होणार नाही. तेव्हा, सुशिक्षित स्त्रियांचे संसार सुखाचे होत नसतील किंवा त्यांच्या संसारांतील सुख वाढावयाचें असेल, तर त्याला उपाय म्हणजे आणखी पुढे जाऊन सुखाचीं साधनें आत्मसात् करणें हा आहे. शिक्षणांत आवश्यक तो बदल, अधिक चांगल्या सामुग्रीचा पुरवठा, भोवतालच्या वातावरणाचें शुद्धीकरण, हार्दिक प्रोत्साहन, इत्यादि मार्गांनी सुशिक्षित गृहिणीच्या कामगिरीस पाठबळ पुरवलें गेलें पाहिजे.

घरांत डांबलेली स्त्री रस्त्यावरील मोटारखाली कधी सापडणार नाही, गुंडांच्या नजरेस ती पडणार नाही, उन्हाने ती करपणार नाही व पावसाने ती गारठणार नाही. पण तिला जन्माला येऊन काय मिळणार व कौटुंबिक सुखांत ती भर काय घालणार? सुशिक्षित स्त्रियांना जगांत वावरून, त्याचा आनंद उपभोगून, त्यांतील प्रसंगांपासून धडे शिकून, स्वतः आनंदी होण्याची व इतरांना आनंदी करण्याची नवी नवी संधि मिळत असते. अशांचा सहवास कुटुंबियांना आल्हादकारक व कार्यप्रवण होत असतो. सुशिक्षित स्त्रियांच्या संसारांतील ही रोचकता इतरांना कशी समजणार?

जीवनांतील कटकटी वाढल्या आहेत; त्यामुळे संसारसुखाची गरज अधिकच तीव्र झाली आहे. पण तें मिळवून देणेंहि अधिकाधिक अवघड होत चाललें आहे आणि संसारसुखाच्या अपेक्षाहि उंचावत आहेत. अशा परिस्थितींत आधुनिक गृहिणी संसारसुख कसें राखीत आहेत, हें पाहिलें म्हणजे तिच्याबद्दल आदरयुक्त कौतुक वाटूं लागतें.

आधुनिक वधु आणि वर ह्या दोघांचेंहि वय पूर्वीच्या काळच्या वधूवरांच्या वयाच्या मानाने कितीतरी जास्त असतें. तिच्या स्वतःच्या व पतीच्या शिक्षणांतहि फार मोठी तफावत नसते. प्रत्येक घरांतील राहणी



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम. [illegible] दि. [illegible]

व रीतिरिवाज हीं थोडींतरीं भिन्न असतातच व त्यांत समरस होण्यास सोपें जाईल इतकें ह्या नववधूचें वय कमी नसतें. मुली सुशिक्षित झाल्या तरी त्यांना 'दाखवून'च त्यांचे विवाह ठरवावे लागतात; अशा वयांत व अशा रीतीने विवाह झाला तरीसुद्धा सुशिक्षित स्त्रिया प्राप्त परिस्थितींत, प्रसंगानुसार मिळतील त्या संधींचा सदुपयोग करून, आपले संसार सुखाने करीत असलेल्या आढळतात.

पति-पत्नीच्या नात्यास सुशिक्षित स्त्री प्राधान्य देते; पण सासरच्या सर्व मंडळींना नाखूष न करतां हें तिला साधावयाचें असतें. घरांतील वडील माणसांच्या बरोबर जेवणें, खाणें व बसणें आणि त्यांचा मान राखणें ह्यांत वास्तविक विसंगति असण्याचें कारण नाही; पण जुन्या पिढींतल्या लोकांच्या त्याबाबत कल्पना वेगळ्या असतात. आपल्या पत्नीने एकेरी गोड नांवाने आपल्यास हाक मारावी, असें नवविवाहित पतीला वाटत असतें. पत्नीलाहि तें नको कोठे असतें ? हा शुद्ध आनंद त्यांना उपभोगावयाचा असेल, तर जरा तारतम्याने तें साधण्याजोगें असतें. बाबांच्या देखत पतीला 'हे' म्हटलें व मग 'मधू' म्हणून मारलेली हाक त्यांनी दुरून ऐकली तरी ते सुनेचें कौतुकच करतात. उदाहरण म्हणून हें सांगितलें. संघर्ष टाळून व जरा सबुरीने आणि कौशल्याने आपलें सर्व कांही साधतां येण्याजोगें असतें.

पतीच्या आवडी-निवडी संभाळणारी सुशिक्षित पत्नी पतीकडूनहि प्रेमाची व सहकार्याची अपेक्षा बाळगते आणि तें स्वाभाविकहि आहे. तिच्या शिक्षणामुळे व समाजांतील वावरामुळे तिला योग्य वा अयोग्य हें चांगलें समजूं शकतें; जुन्या काळच्या पत्नीप्रमाणे ती गरीब बापडी गाय राहिलेली नसते. ती पतीची इतर पुरुषांशीं मनांत तुलना करते आणि आपल्या पतींत शक्य तेवढे चांगले गुण उतरावेत, त्याच्या शिष्टाचारामुळे व बोलण्या-चालण्यामुळे आपली जोडी उठून दिसावी, अशी तिची इच्छा असते. जुन्या काळच्या स्त्रियांना त्यांच्या पतीची

घराबाहेरील योग्यता कळत नसे; त्याचा मूर्खपणाहि त्यांच्या नजरेस किंवा ध्यानांत येत नसे. आधुनिक स्त्रियांची प्रकृति ह्या बाबतींत अत्यंत नाजूक बनलेली असते आणि पतीचे तिला वाटणारे दोष व खोडी दुरुस्त करण्याचा ती प्रयत्न करूं लागते. ह्या प्रयत्नांत तिला फारसें यश मात्र येऊं शकत नाही आणि हा नाद तिला सोडून द्यावा लागतो. पतीला सुधारण्याचा प्रयत्न करण्याच्या मर्यादा तिने वेळींच ओळखणें व कटुता टाळणें हेंच योग्य ठरतें. सुशिक्षित स्त्रियांनी पति-पत्नीमधील नैसर्गिक संबंध व त्याचे मानसिक व शारीरिक परिणाम विसरून कसें भागेल? वाकवण्यापेक्षा वाकणें हेंच हितकारक होतें.

संसाराला आर्थिक हातभार लावण्यास पत्नीचा सुशिक्षितपणा उपयोगी पडूं शकतो. तिने अर्थार्जन करण्याची आवश्यकता बऱ्याच कुटुंबांतून निर्माण झालेली आढळते; परंतु प्रत्यक्ष नोकरी करून तिने पैसे मिळविण्याची शक्यता त्या प्रमाणांत दिसत नाही. कारण, अशा स्त्रियांजोग्या नोकऱ्यांचें प्रमाण मर्यादितच आहे. तथापि, सुशिक्षित स्त्रियांनी विवाहानंतरहि आपली नोकरी चालू ठेवावी किंवा नव्याने नोकरी धरावी अशी अपेक्षा पतीकडून बाळगली जात आहे आणि वधूची निवड करतांना ह्या गोष्टीस अधिकाधिक महत्त्व मिळत आहे. सुशिक्षित स्त्रियांचे संसार सुखाचे होत नाहीत अशी जेथे ओरड केली जाते, तेथे मिळवत्या सुशिक्षित स्त्रियांच्या संसारावर कितीतरी अधिक कडक टीका केली जात असणार, हें उघड आहे. ही टीका जरी सोडून दिली, तरी वस्तुस्थिति कशी आढळते? मिळवत्या म्हणजे अर्थार्जनासाठी दिवसाचा एक तृतीयांश वेळ घराबाहेर खर्च करणाऱ्या स्त्रियांना घराकडे लक्ष देण्यास इतरांच्याइतका वेळ व उत्साह मिळण्याची शक्यता थोडी कमीच असणार, नाही का?

तथापि, आपल्या द्रव्यार्जनापेक्षा कौटुंबिक सुखास प्राधान्य देण्याचें धोरण त्यांनी ठेवलें, तर नोकरी कुटुंबसुखाच्या आड येत नाही. पत्नीने

नोकरी केल्याने संसारास होणारी आर्थिक मदत पतीला हवी असली तरी ती मदत स्वीकारल्यामुळे त्याच्या प्रतिष्ठेला व अभिमानाला धक्का बसूं नये अशी त्याची स्वाभाविकच इच्छा असते. द्रव्यार्जन करणें हें त्याचें आद्य कर्तव्य. त्याने तें केलें तर त्यांत कांही विशेष केलें असें मानण्याचें कारण नसतें; तरीपण पति पोशिंदा व मिळवता म्हणून किती तोऱ्यांत असतो! उलट, गृहिणीची सर्व जबाबदारी पार पाडून आणखी पुन्हा द्रव्यार्जनासाठी श्रम करणाऱ्या पत्नीला मात्र पतीचा डौल टिकविण्यासाठी स्वतःकडे गौणत्व घेण्याची पाळी येते व पत्नीच्या नात्यासच महत्त्व देऊन, दमल्याभागल्यानंतरहि, पती घरबशा असला तरी, त्याला रुचेल त्याप्रमाणे त्याची खुशामत करावी लागते.

पत्नीच्या द्रव्यार्जनाचा अर्थ, पतीच्या अर्थोत्पादनाचा कमकुवतपणा असा केला जाऊं नये आणि मिळवतेपणामुळे समाजांत जी प्रतिष्ठा प्राप्त होते, तिची पत्नीला हाव नाही; द्रव्यार्जनास व नोकरीस ती दुय्यम स्थान देते आणि पतीच्या भलावणीचीच ती भुकेली असते, ह्याचें पत्नीने वारंवार हार्दिक प्रदर्शन करीत राहणें कौटुंबिक सुखाच्या दृष्टीने हितावह ठरतें. " 'हे' नको म्हणत होते, तेव्हा माझ्या पगारांतून मीं हा रेडिओ घेतला, " असें चार-चौघांत एखादी गृहिणी सांगूं लागली, तर तो रेडिओ मोडून टाकावा असें पतीला नाही का वाटणार? पतीच्या 'पति' ह्या दर्जास बाध आला नाही म्हणजे मात्र मिळवत्या पत्नीस वाटेल तितक्या सवलती देण्यास व तिचें कौतुक करण्यास तो तयार होतो. नोकरीच्या जागीं महत्त्वाचे निर्णय घेणाऱ्या स्त्रीने घरांत आल्यावर मात्र साध्यासाध्या बाबतींतहि पतीकडून मार्गदर्शन करून घेण्याची कला आत्मसात् केली पाहिजे. पतीपेक्षा पत्नीची उंची अधिक असली तरी तिने मुद्दाम खाली वाकून चालून पतीचेंच डोकें वर राखावें लागतें. अशा रीतीने, संसारसुखासाठी केवढा तरी मोठा त्याग सुशिक्षित मिळवत्या स्त्रियांना करावा लागतो!

सुशिक्षित, विशेषतः मिळवत्या स्त्रियांच्या गृहकृत्यांची व्यवस्था त्यांच्या घरांतील विशिष्ट महत्त्वाच्या स्थानामुळे बदलते व सुधारते आणि पति अधिक सहकार्याची भूमिका पत्करतो. सुशिक्षित पत्नीच्या योग्यतेची तो दखल घेतो व तिच्या सोयी, गैरसोयी, अडचणी, इत्यादी-कडे लक्ष पुरवितो. ह्यांतूनच नव्या प्रकारची गृहव्यवस्था निर्माण होते. जेवणाच्या व चहा-पाण्याच्या वेळा ह्या केवळ पतीच्या सोयीवर किंवा लहरीवर अवलंबून न राहतां, गृहिणीचीहि सोय पाहिली जाते. अशा तऱ्हेचा बदल घडवून आणण्यांत पत्नींनेच पुढाकार घ्यावा लागतो. पत्नीच्या वेळेसहि किंमत निर्माण झाली म्हणजे त्या वेळेचीहि पैशा-प्रमाणे बचत करावी लागते व अधिकाधिक वेळ जास्त महत्त्वाच्या कामासाठी उपलब्ध करून द्यावा लागतो.

तयार अन्न मध्ये ठेवून सर्वांनी एकदमच जेवावयास बसणें, संध्या-काळच्या ताज्या सैपाकास मधूनमधून काट देणें, पत्नीला पेलेवशा मांडण्यांत, उचलण्यांत व धुण्यांत पतीने मदत करणें, मुलांनी पाटपाणी घेणें, घरांत कांही जिन्नस नेहमी तयार करून ठेवणें, सैपाकाचें काम कमी जिकिरीचें व्हावें ह्यासाठी सैपाकघरांतील सोयी वाढविणें, पत्नीला आगाऊ सूचना न देता पतीने जेवणास पाहुणे न आणणें, मुलांना अधिक स्वावलंबी बनविणें, घरांतील रम्यता कमी होऊं नये, उलट ती वाढावी ह्यासाठी घर सजविणें व त्यांत रेडिओ, शिवणाचें यंत्र, विजेच्या शेगड्या व इस्त्री, कपड्यांसाठी कपाट, पडदे, इत्यादि उपलब्ध करून देणें, कुटुंबियांचा वेळ घरांत एकत्र चांगल्या प्रकारें खर्च व्हावा ह्या दृष्टीने कार्यक्रम आखणें, ह्या सर्व मार्गांनी घरांतील नवी घडी बसविणें आवश्यक होतें. घर पतीचें व त्याच्या हुकमतीखाली पत्नीने राबावयाचें ही कल्पनाच सुशिक्षित स्त्रिया बदलून टाकीत आहेत. घरांतील त्यांचें महत्त्व त्या आपल्या कर्तृत्वाने वाढवीत आहेत व संसारसुख सुधारून स्वतःलाहि अधिक सुखी करीत आहेत. आधुनिक पत्नीला संसारांत

भरपूर वाव मिळूं लागल्याकारणाने तिच्या गुणांचें चीज होऊं शकतें. ती खऱ्या अर्थाने घरधनीण शोभते.

मुलांची जोपासना व संगोपन, ह्यांकडे सुशिक्षित गृहिणी काळजीपूर्वक लक्ष देते. आजच्या व उद्याच्या जगांतील परिस्थितीचा विचार करून, त्याला अनुरूप असें वळण मुलांना लावण्याची जबाबदारी तिच्यावर येऊन पडते. मुलांचे गृहपाठ करून घेणें, त्यांच्या कच्च्या विषयांकडे लक्ष पुरविणें, शिक्षकांना भेटून मुलांच्या अभ्यासाची व वर्तनाची चौकशी करणें, पुस्तकें, फी इत्यादींची व्यवस्था करणें, हीं सर्व कामें सुशिक्षित गृहिणींचींच समजलीं जाऊं लागलीं आहेत. घरांतील आजोबा किंवा आजी ह्यांनी मुलांना सामान्यपणें शिकविण्याच्या गोष्टीहि तरुण आयांना स्वतः वाचून किंवा समजून घेऊन मुलांना सांगाव्या लागत आहेत; कारण, विभक्त कुटुंबपद्धतींत एकाच व्यक्तीस सर्व कामें पार पाडण्याची पाळी येते. रामायण आणि महाभारत ह्यांतील कथा तिला याव्या लागतात; त्याचप्रमाणे नव्यानव्या विषयांसंबंधी मुलांची जिज्ञासा भागवितां यावी लागते. अणुशक्ति, हेलिकॉप्टर, जेट, व्हिटॅमिन, पेनिसिलिन, इत्यादीविषयी आपलें ज्ञान वाढविण्यासाठी स्वतःचें वाचन तिला चालू ठेवावें लागतें. मुलांकडे मुली भाऊ म्हणून नव्हे, तर त्यापेक्षा अधिक चित्ताकर्षक अशा स्वतंत्र व्यक्ति म्हणून पाहूं लागण्याचें मुलींचें वय झालें, म्हणजे त्यांच्या विकासांतील ती स्वाभाविक घटना आहे हें जाणून आधुनिक आईने तिला मार्गदर्शन केलें पाहिजे. हें सर्व तिला करतां आलें, तरच तिला त्यांचा आदर टिकवितां येतो.

माझ्या एका डॉक्टरीण मैत्रिणीने आपली मुलगी मिशनरी शाळेंत घातली आहे. त्या शाळेंतील वैशिष्ट्यपूर्ण शिक्षणाचा सर्व फायदा मिळावा, परंतु तोटा पदरांत मुळीच येऊं नये, ह्यासाठी ह्या मैत्रिणीच्या घरीं सर्व सण, व्रतें, धर्मकृत्यें, कुलाचार, कटाक्षाने पाळण्यांत येतात.

तिच्या मुलीला गीतेचे जितके अध्याय तोंडपाठ आहेत, तितक्या मराठी कवितासुद्धा शेजारच्या प्राध्यापक पालकाच्या मुलाला माहीत नाहीत. मुलांच्या छंदांस प्रोत्साहन द्यावयाचें, त्यांच्या सत्प्रवृत्तींची जोपासना करावयाची, त्यांना योग्य त्या कार्यक्रमास बरोबर घेऊन जावयाचें, नागरी कर्तव्याची माहिती करून द्यावयाची, इत्यादि कामें आधुनिक गृहिणींनी केलीं आणि जुन्यांतील चांगलें न सोडतां नव्यांतील अप्रस्तुत तें टाकून दिलें, तर त्यांची कामगिरी किती मोलाची होईल !

सुशिक्षित स्त्रियांचा अपत्यांच्या संख्येबाबत दृष्टिकोन वास्तवपूर्ण होत चालला आहे. अपत्यांची संख्या ही देवाच्या मर्जीची आणि आपल्या स्वतःच्या आटोक्याबाहेरची गोष्ट आहे, असें सुशिक्षित स्त्री मानीत नाही; त्याबद्दल तिचीं मतें पूर्ण विचारान्तीं निश्चित् झालेलीं असतात. अशा मतांनी केवळ भागत नाही; त्यासाठी योजनाबद्ध वागावें लागतें. जरूर तेवढीं अपत्यें झाल्यावर आणखी लेंढार वाढूं नये ह्याची कायमची व्यवस्था करण्यास ती खुषीने तयार होते. पुरुषावरील शस्त्रक्रिया स्त्रीवरील शस्त्रक्रियेपेक्षा खरोखर सोपी व केव्हाहि करण्यास सोयीची असतांनाहि पतीला त्यासाठी आग्रह न धरतां तीच स्वतः शस्त्रक्रियेचा त्रास सहन करण्यास तयार होते, अशीं कित्येक उदाहरणें ऐकिवांत आहेत.

सुशिक्षित स्त्रिया पतिगृहास इतक्या रीतीने समृद्ध करीत असतात, तरीसुद्धा भरपूर हुंडा दिल्याशिवाय त्यांना पतिगृहांत प्रवेश मिळालेला नसतो ! वधूपक्षाकडून उपटलेला हुंडा लवकरच खर्च होऊन जातो. पण सुशिक्षित पत्नी वरपक्षाला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीने कितीतरी हुंडा दीर्घ काळ पोचवीत राहते. मिळवत्या गृहिणींच्या मिळकतीचा हिशेब केला, तर पांच आकड्यांच्या बेरजा कराव्या लागतील. ज्यांना नोकरीची संधि मिळत नाही किंवा ज्यांच्या संसाराला त्याची गरज नाही, अशांच्या शिक्षणाचीहि संसाराला निर्धास्तपणा प्राप्त करून

देण्यास मदत होत असते. जरूर पडली तर पत्नी द्रव्यार्जन करूं शकेल ह्या खात्रीमुळे भवितव्याबद्दल चिंता वाटत नाही. पत्नीची अर्थोत्पादन-क्षमता व सिद्धता हा सुखी संसाराचा उतरलेला एक प्रकारचा विमाच आहे. पतीच्या निधनानंतर किंवा त्याची नोकरी सुटल्यावर पत्नीने संसाराचा भार पूर्णपणें उचलल्याचीं उदाहरणें पुष्कळ सापडतील. हा आर्थिक भाग सोडला, तरी इतरहि मार्गांनी सुशिक्षित पत्नी संसार समृद्ध करीत असते व त्यांत चैतन्य आणीत असते.

सुशिक्षित स्त्रियांना इतर स्त्रियांपेक्षा स्वतःसारख्याच स्त्रियांची व पुरुषांची संगत आवडते, हें सत्य आहे ! ह्याचें कारण असें, की इतर स्त्रिया त्यांना आपल्यांतील समजत नाहीत; त्यांचें नेहमी उणें काढतात आणि तें सहन करूनहि त्यांच्याशीं समरस होणें सुशिक्षित स्त्रियांना कठीण जातें. सुशिक्षित, विशेषतः मिळवत्या स्त्रीचें कधी न रडणारें मूल एखादे वेळेस जरी रडलेलें ऐकूं आलें, तरी तिच्या शिक्षणाचा व नोकरीचा सतत उद्धार केला जातो. घरकामाचा कंटाळा अशिक्षित स्त्रियांत आढळत नाही, असें थोडेंच आहे ? पण सुशिक्षित पत्नीने मात्र सोय म्हणून तयार जिन्नस कधी विकत आणले, तर तें इतरांना चालत नाही. तेव्हा, सुशिक्षित स्त्री म्हणते, की ह्या बायकांत जाऊन, आपण होऊन टीकेला आणि कुत्सित निंदेला विषय द्या कशाला ! सुशिक्षित स्त्रीचा इतर स्त्रियांना जो वास्तविक फायदा मिळावयाचा, तो त्यामुळे मिळत नाही. नातेवाईक, शेजारी, इत्यादींच्या टीकेकडे दुर्लक्ष करतां येईल; पण तें केव्हा ? तर पतीची सहानुभूति व उत्तेजन असेल त्या वेळीं ! म्हणून, पतीने आपल्या पत्नीस स्फूर्ति व चेतना एकसारखी पुरविली पाहिजे; त्याचें गोड फळ त्याला मिळाल्याविना कसें राहील ?

सुशिक्षित गृहिणीला कितीतरी अडचणींतून मार्ग काढावयाचा असतो. तिच्याकडून बाळगण्यांत येणाऱ्या अपेक्षा अमर्याद, परंतु त्या मानाने अनुकूल वातावरणाचा व प्रोत्साहनाचा मात्र अभाव, ही तिच्या

मार्गांतील सर्वांत मोठी अडचण आहे. प्रत्यक्ष पतीलासुद्धा तिच्या सुशिक्षितपणाचा फायदा तेवढा हवा असतो; त्यासाठी तो स्वतः फारसा त्याग करावयास तयार नसतो. पत्नीला सर्व कांही बाबतींत मोकळीक असल्याचें त्याने दाखविलें तरी वस्तुस्थिति तशी असतेच असें नाही.

शिक्षणाच्या फायद्याचा झरा टिकावयाचा असेल, तर पुस्तकें, मासिकें, इत्यादींच्या वाचनाची, व्याख्यानें ऐकण्याची, प्रवासाची आवश्यकता असते. त्यांचा अभाव असेल, तर सुशिक्षित स्त्रीच्या शिक्षणाला फक्त ऐतिहासिक महत्त्वच उरावयाचें ! आर्थिक अनुकूलतेचा प्रश्न येथे उपस्थित होतो आणि त्या अनुकूलतेच्या अभावीं कित्येक सुशिक्षित स्त्रियांच्या सुशिक्षितपणास गंज चढूं लागलेला आढळतो.

पत्नी निवडतांना सुशिक्षित मुलीची निवड करावयाची, पण तिला पुढे अडाणीपणाने राहण्याची पाळी यावयाची, असें होतां कामा नये. कामाला योग्य असें यंत्र आणलें तरी तें दुरुस्तींत राखलें व काळजीपूर्वक वापरलें, तरच कॅटलॉगमध्ये सांगितल्याप्रमाणे तें काम देतें. केवळ उत्कृष्ट बीं लावून भागत नाही; त्याचें रोपटें व झाड होऊन चांगला बहार त्याला यावयाचा असेल, तर त्याची जोपासनाहि नीट करावी लागते. सुशिक्षित स्त्रीचा तजेला, विकास आणि प्रफुल्लता ह्यांसहि अशाच वातावरणाची, प्रेमळपणें पाठीशीं घालणाराची, पाठबळ पुरविणाराची आवश्यकता असते. निदान, तिच्या मार्गांत काटे तरी टाकले न जाणें न्यायाचें होईल. प्रतिकूल परिस्थितींतहि, हिरमोड झाला तरी, शक्य तितका उत्कृष्ट संसार करून दाखविण्याची कला सुशिक्षित स्त्रियांत विकास पावत आहे, ही खरोखर भाग्याची गोष्ट आहे. आपल्या समाजाच्या प्रगतीचें व जीवंतपणाचें तें सुचिन्ह आहे.

—स्त्री

●●●

## मुलांमुलींचे परस्पर-संमतीने विवाह : ५

मुलींचे विवाह जमविणें पालकांना अतिशय कठीण जात आहे आणि त्यामुळे बिचारींचे विवाह लांबणीवर पडत आहेत. विवाहाला योग्य असें वय उलटून गेल्यावर मुलींच्या चेहऱ्यावरील तेज उरत नाही आणि थोरल्या मुलीच्या विवाहाचा नाद सोडून देऊन धाकट्या मुलीचा विवाह जमविण्यास प्राधान्य देण्याची पाळी येते. मुलींहि लग्नाच्या बाजाराला कंटाळतात आणि मुलगेहि चांगली वधू मिळत नाही अशी तक्रार करूं लागतात. प्रौढ कुमारिकांचा प्रश्न समाजापुढे उभा राहतो आणि तो सोडविण्याचा मार्ग कांही सुचत नाही. निराश आणि नाइलाज झालेले लोक मग हतबुद्ध होऊन "मुलामुलींनी आपापले विवाह ठरवावे," असें म्हणूं लागतात.

"स्त्री" मासिकाच्या रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने त्याच्या संपादकांनी महाराष्ट्रीय स्त्री-जीवनाची पाहणी करण्याचें योजिलें. त्या उद्देशाने एक प्रश्नपत्रिका तयार करण्यांत आली व ती वेगवेगळया ठिकाणच्या, वेगवेगळया थरांतील महिलांच्याकडे पाठविण्यांत आली. सुमारें ५०० प्रश्नपत्रिका भरून आल्या. त्यांतील बहुसंख्येने (८२.१६ टक्के), मुलांमुलींनी योग्य वयांत स्वतःच परस्पर-संमतीने विवाह जुळवण्यास मान्यता दिली आहे. अर्थात्, ज्यांच्याकडे प्रश्नपत्रिका गेली व त्यांच्यापैकी ज्यांनी ती भरून परत धाडली, त्यांचें हें प्रातिनिधिक मत आहे. तरी पण त्यांतील प्रत्येक शंभरापैकी ८२ स्त्रियांनी मुलांमुलींच्या परस्पर-संमतीच्या विवाहाचा पुरस्कार केला, ही गोष्ट निश्चितच अर्थपूर्ण आहे.

शारीरिक, मानसिक वा सामाजिक रोग असो, त्यावर उपाय योजतांना अतिशय दक्षता बाळगावी लागते; रोगाचें मूळ कारण शोधून काढून आणि परिस्थितीचा सर्वांगीण विचार करून शक्य कोटींतीलच उपायांचा अवलंब करावा लागतो. गिरणींतील मजुराला क्षयरोगाची बाधा

झाली, तर त्याला स्वित्झरलंडला जाण्याचा सल्ला देऊन कसें चालेल? रोग्याला परवडेल की नाही याचाच विचार करावा लागतो. त्याचप्रमाणे, इतर उपाय लागू पडत नाहींत म्हणून कोठलें तरी औषध घेण्यास सांगणें हितकारक ठरत नाही. सांगितलेलें औषध रोगाला कितपत लागू पडेल, त्याचे परिणाम काय काय होतील, दुष्परिणाम आटोक्यांत राखतां येतील किंवा नाही, ह्याची छाननी करावी लागते. बेजबाबदार-पणा घातक ठरण्याचा संभव असतो. काळजीपूर्वक चिकित्सा करून केलेली योजनासुद्धा कधी कधी उपकारक होत नाही, तेथे दडपेगिरी कशी साहाय्यकारक होणार?

मुलां-मुलींनी आपले विवाह स्वतःच परस्पर-संमतीने जुळवावे, असा उपाय विवाह-समस्येवर सांगण्यांत येतो; परंतु त्या उपायाला आनुषंगिक अशा सर्व प्रश्नांची साधक-बाधक चिकित्सा केलेली असते किंवा नाही ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. स्थळें शोधून कंटाळून गेलेल्या किंवा स्थळें शोधण्याचा आळस असलेल्या लोकांचा स्वतःची सुटका करून घेण्याचा हा प्रयत्न आहे, असें म्हटलें तर तें धाडसाचें वाटेल; कारण त्यांनी शोधून काढलेला तो तर्कशुद्ध व व्यवहार्य उपाय नसून, नाइलाजाचा व वैतागाचाच तो उद्गार असतो! त्या मार्गाने जाण्यांतील धोक्यांचा त्यांनी विचार केलेला दिसत नाही; तेव्हा ते धोके पत्करण्याची त्यांची तयारी असण्याचाहि संभव वाटत नाही.

"मीं माझ्या मुलीला सांगून टाकलं आहे की, तूंच तुझं लग्न जमव. माझी त्याला कांही हरकत नाही." असें म्हणणाऱ्या पालकांनी काय साधलें, असा प्रश्न विचारला तर त्याचें उत्तर मोठेंच उद्बोधक येईल. मुलांमुलींना मोकळीक देण्याची तयारी ते दाखवितील व त्यामुळे त्यांची प्रगतिप्रियता दिसून येईल; त्यांचेवरील जबाबदारी नाहीशी होईल. म्हणजे, एका दगडाने दोन पक्षी मारले जातील. तिसऱ्याहि पाखराचा म्हणजे त्यांच्या मुलीचा त्यामुळे कदाचित् घात होईल याची

त्यांना जाणीव नाही. उपाय सांगण्यास सोपा आहे पण तो लागू पडेल का ? मुलींचे विवाह त्यामार्गें सर्रास जमण्याची शक्यता कितपत आहे ? त्यांत धोके व अडचणी किती आहेत ? उपाययोजनेंतील पथ्यें किती भयंकर, वातावरण किती प्रतिकूल, ह्याची कांही कल्पना आहे का ? कोणत्या दक्षता घेणें आवश्यक आहे, हें कोणीं पाहिलें आहे का ? मुलीचें हित साधण्याचा प्रधानहेतु साध्य होईल का ?

मुलांमुलींनी योग्य वयांत परस्पर-संमतीने आपले विवाह ठरविले तर ती एक अत्यंत इष्ट व स्वागतार्ह अशीच घटना होईल. मुली दाखविण्याचे अनिष्ट प्रकार, मुलांच्या पालकांच्या बेशरम मागण्या, विवाहाच्या बाजारांतील घासाघीस, मुलींच्या पालकांची पिळवणूक, इत्यादींमुळे निर्माण होणारे प्रश्न त्यामुळे आपोआपच सुटतील; कौटुंबिक व सामाजिक स्वास्थ्य वाढीस लागेल. प्रश्न एवढाच, आणि तोहि अगदी साधा आहे की, मुलें व मुली ह्यांचा एकमेकांशीं परिचय होण्याची संधि आज कितपत उपलब्ध आहे आणि कालांतराने तरी त्यांत किती सुधारणा होण्याची शक्यता आहे ? मोठमोठ्या बंगल्यांतून राहणारे, परदेशगमन करून आलेले, मोटारींतून हिंडणारे, सुशिक्षित लोक, त्यांना सर्व तऱ्हेची अनुकूलता असतांनाहि, ते स्वतः मुलां-मुलींच्या परिचयास कितपत वाव देतात ह्याची चौकशी करून पाहणें उद्बोधक होईल.

प्रारंभीं उल्लेख केलेल्या पाहणींत, ज्या ८२·१६% स्त्रियांनी मुलां-मुलींनी योग्य वयांत स्वतःच परस्पर-संमतीने विवाह जुळविण्यास मान्यता दिली, त्या स्त्रियांच्या मुलांमुलींना ह्या बाबतींत कितपत वाव मिळतो, उत्तेजन दिलें जातें, अनुकूल वातावरण निर्माण करून दिलें जातें, ह्याविषयी तपशीलवार पाहणी केली, तर तिचा निष्कर्ष ह्या प्रश्नावर उत्कृष्ट प्रकाश पाडील. नव्या विचारांची व नव्या राहणीची 'पुढारलेल्या' लोकांची भाषा ऐकावी, देखावा पाहावा; परंतु प्रत्यक्ष वस्तुस्थिति मात्र वेगळीच आढळते. इतर कित्येक पालक बिचारे सरळ कबूल तरी

करतात, की नवे थेर त्यांना पसंत नाहीत. पण भाषा सुधारकी आणि कृति मात्र सनातनी, असें असणारांच्या मार्गदर्शनाप्रमाणे जाणारांनी स्वतःच योग्य ती खात्री करून घेतलेली बरी.

किती तरी इंग्रज मुली आता अमेरिकन सैनिकांशीं विवाह करीत आहेत. दरमहा सुमारें २५० मुली अशा रीतीने अमेरिकेंत घर करीत असतात. त्यांच्या विवाहांच्या बाबतींत उपस्थित होणाऱ्या प्रश्नांशीं परिचय करून घेणें येथे सोयीचें होईल; त्यावरून अशा प्रकारच्या विवाहांशीं संलग्न अशा गोष्टींवर प्रकाश पडेल. अमेरिकन सैनिक व त्याची इंग्रज प्रेयसी, ह्या दोघांनी आपल्या प्रेमाला कायम स्वरूप देण्याचें ठरविलें, म्हणजे विवाहास अमेरिकन लष्करी खात्याची अगाऊ परवानगी घ्यावी लागते. ती परवानगी देण्यापूर्वी मुलीला खालील प्रकारच्या प्रश्नांचीं उत्तरें द्यावीं लागतात:—

( १ ) तुझ्या आई-बापांची ह्या विवाहास संमति आहे का ?

( २ ) वराच्या आई-बापाशीं तुझा पत्रव्यवहार चालू आहे का ?

( ३ ) तुझी व वराची ओळख दीर्घ काळ आहे का ?

( ४ ) वराच्या कौटुंबिक परिस्थितीची व सामाजिक दर्जाची तुला माहिती आहे का ?

( ५ ) तुझ्या व वराच्या आवडी-निवडींत आणि छंदांत साधर्म्य आहे का ?

( ६ ) तुला दिवस राहिलेले आहेत का ? असल्यास,

( ७ ) अपेक्षित अपत्याचा पिता नियोजित वर हाच आहे का ?

ह्या पद्धतीच्या तपशीलवार प्रश्नांचीं उत्तरें देऊन, १९४८ सालापासून आजवर सुमारें १५,००० इंग्रज मुलींनी आपले विवाह अमेरिकन नागरिकांशीं जुळविले आहेत.

ह्या प्रश्नांची पार्श्वभूमि सहज लक्षांत येण्याजोगी आहे आणि एक-मेकांचा परिचय करून घेऊन स्वतःला आवडलेल्या मुलाशीं विवाह

करणाऱ्या मुलींच्या विवाहपूर्व जीवनाची त्यावरून कल्पना करतां येणें शक्य आहे. बऱ्याच मुलांशीं ओळख करणें, त्यांतील जरा पसंत पडलेल्या मुलांशीं संघटन वाढविणें, त्यासाठीं त्यांच्याबरोबर बराच वेळ वेगवेगळ्या निमित्ताने घालविणें, स्वतःचा विवाह ठरल्याच्या बातम्या प्रसृत होतील त्यास तोंड देणें, इत्यादि गोष्टी क्रमाक्रमाने घडून येणें स्वाभाविक आहे. मुलांचा परिचय फार अंतरावरून नीटसा होणें शक्य नाहीं; अंतर कमी झाल्यानंतर गर्दीच्या ठिकाणापासून दूर जाऊन त्यांनी एकान्त शोधणें सहजच घडतें आणि अशा वेळीं विकारवश होऊन तोल जाणें असंभवनीय नसतें.

मुलीला स्वतःचा वर शोधण्याची मोकळीक मिळाली, तर तिला अशाच एखाद्या मार्गाने जावें लागतें; सर्वांच्या देखत, टेबलाच्या दोन टोकांना दोघांनी बसून, अभ्यासाची चौकशी केल्याने केवळ विवाह नाहीं जमत. भलत्या मुलांच्या पुढाकारास कांहीं मुली बळी पडणें त्यामुळे अगदी शक्य आहे; कांहींवर विवाहाची नाखुषीने पाळी येणें अशक्य नाहीं. अशा पद्धतीने ठरणारा पति आर्थिक दृष्ट्या योग्य, समान संस्कारांचा, पत्नीशीं उंचीनें, बांध्याने व वयाने अनुरूप, असा असेलच हें सांगतां येणार नाहीं. आंतरजातीय, आंतरप्रांतीय, आंतर-धर्मीयहि विवाहाची तयारी ठेवावयास हवी; हें सर्व कितपत पचण्याजोगें आहे, ह्याचा शांतपणें विचार होणें जरुरीचें आहे.

आपण अशी कल्पना करूं या, की कित्येक पालक आपल्या मुलींना विवाहपूर्व वागणुकींत मोकळीक व स्वातंत्र्य देण्यास प्रतिकूल नाहींत. तथापि, तशाने तरी चांगले विवाह घडून येण्यास कितपत वाव आहे ? कॉलेजांतील एकाच वर्गांतील मुलें व मुली ह्यांच्या वयांत बहुधा अंतर नसतें; कदाचित् मुलीचें वय मुलापेक्षा थोडें जास्तच असण्याचा संभव. तेव्हा, त्यांचे विवाह जमणें त्या दृष्टीने श्रेयस्कर ठरणार नाहीं. दुसरी गोष्ट अशी की, मुलास नोकरी लागली नाहीं, तो आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी

झाला नाही, तर त्याच्या संसाराचें पुढे काय व्हावयाचें, ह्या अनिश्चिती-मुळे कॉलेजांतील एकाच वर्गांतील मुलांमुलींनी विवाह करणें अयोग्यच ठरेल. इंग्लंड किंवा अमेरिका ह्या देशांतून बेकारीची भीति नसल्या-कारणाने कोणाहि तरुणाबरोबर विवाह करण्यांत आर्थिक धोका नसतो. प्रत्येकालाच नोकरी मिळते आणि पगाराहि चांगला असतो. आपल्या येथील परिस्थिति वेगळी आहे. मुलगा इतर दृष्टींनी अनुरूप असला, तरी त्याच्या नोकरीची शाश्वती नसल्याने त्याच्याशीं कॉलेजच्या शिक्षणाच्या काळांत मुलीने विवाह ठरविणें साहसाचेंच ठरतें.

मुलीने निवडलेला पति कुरूप, पैशाने गरीब असला तरी मुलीच्या पालकांना तो चालतो. परंतु, मुलीने परजातींत किंवा परधर्मांत विवाह केला तर तें त्यांना पसंत पडत नाही. मुलीने प्रेमविवाह करावा, परंतु प्रथम तिने मुलगा आपल्याच शाखेचा आहेना हें पाहावें आणि शाखे-बाहेरील मुलांशीं संबंध येऊं देऊं नये, अशी आशा बाळगणें व्यर्थ ठरतें. एकाच जातींतील मुलांमुलींच्या प्रेमविवाहास आता विरोध राहिलेला नाही. परंतु मिश्र विवाहांना मनापासून आशीर्वाद देणारे अद्याप फारच थोडे आहेत. जातीबाहेर विवाह करणें घातुक ठरेल, असाच लोकांचा समज आहे. मुलां-मुलींचे विवाह झाले म्हणजे त्यांचे जे संसार सुरू होतात त्यांत आईबापांनाहि कौतुक करायला वाव हवा असतो; त्यांना मिश्र विवाहितांच्या संसारांत स्थान उरत नाही आणि त्यामुळे त्यांची निराशा होते, असें त्याचें विवरण करतां येण्यासारखें आहे. प्रत्येकजण स्वतःला वरच्या जातीचा समजतो आणि इतरांच्या जातीला कमी लेखतो. परंतु, एखाद्याने युरोपियन मुलीशीं विवाह केला, एखाद्या मुलीला युरोपियन पति मिळाला, तर मात्र त्याबद्दल विशेष तक्रार ऐकूं येत नाही ! म्हणजे, पालकांची ह्या संबंधांतील वृत्ति तर्क-शुद्ध वाटत नाही.

मुलांमुलींनी स्वतःचे प्रश्न सोडविण्याच्या बाबतींत केलेल्या प्रयत्नांस व धाडसास प्रोत्साहन मिळत नाही; उलट त्यांची निर्भर्त्सना होते. मुलांमुलींचें हित व्हावें, हा पालकांचा हेतु निश्चित असतो; तो कोणीच नाकारणार नाही. परंतु पालकांच्या पसंतीच्या रूढ मार्गाने जाणाऱ्यांनाच सुख लागेल असा ते आग्रह धरतात. त्यामुळे परजातींत मुलाने किंवा मुलीने विवाह ठरविला, की तो मोडण्याच्या खटपटीस ते लागतात. विशेषतः मुलीचे आई-बाप तिला घरांत डांबून ठेवतात, तिची व मुलाची भेट पडूं देत नाहीत, तिला परगावींहि पाठवून देतात. विवाहाची कल्पना तिच्या डोक्यांतून काढून टाकण्याचा त्यांचा प्रयत्न चालतो. तरुण मनावर त्याचा काय परिणाम होतो हें त्यांच्या लक्षांत येत नाही. अशा मुलीचा निर्धार अधिकच बलिष्ठ होतो, आई-बापांविषयी तिला आदर वाटेनासा होतो आणि तिला सुचेल किंवा सुचविण्यांत येईल त्या मार्गाचा ती अवलंब करते. घरीं परजातींतील मुलगी आली तरी एक वेळ चालते, पण स्वतःची मुलगी परजातींत देण्यास आई-बाप तयार नसतात.

सर्वच विवाह हे एक प्रकारचे जुगार असतात. त्यांच्या यशस्वीपणाविषयी आधी केलेले अंदाज पुष्कळ वेळां चुकतात. मिश्र विवाहांच्या बाबतींतहि, ते विवाह अयशस्वी ठरणार, हा अंदाजहि चुकीचा ठरूं शकतो ! मुलीने केलेली निवड किती योग्य असेल त्यावर सर्व कांही अवलंबून राहतें; आणि मुलीला घरचें वळण चांगलें असेल तर ती भलत्या मुलाला पति म्हणून पत्करणारच नाही. तिने खरोखरच चांगला पति मिळविला, तरी तो वाईट ठरविण्याची इकडे पराकाष्ठा केली जाते. त्या कारणाने मुलीच्या अडचणी वाढतात. वर्णव्यवस्थेवर आधारलेल्या समाजांतहि व्यवसायासच आता प्राधान्य मिळत आहे आणि समव्यवसायी हे एकाच जातीचे बनूं लागले आहेत, हें पालकांनी लक्षांत बाळगलें तर मिश्र विवाहास त्यांचा विरोध कमी होईल.

कॉलेजांतील ओळखींचा विवाहाच्या दृष्टीने फारसा उपयोग होण्याजोगा नाही, हें आपण पाहिलेंच आहे. मुलें व मुली ह्यांच्या, अनुकूल वातावरणांत, वेगवेगळ्या निमित्ताने भेटी कशा पडतील, ह्याची चौकशी करूं लागलों, तर असे प्रसंग फारच थोडे येतात, हें आपल्या लक्षांत येईल. मुलांमुलींची गाठ कशी, कोठे पडावयाची, त्यांना एकत्र हौसेने वेळ घालविण्याची संधि कशी मिळावयाची, इत्यादि प्रश्न येथे उपस्थित होतात. ज्यांचा विवाह व्हावयाचा आहे, अशा मुलां-मुलींच्या गाठीभेटींचे प्रसंग आले, तरी त्यांचा फायदा कसा करून घ्यावयाचा, हेंहि त्यांना समजलें पाहिजे.

सलगी करणें व ती वाढविणें, ही स्वतःचा विवाह स्वतः जमविण्याच्या कलेची पहिली पायरी आहे. पण, प्रत्येक मुलीला प्रत्येक मुलगा धोकादायक वाटावा, अशी परिस्थिति आहे! आगगाडींत किंवा बसमध्ये, फलाटावर किंवा बस-स्टँडवरील क्यूमध्ये, शेजारची मुलगी एखादें पुस्तक किंवा वर्तमानपत्र वाचीत असली, आणि त्याकडे मुलाने जरा लक्ष दिलें, की मुलीने दुसऱ्या बाजूस तोंड वळविलेंच, म्हणून समजावें! सामने पाहावयास किंवा सहलीस गेलेल्या बहुतेक मुली किती काळजीपूर्वक गट करून राहतात! "किती वाजले", "किती धावा झाल्या", अशा साध्या प्रश्नांनी मुली मुलांशीं बोलणें करूं शकतील; पण तोंड उघडलें तर! मुलांमुलींची ओळख होण्याचे दररोज जे प्रसंग येतात, ते सुद्धा अशा रीतीने वाया घालविले जातात. मुलाशीं ओळख झाली, तर त्याचा फायदा होण्याऐवजी तिच्यामुळे नुकसानच अधिक व्हावयाचें, अशी भीति मुलींच्या मनांत बिंबलेली असते आणि तेंहि अस्वाभाविक नाही. कारण, कांहींना तसे अनुभवहि आलेले असतात. परंतु विवाहाचा तोच एकमेव मार्ग उरला, तर त्यांतील काट्या-कुट्यांस न जुमानण्याइतका कणखरपणा आणि विचारीपणा मुलींच्या अंगीं यावयासच हवा.

विवाह जमवूं पाहणाऱ्या मुलींना, नोकरी करणाऱ्या स्त्रियांना येणारा अनुभव मार्गदर्शक होईल. नोकरी करणाऱ्या स्त्रियांना नकों असलेल्या पुरुषांना टाळतां येणें नेहमीच शक्य होतें, असें नाही. कचेरींतील किंवा शाळेंतील पुरुषांचा त्यांना अनेक प्रकारें त्रास सहन करावा लागतो. सार्वजनिक वाहनांतून त्यांना धक्के खावे लागतात; पाठलाग करणाऱ्या पुरुषांना हुशारीने चुकवावें लागतें; घरीं येऊं पाहणारांना घराबाहेरच नव्हे तर आळीबाहेरहि राखावें लागतें. हें सर्व करतांना त्यांना काय कमी मनस्ताप होतो ? पण नोकरी म्हटली कीं हें सर्व आलेंच, हें गृहीत धरूनच त्यांना आपला मार्ग काढावा लागतो. रोजची नवी ब्याद नव्या प्रकारें त्यांना स्वतःच्या हिंमतीवरच टाळावी लागते. तरुण मुलींनींहि अशाच रीतीनें हवा तो मुलगा मिळेपर्यंत हुशारीने वागलें पाहिजे; अनुभव जसजसा येत जाईल तसतशा त्या वाकबगार होत जातील. कांहींना ही कला सहज साधेल, कांहींना जरा वेळ लागेल, तर कांहींचा बावळटपणा घातुक ठरेल !

ज्या कामाच्या ठिकाणीं पुरुष व स्त्रिया यांना खेटून वावरावें लागतें, तेथे परस्पर-परिचय होऊन विवाह जमण्याचा संभव नेहमीच जास्त असतो. विमानांत काम करणारी 'एअर, होस्टेस' स्वतःचा विवाह कितीतरी सत्वर जुळवूं शकते. खेळ, संगीत, वादन, नाट्य, समाजकार्य, इत्यादींच्या निमित्ताने एकत्र येणाऱ्या लोकांच्या सहवासांतून टिकाऊ संयोग घडून येऊं शकतो, असा अनुभव आहे. अविवाहित मुलींने संधि मिळेल तेव्हा गाणें म्हटलें, भाषण केलें किंवा नाटकांत काम केलें, तर ती इतरांच्या नजरेंत भरूं शकते. घोगऱ्या आवाजावर सुद्धा एखाद्याची भक्ति बसणार नाही कशावरून ? गाणें चांगलें झालें नाही तरी बैठकीची ढबसुद्धा आकर्षण निर्माण करूं शकेल. तिकिटें जमविणें, फोटोग्राफी, इत्यादींचा छंद असणाऱ्या मुलीला मुलांशीं मिसळण्याला उत्कृष्ट-

९८५५

सीमित असतें. वेगवेगळे सामने पाहावयास जाणारीच्या ओळखी होण्यास वेळ लागणार नाही. नृत्यकला किंवा एखादी परदेशी भाषा अवगत असणारीचें जग कितीतरी व्यापक होतें व मुलाच्या निवडीस केवढेंतरी क्षेत्र उपलब्ध होतें! पण ह्या सर्व गोष्टींस आपल्याकडे कितीतरी थोडा वाव आहे.

विवाहोत्सुक मुलींची उत्सुकता व्यक्त झाली, त्यांनी उपवर मुला-विषयी आपुलकी व्यक्त केली, तर त्यांना यश येण्याचा थोडातरी संभव आहे. मुली नेहमी घोळक्याने जातात, त्या कारणाने एखाद्या मुलाविषयी त्यांना आकर्षण वाटलें, तरी त्याचा उपयोग होत नाही. अनेक मुलींशीं मैत्री असणारा मुलगा त्या सर्वांचें एकदम समाधान कसें करणार? तो प्रत्येकीशीं स्वतंत्रपणें वावरूं इच्छिणार. तेव्हा परस्पर-परिचयाच्या अंतीं विवाह व्हावा अशा दृष्टीने प्रयत्न करणाऱ्या मुलींनी घोळक्याची वृत्ति सोडली पाहिजे. पण, सुरक्षितपणासाठी, मुलींनी कोठेच एकटें जाऊं नये, अशी त्यांना शिकवण असते; ती त्या दृष्टीने योग्य असली तरी विवाह जमण्याला ती अडचणच आणणार. पुरुषाला खूष करण्याची हातोटी त्यांनी अंगीं बाणवली पाहिजे; आपल्यापेक्षा त्यानेच प्रत्येक वेळीं गरज दाखवावी ही वृत्ति उपयोगी ठरणार नाही.

मुलींनी नवरा कसा पकडावा, त्याचें केलेलें हें विवेचन ज्यांना तो मार्ग विवेकाने पत्करावयाचा आहे, अशांच्यासाठी आहे. कारण, एकदा मार्ग ठरला, की तो यशस्वी रीतीने आक्रमतां आला पाहिजे; तरच त्याचा उपयोग. अर्धवटपणा करून कसें चालेल? मुलें व मुली हीं सध्याच्या विवाहपद्धतींत ज्या रीतींने एकमेकांस पसंत करतात, ती रीत अगदी प्राथमिक अवस्थेची आहे. मुलां-मुलींनी परस्पर-परिचयाच्या अंतीं विवाह करावा, असें सुचविणारांनी वरील सर्व गोष्टी लक्षांत घ्याव्या, आणि साधक-बाधक विचार करून आपलें मत पक्कें करावें, एवढेंच सांगण्याचा येथे उद्देश आहे. मुलां-मुलींनी सरसास काय करावें, ह्याचा

सल्ला येथे दिलेला नाही; स्वतःचा विवाह स्वतःच जमवायचें म्हटलें, तर त्यांना कुठवर जावें लागेल, याचें स्पष्ट दिग्दर्शन केलें आहे. आई-बापांनाच मुख्यतः उद्देशून ही चर्चा करण्यांत आली आहे.

परस्पर-संमतीने आपले विवाह जुळविण्यासाठी, ओळखी वाढवून प्रगति करण्याची कला एखाद्याच व्यक्तीला अवगत असून पुरत नाही; सर्वांनाच ती माहीत असावयास हवी. भावा-बहिणींनीहि त्याच कलेचा अवलंब करून स्वतःचा विवाह घडवून आणलेला असला, ती कला घराण्यांतच चालत आलेली असली, तर मुलांमुलींना तिचें बाळकडूच मिळतें; घरच्या मार्गदर्शनाचाहि फायदा मिळतो. पुस्तकी ज्ञान किंवा सिनेमा-कथांतील दृश्यें ह्यांवर केवळ आधारलेली वागणूक हितकारक होत नाही. रोगाचें निदान अचूक झालें आणि त्यावर औषधहि सापडलें, तरी हवामानाप्रमाणे फरक करावे लागतात. शीत कटिबंधांत लागूं पडणारें औषध उष्ण कटिबंधांत प्रभावी ठरत नाही. सामाजिक प्रश्नांच्या बाबतींत असा फरक नेहमीच पडतो. खेडेगावांतील समस्यांवर शहरी तोडगे लागू पडत नाहीत आणि मागासलेल्या, शेतीप्रधान देशांतील प्रश्न पुढारलेल्या, औद्योगिक देशांतील पद्धतीने सुटत नाहीत. अशा परिस्थितींत, गन्द्धेपंचविशींतील विवाहोत्सुक तरुण-तरुणींना पति किंवा पत्नी ह्यांची योग्य निवड करतां येण्याजोगें तारतम्य एकाएकी कोठून प्राप्त होणार ?

जबाबदारीच्या जाणिवेने, विचारपूर्वक टाकलेलें पाऊल आणि चटोरपणा व टारगटपणा ह्यांत फार मोठें अंतर आहे; आणि उद्दिष्ट साध्य होण्याच्या संभवापेक्षा फाजीलपणाच बोकाळूं लागला, तर सामाजिक आपत्तीच कोसळावयाची ! हें सर्व लक्षांत घेऊनच पालकांनी, शिक्षकांनी व समाजसुधारकांनी मतप्रदर्शन आणि मुलांमुलींना मार्गदर्शन करावें; माकडाच्या हातीं कोलीत देऊन कसें चालेल ?

वर-संशोधनाच्या सध्याच्या पद्धतींत सुधारणा झाली पाहिजे, ह्याबद्दल वाद नाही; परंतु, त्या पद्धतीची जागा घेणारी दुसरी पद्धत एकदम स्वीकारतां येण्याजोगी नाही. तथापि, आई-बापांनी पुढाकार घेतल्यास कांही प्रगति घडवून आणतां येईल. प्रत्येकाच्या किंवा प्रत्येकीच्या माहितींत, विवाहास योग्य अशा वयाची मुलगी असतेच. तिचा परिचय तिला योग्य अशा तरुणाशीं घडवून आणण्याचें काम प्रौढांनी केलें, तर किती तरी तरुण-तरुणी त्यांना दुवा देतील! प्रत्येक कुटुंबाने आपल्या घरीं असे प्रसंग योजून घडवून आणावे आणि माहितीच्या मुलांमुलींना तरी परस्पर-परिचयाची संधि मिळवून द्यावी. आज, घराबाहेर अशी संधि मिळण्याची फारशी शक्यता नाही.

दुसरी गोष्ट अशी की, तरुण-तरुणी एकत्र यावयाच्या, म्हणजे प्रत्येक वेळीं कांही खर्च करावा लागणार. केवळ हवा खाऊन किंवा पाणी पिऊन प्रेम निर्माण होत नाही; निदान सामान्य माणसाच्या बाबतींत तरी त्या प्रेमाला व्यावहारिक गोष्टींची बैठक पुरवावी लागते. मुलें मुलींना महिन्यांतून किती वेळां आईस्क्रीम देणार किंवा सिनेमाला नेणार, ह्याला मर्यादा पडते; म्हणजे असे प्रसंग थोडेच येणार. परंतु घरगुती ओळखी वाढविणें इतकें महाग जात नाही. कौटुंबिक दृष्ट्या यशस्वी असलेल्यांना समाजकार्य करण्याची ही मोठीच संधि आहे; त्यांनी विवाहोत्सुकांचा परिचय घडवून आणून नव्या पिढीपुढील प्रश्न सोडविण्यास जरूर हातभार लावावा.

—सह्याद्रि

● ● ●

## पतीच्या कायद्यांत पत्नीच्या दुरुस्त्या : ६

आपण आपलें कौटुंबिक स्वास्थ्य कसें राखलें, ह्याचें गमक बॉब होप या नटाने थोडक्यांत असें सांगितलें आहे:–"पत्नीला कायदा मी घालून देतों; पण माझ्या कायद्याला तिने केलेल्या दुरुस्त्या, मी आनंदाने मान्य करतों."

कुटुंबांत, पति-पत्नीचें नातें कसें असावें, याचें हें तंत्र मोठें उद्‌बोधक आहे. कायदा करण्याचा अधिकार पतीला, पण त्यांत दुरुस्त्या करण्याची मोकळीक मात्र पत्नीची. म्हणजे मूळ कायदा करणाराचा बोज राहतो व त्याची दुरुस्ती पत्नीनेच केलेली असल्यामुळे, तिला तो जाचक वाटत नाही. तिला कुटुंबांत जबाबदार घटक म्हणून स्वाभिमानाने राहतां येतें.

सरस्वतीबाईंना, मॅट्रिकमध्ये शिष्यवृत्ति मिळालेली होती, यावरून त्यांची हुशारी सहज पटेल. विवाहानंतर, त्यांनी योग्यप्रकारें संसार करून आणि त्याबरोबरच नोकरी आणि शिकवण्या ह्यांच्या साहाय्याने, पतीच्या उच्च शिक्षणास व यशास, बहुमोल हातभार लावलेला आहे. त्याहि नंतर सवडीने बी. ए., बी. टी. झाल्या; लेखन, नाट्य, इत्यादींत त्यांनी प्रावीण्य मिळविलें. इतकें असूनहि त्यांच्या बोलण्या-चालण्यांत, त्याचें यत्किंचितहि प्रतिबिंब पडलेलें दिसत नाही.

जगाला वाटतें की, घरांत विजयचेंच राज्य आहे. पण सरस्वतीबाईंनी आपल्या वृत्तीने त्याला किती काबीज केलेलें आहे, हें फक्त त्यालाच माहीत. त्याच्या कायद्याखाली सरस्वतीबाई राहिलेल्या दिसतात, पण त्यांतील दुरुस्त्यांनी, कायद्याचें स्वरूप पार पालटून गेलेलें आहे. हा कायदा सरस्वतीबाई केव्हा व कसा बदलतात, त्यांत काय काय दुरुस्त्या करतात, हें विजयच्या लक्षांतहि येत नाही.

ग्रंथ संग्रहालय, ठाणें, स्थळप्रत.
अनुक्रम 22441 दि: 10/4/51
क्रमांक 2202 नों: दि: 30/9/51



आमच्या डॉक्टरीणबाईंचें उदाहरण असेंच उद्‌बोधक आहे. त्यांचें स्वतःचें मोठें इस्पितळ असलें व इस्पितळांत त्या सर्वश्रेष्ठ असल्या तरी त्यांनी अंगावरील पांढरा कोट काढून, आपल्या घरांत प्रवेश केला, की त्यांचें पतिपरायण पत्नीमध्ये रूपांतर होतें. घरांतील किरकोळ खरेदी-सुद्धा पतीच्या होकाराखेरीज त्या करणार नाहीत; त्याच्या चहापाण्याची व लहान-सहान सुखसोयींची जातांयेतां आस्थेने चौकशी करतील; चार-चौघांसमोर त्याच्याशीं कधींहि मतभेद दाखविणार नाहीत; त्याच्या-बरोबर बाहेर जातांना त्याच्या पसंतीचेंच पातळ नेसतील; साहजिकच त्या घरांत नातेवाईक, नोकर-चाकर, योग्य त्या प्रकारें सर्वांशीं वागतात आणि शांतता नांदते.

आता रेवतीबाईंचा प्रकार पाहा. त्यांच्या घरांत पति व म्हातारा सासरा, असे दोघेच आहेत. पतीच्या पगारापेक्षा, सासऱ्याचें पेन्शन कितीतरी पटींनी जास्त आहे. अशी परिस्थिति असतांनाहि, सासऱ्याला गवतीचहा करून देण्याची पाळी आली, तर "तुमच्या वडिलांची शुश्रूषा करण्यासाठी मीं तुमच्याशीं लग्न नाही केलं" असें त्या आपल्या पतीला ठासून सांगतात. पतीच्या डोळ्यांदेखत त्याच्या वडिलांची आबाळ होते, इतकेंच नव्हे तर पतीलासुद्धा, रोजचा ताजा चहा मिळूं शकत नाही.

माझ्या एका मित्राकडे मी गेलों होतों, तेव्हा "काय थोडा चहा घेणारना? घेरे थोडा, म्हणजे मलाहि मिळेल." असें म्हणून त्याने आपल्या पत्नीस, "लते, अग जरा चहा करतेस का?" असें मोठ्या प्रेमाने सुचविलें. तेव्हा तिने "सॉरी" असें फणकारून पतीचा माझ्या-देखत अपमान केला. दुसऱ्या एका मित्राची पत्नी, त्याच्यावर इतका गैरविश्वास दाखविते की, त्यामुळे त्याची सर्वजण कुचेष्टा करतात. बाहेरून वेळेवर परत आल्यावर, जातांना नेलेलें पैशाचें पाकीट, त्याने पत्नीच्या हवाली जसेंच्या तसें केलें, तरच त्याची सुटका!

कांही सुशिक्षित स्त्रिया, अशा रीतीने, आपल्या शिक्षणाचें व कडवट-पणाचें, आलेल्यांचें प्रदर्शन करीत असतात; आणि पतीला तुच्छतेने वागवितात. विवाहापूर्वीच्या गाठीभेटींत मुलीने मुलाला जरा कटविलें, किंवा झिडकारिलें तर त्याचा परिणाम कधी कधी प्रेम वाढण्यांत, अंतर तुटण्यांत होतो. पण विवाहानंतर मात्र हा खाक्या उपयोगी नाही; हिताचा तर खासच नाही. पतीचा बोज राखला तर त्यामुळे पत्नीचाहि दर्जा टिकून राहतो, हें पत्नी विसरते. पतीला हिणकस ठरवून आपल्या अकलेची जाहिरात करणाऱ्या स्त्रीला, खुनशीपणाचा तात्कालिक आनंद वाटत असला तरी अखेर तिला योग्य तेंच स्थान मिळणार. पतीला मिळणाऱ्या कमी पगाराबद्दल शिकलेल्या पत्नीला वाटणारें असमाधान, अशा रीतीने कधी कधी व्यक्त होत असतें. तिच्या स्वतःच्या काल्पनिक सौंदर्याला व शिक्षणाला साजेसा सधन पति तिला मिळूं शकला नाही; हा काय त्याचा दोष ?

शिकलेल्या पत्नीला तिचा पति वास्तविक किती तरी जपतो; पण त्याचें चीज होत नाही; कित्येक कुटुंबांतील स्वास्थ्य व शांतता शिकलेल्या स्त्रियांनी पार बिघडवून टाकलेली आहे; पत्नीच्या कैवारा-ऐवजी पतीचा कैवार घेण्याची पाळी आता येऊन ठेपली आहे, अशी तक्रार ऐकूं येऊं लागली आहे. "पायींची वहाण पायींच छान" असे एका सुशिक्षित पत्नीच्या सुसंस्कृत पतीने मोठ्या वैतागाने काढलेले उद्गार, अजून माझ्या कानांत घुमत आहेत ! वास्तविक, पतीला सतत विरोध करून, पत्नी सुखी होणें संभवनीय नाही. अर्थात्, पतीचें वर्चस्व जाचक होऊं न देणें, परंतु त्याच्या सावलीचा फायदा मिळविणें चतुर स्त्रियांना अवघड जाऊं नये.

—केसरी

चैत्र मासानिमित्त श्रीगौरीच्या हळदी-कुंकवाचीं निमंत्रणें लीलाताईनी बुकपोस्टाने पाठविलीं, पण त्या सर्वांस अपुऱ्या पैशाचीं तिकिटें लावून! लोकल पोस्टकार्डाइतकींच लोकल बुकपोस्टालाहि तिकिटें लागतात, अशी त्यांची कल्पना. निमंत्रितांपैकी कित्येक मैत्रिणी हळदी-कुंकवाला कां आल्या नाहीत, हें लीलाताईंना प्रथम उमगलें नाही. पण, ज्या कांही आल्या त्यांच्या बोलण्यावरून लीलाताईंना कळलें, की निमंत्रितांकडे पोस्टमनाने कमी पडलेल्या पोस्टेजच्या दुपटी-इतक्या रकमेची मागणी केली होती! त्या बिचाऱ्या अतिशय खट्टू झाल्या व त्यांत आणखी त्यांना मैत्रिणींची टीका सहन करावी लागली.

लीलाताईंच्या निमंत्रणाचें बुकपोस्ट विमलताईंच्याकडे गेलें तेव्हा त्यांचे पति घरींच होते. ते म्हणाले की, एवढा भुरदंड भरून बुकपोस्ट घेण्याचें कांही कारण नाही; अपुरीं तिकिटें लावणाऱ्यांना त्यांची चूक नीट समजलीच पाहिजे; बुक-पोस्ट परत जाऊन त्यांना स्वतःला भुरदंड सोसावा लागला म्हणजे पोस्टाचे दर त्यांच्या चांगले लक्षांत राहतील. विमलताईंनी आपल्या पतीला समजावून सांगण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण तेवढ्यांत पोस्टमन निघून गेला. विमलताईंच्या पतींने पाकीट उघडून व आंतील निमंत्रण कार्ड वाचूनच बुकपोस्ट स्वीकारण्याचें नाकारलें होतें. त्यामुळे विमलताईंना बुकपोस्टांतील मजकूर त्यांच्या-कडून कळूं शकला व लीलाताईंच्याकडे हळदी-कुंकवास जाणें त्यांना शक्य झालें. त्यांनी लीलाताईंना सांगितलें, 'पोस्टमन आला तेव्हा घरांत मी नव्हतें; एकटा अरुणच होता. त्याने पोस्टमनला पुनः येण्यास सांगितलें. तुम्ही मला आजच्या हळदी-कुंकवाची कल्पना आधीं दिली होतीच, म्हणून बरें झालें.' विमलताईंच्या इतकी समजूतदार मैत्रीण, लीलाताईंना दुसरी एकहि आढळली नाही!

रिक्षे व टांगे कर-करून आणि वाटेंत ते थांबवून विकतच्या वेण्या डोक्यांत घालून, हळदी-कुंकवाला येणाऱ्या स्त्रियांना आपल्या मैत्रिणीच्या भावना जपण्यासाठी थोडासुद्धा खर्च करवला नाही. पण बुकपोस्टाचें पाकीट दडपून उघडून पाहण्याचें मात्र त्यांपैकी कित्येकींना सुचलें होतें व हळदी-कुंकवाला नटून येण्यास त्या विसरल्या नव्हत्या ! सगळ्यांच्या देखत, रस पीत पीत, लीलाताईंची फजिती करण्यास कांहींनी कमी केलें नाही. विमलताईंसारख्या मैत्रिणीबद्दल लीलाताईंना जर जिव्हाळा वाटला, तर बाकीच्यांनी त्याचा हेवा काय म्हणून करावा ?

आपल्या मित्राशीं आपण कसेंहि वागावयास हरकत नाही; कारण कांही झालें तरी तो आपल्या हक्काचा मित्र आहे अशा कल्पनेने किती तरी लोक बेफिकीर असतात. साहजिकच, त्यांना चांगले मित्र जोडतां येत नाहीत व जोडलेले मित्र टिकत नाहीत. डॉ. सॅम्युअल जॉन्सन ह्याने एके ठिकाणीं असें म्हटलें आहे, की मनुष्याने आपली मैत्री टिकविण्यासाठी ती नेहमीच दुरुस्तींत व डागडुजींत ठेवली पाहिजे. स्वतःचें घर, मोटार, सायकल, इत्यादि बाबतींत जाणते लोक योग्य ती दक्षता बाळगतात, असें दिसून येतें. घराचें लाकूडकाम खराब होऊं नये म्हणून बाहेरील दारें व खिडक्या ह्यांना वरचेवर रंग देणें, फरशीच्या दरजा सिमेंटने सांधणें, मोटारीचें दर महिन्याला सरव्हिसिंग करवून घेणें, सायकलीला तेल देणें व तिचें ब्रेक तपासणें, इत्यादि त्या दक्षतेचीं उदाहरणें आहेत.

अर्थात्, ज्या जिनसा स्वस्त व मुबलक मिळतात, त्यांची आपण विशेष काळजी घेत नाही. लहान मुलाच्या तीन-चाकी सायकलीपेक्षा शिवण्याच्या यंत्राला, विजेच्या पंख्याला किंवा रेडिओला आपण अधिक जपतों. वहाणांपेक्षा बुटांची काळजी अधिक घेतों; ते हातांत घेऊन पुसतों पण वहाणा मात्र फरशीवर आपटून त्यांची धूळ

उडवतों. पुस्तकें काचेच्या कपाटांत फळीवर नीट मांडून ठेवतों, मासिकें टेबलावर राहूं देतों, तर वर्तमानपत्रें कोठेहि पडूं देतों! लोकरीच्या कपड्यांचें जतन करण्यासाठीं त्यांच्या घड्यांतून डांबराच्या गोळ्या किंवा लिंबाचा पाला घालून ठेवतों. पण साधे कपडे फाटले, तरी ते शिवण्याचा कंटाळा करतों.

कित्येक निर्जीव जिनसांच्या बाबतींत आपण जी काळजी घेतों, त्या मानाने जिव्हाळ्याचे नातेवाईक व मित्र ह्यांच्या बाबतींत आपण उदासीन असतों. फुकट किंवा पैशापासरी मिळणाऱ्या जिनसांच्या पायरीवर आपण मित्रांना कधीकधी आणून बसवितों, असें म्हटलें तर चुकीचें होणार नाही. त्यामुळे त्यांपैकी कोणी नाराज झाले, तर उलट त्यांनाच आपण दोष देतों. जो लहान-सहान, किरकोळ गोष्टींबद्दल तक्रार करतो, तो मित्र कसचा? असें आपल्या अनास्थेचें आपण समर्थन करतों.

वास्तविक, योग्य मित्रांचा लाभ होणें व ते मित्र टिकणें ही गोष्ट सोपी नसते आणि कांही वयानंतर नवीन मैत्री जडणें अशक्यप्राय होतें. जुन्या मित्रांची जागा घेणारे नवे मित्र येत नाहीत त्यामुळे आपण हळूहळू मित्रहीन आणि एकाकी बनूं लागतों. ह्याची जाणीव अतिशय उशिरा झाल्यावर मग जागे होऊन कांहीच उपयोग होत नाही; म्हणून मैत्री टिकविण्याकडे विशेष लक्ष पुरवावें लागतें.

विमलताईंनी लीलाताईंना व स्वतःच्या पतीला किती हुशारीने संभाळून घेतलें, नाही का? मैत्री ही मानसिक आत्मीयतेची बाब आहे असें मानून तिच्या बाबतींत निष्क्रिय राहणें किंवा व्यवहारी दृष्टीने प्रयत्न न करणें चुकीचें ठरतें. मित्र दृष्टीआड झाला की त्याचें विस्मरण व्हावयाचें, त्याच्या पत्रांना उत्तर पाठविण्यास आळस करावयाचा, त्याला स्वतः होऊन तर कधीच पत्र धाडावयाचें नाही, त्याचा पत्ताहि

विसरावयाचा, त्याच्या मुलां-मुलींचीं नांवें लक्षांत ठेवावयाचीं नाहीत, त्याच्या सुखदुःखाकडे दुर्लक्ष करावयाचें, असेंच बहुधा आढळतें. मित्राबद्दल जर कळकळ असेल तर त्याच्या लहानसहान गोष्टींबद्दलहि आपल्याला नको का आस्था वाटायला? त्याचा वाढदिवस, त्याच्या परीक्षा, त्याच्या आवडीचे पदार्थ, त्याच्या पसंतीचे रंग, त्याच्या नापसंतीचे विषय, त्याच्या कुटुंबियांची प्रकृति, त्याच्या कौटुंबिक घडामोडी, ह्या सर्वांकडे सतत दुर्लक्ष करावयाचें; पण त्याची केव्हा तरी कालांतराने गाठ पडली म्हणजे मात्र त्याला मारे मिठी मारावयाची, ह्यांत काय स्वारस्य आहे ?

नलिनीने आपल्या मैत्रिणीच्या आवडीची कांही माहिती वृत्तपत्रांत वाचली; लागलीच तें कात्रण तिने मैत्रिणीकडे पाठवून दिलें. बाबूरावांनी मित्राला हवें असलेलें पुस्तक मिळवून त्याच्याकडे धाडलें; उषाताईंनी मैत्रिणीच्या मुलीच्या परीक्षेच्या दिवशीं शुभेच्छा पाठविल्या; तर नानांनी मित्राची मुलगी परीक्षा पास झाल्यावर त्याच्याकडे पेढे न मागतां उलट स्वतःच पेढ्यांचा पुडा देऊन तिचें अभिनंदन केलें. मित्र जरा आजारी आहे, असें कळतांच विजयने आजारासंबंधी मित्राच्या डॉक्टराकडे आधी चौकशी केली व नंतर तो त्याला लागलीच भेटावयाला गेला.

शेजारचे एक मित्र व त्याची घरची मंडळी नोकरीनिमित्त परराज्यांत राहावयास जावयाचीं होती. तेव्हा वीणाताईंनी आपल्या पतीला सुचवून त्या सर्वांना त्यांच्या प्रवासास निघण्याच्या दिवशीं दुपारीं जेवावयास बोलाविलें. त्यामुळे त्यांना सामानाची बांधाबांध करण्यास पुरेसा वेळ मिळाला व शांत चित्ताने ते वेळेवर जाऊं शकले; त्यांच्या नंदूच्या दूधभाताचीहि सोय झाली. जेवणाचा बेत अगदी साधा केलेला होता व त्यांतील रहस्यहि पाहुण्यांनी जाणलें हें विशेष. स्टेशनवर निरोप घेण्यासाठी त्यांच्या मित्रांनी खूपच गर्दी केली होती पण त्यांच्या

न्हारतुऱ्यांपेक्षा दुपारच्या पिठलें-भाकरीचा परिणाम अधिक चांगला व टिकाऊ झाला नाही, तरच नवल.

ह्या सगळ्या गोष्टींना फार खर्च येतो, असें मुळीच नाही; पण वेळ पाळणें हीच गोष्ट महत्त्वाची असते व त्यांत औचित्य आणि व्यवहार या दोन्ही गोष्टी साधतात. मित्रत्वाची भावना असून केवळ पुरत नाही; ती कौशल्यानें व्यक्तहि करावी लागते. म्हणून तर ह्या व्यवहाराला कलेचें स्वरूप प्राप्त होतें. लोकांशीं बोलतांना आपल्या मैत्रीची जाहिरात करावयाची, पण तिच्याप्रीत्यर्थ स्वतः कोणतीहि झीज सोसावयाची नाही, असें करून चालत नाही. मैत्रीचा फायदा फक्त पाहिजे पण तिची जोपासना करावयास नको, ही वृत्ति फलदायी होत नाही.

मैत्री काय, किंवा कौटुंबिक नातें काय, त्यांत मुद्दाम दक्षता घेण्याजोगें काय आहे, असें कित्येकांना वाटतें. भर उन्हाळ्यांतहि झाडें पाण्यावाचून कसाबसा टिकाव धरून राहतील; पण आपण त्यांना भरपूर जीवन दिलें तर तींच झाडें कितीतरी प्रसन्नता पसरवतील. एका बगीच्यांतील झाडें एवढीं टवटवीत कां दिसतात व त्यांना रसरशीत फुलें-फळें कां येतात आणि शेजारच्याच बगीच्यांतील झाडें एवढीं नीरस व रुक्ष कां वाटतात, ह्याचें कारण त्यांची घेतलेली सतत निगा किंवा तिचा अभाव हेंच असतें.

पाणी घालणें, कीड काढणें, खुरपणें, खत-माती घालणें, छाटणी करणें, इत्यादि मार्गांनी झाडांची जोपासना व जपणूक करावी लागते, व त्यांतहि सातत्य असावें लागतें. मशागतींत खंड पडून भागत नाही; कारण तेवढ्या मुदतींतहि भरून न येण्याइतकें मोठें नुकसान होण्याची शक्यता असते. पाण्याच्या कांही पाळ्या चुकल्या, तर उसाचें चिपाड बनून जातें. गुलाबाच्या झाडाला पाणी मिळण्यास उशीर झाला तर तें निस्तेज होतें व त्याचीं फुलें व कळ्या अक्षरशः करपून जातात.

आपला अत्यंत जवळचा मित्रसुद्धा, त्याला एखादेवेळीं जरी अपमान वाटला किंवा त्याचा अपेक्षाभंग झाला, तर दुरावतो आणि त्याची समजूत पाडण्यास आपल्याला संधीच मिळत नाही, असें कधी-कधीं घडतें.

आपल्या मित्राविषयी कोणी चांगले उद्गार काढले, तर ते मित्राला जरूर कळवावे. त्यामुळे त्याला कितीतरी बरें वाटतें. उलट, मित्राविषयी इतरांचा गैरसमज झालेला असेल, तर त्यासंबंधींहि यथातथ्य माहिती मित्राला द्यावी; म्हणजे सुधारणा व दुरुस्ती करण्यास त्याला वाव मिळतो. बगीच्यांतील झाडांना आपण पोषक खत-माती-पाणी देतों, व त्याबरोबरच कीड, वाळवी, बांडगुळें, इत्यादींचा त्यांना उपद्रव होऊं देत नाहीं. मैत्रीलाहि अशाच प्रकारच्या दक्षतेची आवश्यकता असते; नाजूक वेलीप्रमाणेच मैत्रीचें संवर्धन करावें लागतें.

—सह्याद्रि

श्रीमती एलेनर रूझवेल्ट ह्यांनी "भारत आणि जागृत होत असलेली पूर्व" ह्या आपल्या पुस्तकांत लिहिलें आहे, "आम्ही भारतांतील शहरांतून रस्त्याने मोटारींतून जात असतांना कांही झाडूवाले रस्ता झाडीत असलेले आम्हांला दिसले. त्यांच्या झाडण्याच्या पद्धतीने माझ्या मनावर चांगलाच ठसा उमटविला. म्हातारे स्त्री-पुरुष झाडूवाले गुडघ्या-पर्यंत वाकून, काड्या बाधून तयार केलेल्या लहानशा खराट्यांनी रस्ते स्वच्छ करीत होते. त्यांचे खराटे पाहिले, म्हणजे त्या मानाने ते फारच चांगल्या रीतीने झाडलोट करीत होते, असें म्हटलें पाहिजे. पण त्या खराट्यांत मला बराच बोध आढळला. भारतांत खराट्यांच्या दांड्यांपेक्षा माणसेंच स्वस्त आहेत; खराट्याच्या दांड्यासाठी थोडा खर्च करण्यापेक्षा थकलेला झाडूवाला बदलणें हेंच अधिक सोपें वाटतें." "हे झाडूवाले लहान खराट्यांनीं झाडणेंच पसंत करतात; लांब दांड्याचे खराटे त्यांनीं वापरावे असा कितीहि प्रयत्न केला तरी त्याचा उपयोग होत नाही" असें श्रीमतीं रुझवेल्ट यांना राष्ट्रसभेच्या कचेरीने उत्तर पाठविलें.

झाडूवालेच लांब दांड्याचे खराटे वापरण्यास व उभ्याने आरामशीर झाडण्यास नकार देतात हें खरें मानलें, तरी असेच झाडूवाले सर्वत्र आढळत नाहीत काय? सोयीच्या नव्या गोष्टींचा अंगीकार करण्यास आपण जेवढे तत्पर असावयास पाहिजे तेवढे नसतों आणि कनिष्ठ समजल्या गेलेल्या लोकांच्या सुखाची, सोयीची, साध्या गरजेचीहि, कोणीच फिकीर करीत नाही. त्या कारणाने, या लोकांच्या अपेक्षा आणि सवयीहि पण तशाच बनतात व ते कष्टमय जीवन जगत असतात. छकड्याचा बैल किंवा टांग्याचा घोडा पावसांत भिजत काम करतो, तशीच कनिष्ठ समजल्या गेलेल्यांची स्थिति असते. एक डच विमान मुंबईजवळ कोसळलें तर त्यांतील उतारूंच्या पुढील व्यवस्थेसाठी हॉलंड-

मधून खास विमान तात्काळ येऊन दाखल होतें. याच्या उलट, आपल्या सरकारी इस्पितळांत मरण पावलेल्याचें शव झाकण्यास दोन हात वस्त्रसुद्धा कधीकधी उपलब्ध होत नाही, अशी वस्तुस्थिति आहे.

संपत्ति वाढवून ती विपुल करणें व तिच्या मानाने मनुष्याचें महत्त्व वाढवून त्याच्या सुखासाठी संपत्ति सढळ हाताने खर्च करणें, हें आर्थिक प्रगतीचें चिन्ह आहे. पण आपल्याकडे अद्याप संपत्तीचें दुर्भिक्ष आहे, तिच्या वाटणींत विषमता आहे आणि मनुष्याची किंमत तर कस्पटासमान आहे. त्यामुळे माणसाच्या जिवाचा बचाव करण्यासांठी समृद्ध देश जसा खर्च करतात, तसा आपण करूंच शकत नाही. पुरांमुळे नुकसान झालें तर मनुष्यहानीपेक्षा मालमत्तेची हानि आपल्याला अधिक भयानक वाटते. कारण, माणसांचा तुटवडा पडणार नाही पण घरें, झोपड्या, जनावरें, नांगर, बीं-बियाणें, हीं पुनः कोठून आणावयाचीं व झालेलें नुकसान भरून कसें काढावयाचें? गर्दीच्या वेळीं लोकल-गाड्यांना लोंबकळत जाणारे कांही उतारू अपघात होऊन मरण पावले, तरी जास्त गाड्या सोडून गर्दी कमी करण्यापेक्षा उतारूंचें मरण सरकारला, म्हणजे समाजाला परवडतें. यंत्रें दुरुस्त करण्यापेक्षा किंवा नवीन बसविण्यापेक्षा त्यांवर काम करणारीं माणसें बदलणें सोपें वाटतें.

मोठमोठ्या बंगल्यांतील भांडीं घासणाऱ्या मोलकरणींना भर पावसांतच काम करावें लागतें. त्यांच्या डोक्यावर छप्पर असण्याची आवश्यकता कोणासच वाटत नाही. मोठमोठ्या बांधकामावरील कामगार आजारी पडले की त्यांना घरीं बसविलें जातें व नव्यांची भरती केली जाते. ह्या आजारी माणसांचें पुढे काय होतें, हें कोण विचारणार? खराट्याला लांब दांडा लावण्यापेक्षा झाडूवाल्यालाच खराट्याच्या टुंब्यापर्यंत वाकावयास लावणें स्वस्त पडतें !

या सर्वांचें सार एवढेंच, की आपण अद्याप आर्थिक दृष्ट्या अगदी कनिष्ठ परिस्थितींत आहों व त्या परिस्थितीचीच आपल्या संस्कृतीवर छाप पडलेली आहे. संपत्ति निर्माण करणें ही बाब अत्यंत महत्त्वाची असली तरी ती निर्माण करणारे व तिचा उपभोग घेणारे, यांचाहि विचार झाला पाहिजे. रस्ता स्वच्छ झाडला गेल्याने केवळ भागणार नाही; झाडूवाल्याचें त्या कामीं कंबरडें मोडलें जातां कामा नये. संपत्तीची वाढ होत गेली पाहिजे, आणि ती संपत्ति माणसाच्या सुखांत भर घालण्यास कारणीभूत झाली पाहिजे. संपत्तीसाठी माणसाचा बळी दिला जाऊं नये, तर माणसासाठी संपत्तीचा वापर व्हावा, हें विकसित संस्कृतीचें लक्षण आहे. भारतांत माणसांचें पीक मोठें आणि संपत्तीचें उत्पादन बेताचें, अशा परिस्थितींत संपत्तीच्या तुलनेने माणसाची किंमत किती राहणार? संपत्ति भरपूर निर्माण व उपलब्ध झाली व तिची वाटणी न्यायाने होऊं लागली, म्हणजे माणसाचें महत्त्व वाढेल हें उघड आहे. पण, तें आपोआप घडून येणार नाही.

—केसरी

●●●

चालू लग्नाच्या मोसमांत आहेर देण्याचे अनेक प्रसंग आले तेव्हा विवेकच्या घरीं झालेली चर्चा मोठी उद्बोधक होती. विवेकच्या पुतणीचा विवाह ठरला, तेव्हा साहजिकच तिला आहेर काय करावा याविषयी बोलणें निघालें. विवेकने १० रुपयांचा आहेर पुरे, असें सांगितलें. तेव्हा त्याच्या पत्नीला तें पसंत पडलें नाही. विमलच्या लग्नाच्या वेळीं आपण २० रुपयांचा आहेर केला होता; आता तिच्याच बहिणीला १० रुपयांचा आहेर करून कसें चालेल? असें तिला साहजिकच वाटत होतें.

विवेकने वृत्तपत्राचा ताजा अंक उघडून त्यांतील घाऊक किंमतींच्या निर्देशांकांचा तक्ता पुढे ठेवला व तो म्हणाला, "विमलचं लग्न झालं तेव्हा निर्देशांक ३५० होता; आता तो ४२५ झाला आहे. म्हणजे, त्यावेळच्या मानानं आता २१ टक्के महागाई जास्त आहे. आपली प्राप्ति जवळ जवळ कायमच आहे; पण आपल्या मुलांच्या संख्येंत भर पडली आहे. शाळांची फी वाढली आहे, भाडं दीडपट झालं आहे, सर्वच खर्च एकसारखे वाढत आहेत. तेव्हा, खरं म्हटलं तर आहेर देण्याची सुद्धा आपली ऐपत उरलेली नाही. धान्य, सरपण, घरभाडं, दूध, ह्यांत कांहीं बचत करतां येत नाही. तेव्हा, पूर्वीच्या मानानं लहान आहेर केला तरच कांहीतरी तरणोपाय आहे. आपल्या सुधीला पोहायला शिकवायचं होतं, तें सुद्धा मे महिन्यांत खर्च फार होतो म्हणून आपण रद्द केलं. बाळ्याला शब्दकोश घेऊन द्यायचा आहे, तो आपण पुढं पुढं ढकलीत आहोंत आणि नवसाचा सत्यनारायणसुद्धा आपल्या हातून पार पडलेला नाही. अशा परिस्थितींत आहेराचा विचार, हाच अविचार ठरतो."

विवेकचें मन परिस्थितीने जितकें घट्ट केलें होतें, तेवढें त्याच्या पत्नीचें झालें नव्हतें. त्यामुळे ती एकसारखी 'पण, पण' करीत

राहिली. अखेर तिला विवेकचें म्हणणें पटलें. कारण, तेवढ्यांतच आणखी एका लग्नाची अक्षत आली व त्यासाठी तर परगावीं जाणें जरुरीचें होतें ! कौटुंबिक बजेटांत हे खर्च आता बसूंच शकत नाहीत, त्यामुळे घर-खर्चाला विलक्षण ताण पडतो आणि त्या बाबतींत लेचेपेचेपणा उपयोगाचा नाहीं हें तिला समजून चुकलें. एकदा काटकसरीचें धोरण ठरल्यानंतर, थोडा खर्च केव्हा तरी इकडे तिकडे जास्त झाला, तर परिस्थिति आवाक्याबाहेर फारशी जात नाही.

आहेरावरून हा प्रश्न निघाला म्हणून त्याचा जरा प्रदीर्घ उल्लेख केला. परंतु, ही विचारसरणी सर्वच खर्चांच्या बाबतींत लागू केली पाहिजे. भाजी महागली की, आपण ती घेण्याचें टाळतों किंवा कमी करतों; तोच नियम इतर खर्चाच्या बाबतींत अमलांत आणता आला पाहिजे. पण तें अतिशय अवघड जातें. प्रत्येक बाब स्वतंत्रपणें पाहिली, तर लहान वाटते. जेथे काटकसर केली जात नाही, अशा बाबींची संख्या मोठी असली व त्या सर्वांचा एकत्रित हिशेब केला म्हणजे डोकें फिरण्याची पाळी येते. एका वेणीचा किंवा एका सिंगल चहाचा किंवा एखादा चित्रपट पाहण्याचा हा प्रश्न नाही. उत्पन्नाच्या मानाने आपण खर्च वाढूं देत नाहीना; त्यासाठी अनावश्यक खर्च चालू ठेवून जरुरीच्या खर्चास मात्र कात्री लावीत नाहींना, हें वरचेवर तपासून पाहण्याचा हा प्रश्न आहे. निर्देशांकांचा ह्या कामीं उपयोग करतां घेण्याजोगा आहे.

ह्या निर्देशांकाविषयी माहिती सरकारच्या आर्थिक सल्लागाराच्या कचेरीमार्फत दरमहा प्रसिद्ध केली जाते व ती वृत्तपत्रांतून छापून येते, पण त्यांच्याकडे ज्याप्रकारें लक्ष द्यावयास पाहिजे, तसें लोक देत नाहीत असा अनुभव आहे. वास्तविक, घरा-घरांतून त्यांचा अभ्यास केला जाणें अगत्याचें आहे. ऑगस्ट १९३९ अखेर संपलेल्या वर्षीं सर्व प्रकारच्या मालाची घाऊक किंमत १०० रुपये मानली, तर

१९५२–५३ मध्ये ती ३८० रुपये, १९५५–५६ मध्ये ३६० रुपये व १९५६–५७ मध्ये ४१४ रुपये झाली होती. म्हणजे, महागाई त्याप्रमाणे वाढत गेली, असे हे निर्देशांक सांगतात.

१९३९ मध्ये एखाद्याला १०० रुपये पगार असला व तो १९५६–५७ मध्ये ४१४ रुपये झाला, तर वाढलेल्या निर्देशांकांवरून दिसून येणारी महागाई त्याला विशेष जाणवणार नाही. कारण, महागाईच्या प्रमाणांत त्याची प्राप्तीहि वाढली आहे. खर्च वाढला तर खिशांत पैसेहि अधिक असल्याने तो खर्च भागवूं शकला. प्राप्तींतून बचत मात्र झाली नाही.

वाढत्या महागाईच्या प्रमाणांत ज्यांची प्राप्ति वाढली आहे, असे लोक विरळेच. बहुतेकांची प्राप्ति थोडी वाढली असली तरी प्राप्ति व खर्च ह्यांचें प्रमाण बिघडत गेलें आहे आणि त्यावर उपाय म्हणजे खर्च कमी करणें व प्राप्ति आणखी वाढविणें हाच आहे. परंतु, आणखी प्राप्ति वाढविणें किती जणांना शक्य होणार? आणि ती प्राप्ति तरी पुरेशी वाढणार काय? खर्च आणखी कमी करणेंहि बहुतेकांना अशक्य, निदान अवघडच जाणार. पण, त्यामुळे निराश होऊन कसें चालेल? घरांतील एकट्यानेच नव्हे, तर ज्याला ज्याला शक्य आहे, त्याने त्याने मिळेल तें काम करून कुटुंबाच्या उत्पन्नांत भर घालायला हवी आणि काटकसरीच्या बाबतींतहि प्रत्येकाने पुढाकार घ्यायला पाहिजे. त्यांत स्वहित साधून, इतरांनाहि मार्गदर्शन होतें. ह्या दोन्ही मार्गांचा अवलंब करूनहि परिस्थिति आटोक्यांत येईलच, असें नाही; त्यामुळे घरच्या उत्पन्न–खर्चाची तोंडमिळवणी होईलच, असेंहि नाही. पण, कोणता खर्च आणखी कमी केला पाहिजे हें ठरवितां व त्याप्रमाणे वागतां आल्याने घरोघरचे खटके कमी होतात व कटुता नष्ट होऊन महागाईला तोंड देणें मानसिक दृष्ट्या अधिकाधिक सुकर होत जातें.

खोट्या प्रतिष्ठेला बळी पडून, कालच्या पद्धतीने आज चालून, विचारापेक्षा विकाराला महत्त्व देऊन चालणार नाही. ह्याचा अर्थ, प्रतिष्ठेला महत्त्व नाही, असें मुळींच नाही. पण ती परवडली पाहिजे, एवढेंच येथे सांगण्याचा उद्देश आहे. उत्पन्नाची बाजू वाढविणें आपल्या हातांत फारसें नसतांना खर्चाची बाजू तरी आवाक्यांत राखण्याचा प्रयत्न केला पाहिजे. इतरांच्या बेगडी रुबाबाची आपण पर्वा करतां कामा नये. मध्यमवर्गीयांत तरी कामसू व काटकसरी मनुष्यच कुटुंबाचें खरें हित साधीत असतो. प्रवाहपतितांना वाटत असतें, की ते समाजांतील त्यांची मान्यता कायम राखीत असतात. पण त्यांपैकी कित्येकांच्या मुलांचे वार्षिक परीक्षांचे निकाल त्यांची फी भरली गेली नाही म्हणून रोखून ठेवलेले असतात, ह्याची टोचणी त्या बिचाऱ्या बालकांना किती नाउमेद करीत असते, आणि इकडे त्यांचे पालक सामाजिक प्रतिष्ठेकरिता दुकानदारांना उधारीसाठी विनवण्या करीत उन्हांतानांतून हिंडत असतात !

—केसरी

● ● ●

## लष्करी अधिकाऱ्याची सहचारिणी : १०

लष्करी अधिकारी आपल्याला पति मिळावा अशी उत्कट आकांक्षा कितीतरी तरुणींमध्ये दिसून येते. इतर लोकांत लष्करी अधिकारी कसे उठून दिसतात? हो, अगदी उठून दिसतात. त्यांच्या स्त्री-पुरुषासंबंधींच्या आचार-विचारांत स्त्रियांना मोठाच मान दिला जातो; त्या समीप येतांच ते अदबशीरपणे उभे राहतात. असा मान मिळण्याची बहुतेक स्त्रियांना सवयच नसते. लष्करी माणसामधील रुबाब आणि अदब ह्यांचें साहचर्य स्त्रियांना फारच मोहक व आकर्षक वाटतें. लष्करी माणसाची उंची, भरदार शरीर, व्यवस्थित कापलेले व राखलेले केस, तुकतुकीत चेहरा, कडक इस्त्रीचे चुस्त कपडे, जाड तळाचे चकचकीत बूट, ह्या सर्वांचा तरुणींच्या मनावर परिणाम झाल्याविना राहत नाही. मासिकांतून, वृत्तपत्रांतून, त्यांच्या विविध कार्यक्रमांचीं चित्रें छापून येतात, त्यांचींहि छाप तरुणींच्यावर पडते.

लष्करी अधिकाऱ्यांना पगार किती मिळतो, ह्याची चौकशी करण्याचेंहि कारण तरुणींना वाटत नाही. ते लोक चैनींत, ऐटींत वावरतांना दिसतात तेवढें त्यांना पुरतें. नोकरीच्या वैशिष्ट्यामुळे लष्करी लोकांना दरबारांत आणि म्हणूनच समाजांतहि विशेष मान असतो. तेवढ्याच पगाराच्या मुलकी अधिकाऱ्यापेक्षा लष्करी अधिकारी कितीतरी तोऱ्याने वावरतात; निदान तसें वाटतें तरी. त्यांच्या पत्नींना नृत्याला जायला मिळतें, हिंडायला किमान फटफटीची पिलियन सीट असते, फॅशन्स करायला पूर्ण मोकळीक लाभते, त्यांच्या बॉब केसांचें, तलम वस्त्रांचें, त्यांतून डोकावणाऱ्या अवयवांचें, परपुरुषांबरोबर हिंडण्याचें कौतुकच होतें. धर्मनिष्ठ, जुन्या वळणाचे आई-बाप आणि सासू-सासरे ह्यांच्या मतांना जुमानण्याची त्यांना आवश्यकताच वाटत नाही; कारण हींच

वयस्क माणसें त्यांना हें सर्व करण्याला प्रतिबंध करीत नाहीत, आणि पतीहि त्यांना भरपूर वाव देतात.

साहजिकच, लष्करी अधिकाऱ्याची पत्नी होण्याची इच्छा कित्येक सुखार्थी तरुणींच्या मनांत निर्माण होते. लष्करी अधिकाऱ्याशीं विवाह झालेली कालची साधी व गरीब प्रभा लागलीच चटकचांदणी बनलेली तिच्या मैत्रिणींना आढळते. तिचा पतीहि तिला तळहाताच्या फोडासारखा वागवतांना, तिला जिवापाड जपतांना दिसतो. मग तिच्यासारखे होण्याची इच्छा बाकीच्यांना कां नाही होणार ?

लष्करी अधिकाऱ्याच्या पत्नीला मिळणारें स्वैराचाराचें स्वातंत्र्य आणि तिच्या दिमाखाची झळक, ह्याविषयीची खरी कल्पना बाकीच्यांना कशी येणार ? लष्करी अधिकाऱ्यांचे पगार आता पूर्वीसारखे उरलेले नाहीत आणि पैशाची किंमतहि पाव पटीवर आली आहे. तरी सुद्धा, लष्करी अधिकाऱ्यांनी आकर्षक पद्धतीने राहावें ही अपेक्षा मात्र कायमच आहे. त्या कारणाने, एकीकडे बाह्यात्कारी सुबत्ता आणि बेफिकीरी दिसत असतांना दुसरीकडे महागाईची व काटकसरीची भाषा सतत चालू असते. लष्करी पति-पत्नीची तोंडमिळवणी उघडपणें झाली तरी त्यांच्या उत्पन्ना-खर्चाची तोंडमिळवणी लपून सुद्धा होऊं शकत नाही. किती तरी जणांचें त्यांच्या पगारांत भागत नाही व त्यांना कर्ज काढण्याची, निदान उसनवारीची, वरचेवर पाळी येते. अंदरकी बात पत्नीला लवकर समजली तर ठीक; उशीर झाल्यावर सावरणें देखील फार कठीण जातें.

लष्करी पत्नी स्वतःच्या इच्छेप्रमाणेच नाचत असते असें म्हणतां येणार नाही. ती नाचविली जात असते. पण इतरांना ती तसें दर्शवीत नाही, कळूं देत नाही. त्यामुळे ती नेहमी हसरी, चैनींत मग्न, अशी वाटते. पति लष्करी असो वा नसो, प्रत्येकच पत्नीला आपल्या पतीशीं मिळतें घेऊन, प्रसंगीं मतभेद झाला तर त्याच्याच इच्छेला मान देऊन वागावें लागतें. लष्करी अधिकाऱ्यांच्या पत्नींच्या बाबतींत तर हें जास्तच

आवश्यक असतें. कारण, त्यांना स्वतःच्या कर्तृत्वाचा, नेतृत्वाचा विशेष अभिमान असतो आणि त्यांच्या पत्नीबाबतच्या अपेक्षाहि जास्त असतात. प्राण धोक्यांत घालणारा शिपाईबाणा त्यांनी पत्करलेला असतो. अशा पुरुषांच्या पत्नींना नेहमीच आपल्या पतीच्या तैनातींत राहावें लागतें.

आजूबाजूचीं उदाहरणें त्यांना सांगतात, की नवऱ्याला नाखूष करूं नका. तुम्हाला टाकून जावेसें त्यांना वाटणार नाही असेंच वागा. दुसरी जें देऊं शकेल, करूं शकेल तें तुम्हीच खुषीने देण्याचा व करण्याचा प्रयत्न करा. साहजिकच, पतीची खुशामत करून त्याच्यांतील 'पुरुषा'चें सतत समाधान करीत राहणें तिला क्रमप्राप्त होतें. कित्येकींना अशा रीतीने मन मारावें लागतें, आडदांड व रानवट नवऱ्याच्याहि पुढेपुढे करावें लागतें आणि हें सर्व आपण स्वखुशीने, आनंदाने करीत आहोंत असें दाखवावें लागतें. लष्करी अधिकारी व त्याची पत्नी ह्यांच्यामधील नात्याचें हें अतिरंजित वर्णन प्रातिनिधिक नाही हें खरें; परंतु कांही पत्नींच्या हास्य-विनोदामागें काय दडलेलें असूं शकतें याची कमींत कमी यावरून कल्पना येऊं शकेल व भपक्याला भाळणाऱ्या कित्येक तरुणींची अगतिकता ध्यानांत येईल.

लष्करी अधिकारी सामान्यतः स्वच्छंदीपणाला अनुकूल वाटला तरीं खरा तो तसा नसतो. स्वतःच्या पत्नीने इतर स्त्रियांच्या मानाने मागे राहूं नये अशी त्याची इच्छा असली तरी तिने फार पुढे गेलेलेंहि त्याला मनापासून आवडत नाही. इतर लष्करी अधिकाऱ्यांच्या पत्नींत त्याला स्वतःला मिसळतां यावें इतपत ती पुरोगामी असावी, पण तिच्याशीं इतरांना सलगी करतां येणें अवघड जावें इतपत ती जुन्या वळणाची व धोरणी असावी, असें त्याला वाटत असतें. नोकरीच्या कामानिमित्त एकटें राहावें लागलें असतांना पत्नीबद्दल काळजी वाटून त्याची झोप उडेल, अशी परिस्थिति होतां कामा नये या प्रमाणांतच तिचें इतरांशीं

वर्तन असावें; अधिक खेळकरपणा असूं नये; अशीच त्याची इच्छा असते. हा सुवर्णमध्य कसा साधावयाचा हें त्यालाहि सांगणें कठीण जाईल. परंतु सर्वसाधारणत: असें असावयाला पाहिजे, अशीच त्याची अपेक्षा असते. त्याचा परिणाम म्हणजे लष्करी अधिकाऱ्याच्या पत्नीला नेहमीच तारेवरचा नाच करावा लागतो आणि एक डोळा पतीच्या डोळ्याकडे लावून ठेवावा लागतो.

लष्करी अधिकारी जेव्हा शहरांत असतो व आपल्या वधूला किंवा नव्या नवरीला फटफटीवरून ठिकठिकाणीं नेऊन तिची तृप्ति करतो तेव्हाचा कॅप्टन, आणि त्याच्याबरोबर मॅरीड क्वार्टर्समध्ये राहण्यास गेल्यानंतर तिला अनुभवास येणारा कॅप्टन, ह्यांच्यांत मोठा फरक असतो. शहरांतील अनुभव असा, की पत्नीपुढे सर्व जग त्याला तुच्छ वाटतें; बाकीच्या सर्व गोष्टींचा त्याला विसर पडलेला असतो; तिला सोडून तो एकटा राहूंच शकत नाही. ह्याच अभिलाषेने ती कँटोन्मेंटमध्ये नांदावयास गेली म्हणजे तिच्या लक्षांत येतें की, तेथे लष्करी नोकरीलाच पहिलें स्थान आहे; पत्नीच्या ह्या सवतीकडेच त्याचा जास्त ओढा असतो; पत्नीला त्या मानाने दुय्यमच स्थान मिळतें. लष्करी नोकरीच्या कामापुढे त्याला बाकी कशाचेंहिं महत्त्व वाटत नाही आणि तसें वाटून चालणारहि नाही. पत्नीने ह्याबाबत तक्रार केली तर ती ऐकून घेण्यासहि तो मुळीच तयार नसतो. पत्नीने फारच त्रागा केला, माहेरीं जाण्याचा धाक दाखविला, तर काय व्हावयाचें तें ठरलेलेंच असतें.

लष्करी पतीच्या सान्निध्यांत चतुर पत्नी असें दर्शविते, की ती सर्वस्वी त्याच्यावरच अवलंबून आहे, त्याच्या मार्गदर्शनाची तिला आवश्यकता आहे, त्याच्या आधारानेच ती चालते; परंतु पति दूर गेल्यामुळे तिला एकटें राहावें लागलें म्हणजे मात्र ती आपलें कर्तृत्व दाखविते. तिला सर्व गोष्टी एकटीलाच स्वतःच्या हिमतीवर कराव्या लागतात. मुलांचें शिक्षण, आजारपण, इत्यादि वेळीं ती आत्मविश्वासाने

लागते; वेळोवेळीं तिला सल्ला देण्याला तिचे नातेवाईक जवळपास असतीलच असें नाहीं. पैशाचे व्यवहार तिलाच पाहावे लागतात, चेक मोडून आणावे लागतात आणि ठरलेल्या रकमेंत खर्च भागवावे लागतात. पतीकडे जातांना किंवा पतीकडून येतांना दूरदूरचे प्रवास एकटीला करावे लागतात. थोडक्यांत म्हणजे, तिला कितीतरी बाबतींत पुरुषी वृत्ति व कणखरपणा दाखवावा लागतो.

दूर असलेल्या पतीशीं पत्रव्यवहारहि तिला फारच कुशलतेने करावा लागतो. पतीला घरची काळजी मुळीच वाटतां कामा नये; सर्व कांही सुरळीत चालू आहे, सगळ्यांची प्रकृति उत्तम आहे, सर्वजण आनंदांत आहेत, अशीच त्याची खात्री झाली पाहिजे. पति आपल्या कामाकडे लक्ष देईल, की पत्नीच्या तक्रारी व कटकटी ऐकत बसेल याची तिला पदोपदीं जाणीव ठेवावी लागते. किरकोळ गोष्टी व गैरसोयी त्याच्या कानांवर न गेलेल्याच बऱ्या; कारण त्यांना तो नसतें महत्त्व देऊन विनाकारण काळजी करीत बसावयाचा! पतीपासून दूर राहिलेली पत्नी मौजा मारीत आहे असाहि त्याचा ग्रह होऊन चालणार नाहीं. आनंदांत असणें आणि मौजेंत राहणें, ह्यांत फरक आहे.

लष्करी कँपमधील शेजाऱ्यांत नाना प्रांतांतील, नाना धर्मांचे, नाना जातींचे लोक असतात. त्या सर्वांशीं समरस होण्याची हातोटी लष्करी अधिकाऱ्याच्या पत्नीला साधली पाहिजे. आपल्या चालीरीती विना कारण न सोडतां, इतरांच्या चालीरीती समजून घेणें व त्यांबद्दल आदर दाखविणें इष्ट असतें. इंग्रजी आणि हिंदी ह्या भाषांतून सराइताप्रमाणे बोलतां आलें पाहिजे. कोणत्याहि विचित्र वाटणाऱ्या गोष्टीवर टीका करतां कामा नये. स्वतःच्या कांही गोष्टींवर शेजाऱ्यांनी केलेली टीका आपल्याला सहन होत नाही, हें लक्षांत ठेवूनच तिने स्वतःचें मतप्रदर्शन केलेलें बरें. तिला वेगवेगळे नवे जिन्नस बनवितां येणें जरुरीचें आहे. पार्टीच्या वेळीं पतीला जो पदार्थ आवडलेला दिसेल, तो शिकून

घेऊन तिने करून दाखवला पाहिजे आणि तिच्या पाकशास्त्रांतील कौशल्याची इतरांनी केलेली तारीफ पतीच्या कानावर पडली पाहिजे; तरच मिसेस् देवदासन् किंवा मिसेस् कपूर ह्यांची स्तुति आपल्या पतीच्या तोंडून तिला जेवणाच्या टेबलावर वरचेवर ऐकावी लागणार नाही.

आपल्या पतीच्या हाताखालील जवान व त्यांची कुटुंबीय मंडळी ह्यांच्याबद्दल आस्था दाखवून वेल्फेअर सेंटरच्या कामांत तिने लक्ष घातलें पाहिजे. लष्करी व्यवसायांत मनुष्यसंपर्काला विशेष महत्त्व आहे. आपल्या हाताखालच्या माणसांचीं मनें जिंकतां आलीं, तरच शत्रु जिंकतां येतो. पत्नीने वेल्फेअरच्या कामांत आळस केला तर पतीच्या प्रतिष्ठेला तो बाधक होतो, ही देखील त्याची एक व्यावहारिक बाजू आहे. जो अधिकारी स्वतःच्या पत्नीला वेल्फेअरच्या कामांत लक्ष घालण्यास उद्युक्त करूं शकत नाही, त्याचें स्वतःचें लक्षहि त्याकडे बेताचेंच व दिखाऊ असणार असा त्याच्या वरिष्ठांचा ग्रह होणें अगदी स्वाभाविक आहे. जवानांच्या कुटुंबियांच्या सुखसोयींकडे जिव्हाळ्याने लक्ष देणें, त्यांची सेवा करणें, हा तिच्या जीवनांतील पतिसेवेचाच एक भाग होऊन जातो.

इतर व्यवसायांतील पति-पत्नींना जितकें एकत्र राहावयास मिळतें तितकें लष्करी पति-पत्नींना मिळत नाही. त्यांच्या संसारांत विरहाचा काळ बराच मोठा असतो. एकत्र राहण्यास त्यांना संधि मिळाली, म्हणजे ते मोठी पर्वणीच समजतात. ह्या काळांत पत्नीने त्याला पूर्ण आराम दिला पाहिजे, त्याच्यापासून अप्रिय गोष्टी लपविल्या पाहिजेत, त्याच्या जुन्या नव्या प्रमादांवर पांघरूण घालून व त्याला निश्चिंत करून ड्यूटी-वर परत पाठविलें पाहिजे. रजेवर आलेला पति आपली रजा रद्द होऊं नये म्हणून दररोज प्रार्थना करीत असतो; टपालाकडे त्याचें सारखें लक्ष असतें; एकत्रित राहण्याचा योग पुनः केव्हा येईल हें सांगतां येत नाही. हें सर्व लक्षांत ठेवून पत्नीने पतीला प्रसन्न राखावयास हवें.

लष्करी पेशाचा व दर्जाचा फायदा पाहिजे असेल तर त्याचीं पथ्येंहि काटेकोरपणें पाळतां आलीं पाहिजेत.

लष्करी अधिकाऱ्याची पत्नी सासरीं किंवा माहेरीं राहावयास येते तेव्हा तिने त्याहि परिस्थितीशीं पूर्णपणें समरस व्हावयास हवें. लष्करी कुंपणांतील जीवनाशीं तेथील राहणीची तुलना करण्यांत अर्थ नाही. ज्या वातावरणांत आपण जन्मलों, वाढलों व पुनः परत येऊन राहणार त्यावर टीका करणें चुकीचें ठरतें. विजेचे दिवे नाहीत किंवा निःसंकोच स्नान करण्याला पूर्ण आडोसा नाही अशा ठिकाणीं राहायला जाण्यास नकार देणारीला वाटतें की, आपण आपल्या उच्च लष्करी राहणीची इतरांवर छाप पाडीत आहों. वास्तविक तिच्या या मनोवृत्तीचें तिच्या पाठीमागे हसूंच होत असतें. आपल्या पतीच्या पेशाची व राहणीची प्रतिष्ठा राखण्याचा हा मार्ग नव्हे.

ह्या सर्वांचा अर्थ थोडक्यांत सांगावयाचा म्हणजे, लष्करी अधिकाऱ्याची पत्नी उत्कृष्ट नटी असली पाहिजे! पडेल ती भूमिका तिला कसलेल्या नटीप्रमाणे सहजतेने पार पाडतां आली पाहिजे. नागरी-गृहस्थाच्या पत्नीचे सद्‌गुण तर तिच्यांत हवेतच; त्याबरोबरच नवें अंगीकारण्यास तिची वृत्ति तत्पर, थोडी साहसी असावयाला पाहिजे. केवळ स्वत्वसंपन्नतेवर ती यशस्वी सहचरी होईलच असें नाही. उदाहरणार्थ, तिला क्लबांत किंवा सामाजिक प्रसंगीं डौलाने वावरतां आलें पाहिजे. असें असलें तरी, गृहकृत्यांतील दक्षता आणि कामसूपणा ह्यावरच अखेर तिची पतीवरील पकड अवलंबून राहते. थोडें नाटक केलें, तरी मूळ गुणसमुच्चयाला धक्का लागतां कामा नये.

लष्करी गृहस्थाच्या पत्नीला इतर स्त्रियांप्रमाणेच कष्ट करावे लागतात. नोकरांचा ताफा तिच्या सेवेला हजर असण्याचे दिवस आता संपले आहेत. माझ्या माहितीचे एक मेजरसाहेब स्वतःच्या बुटांना स्वतःच पॉलिश करतात; तेव्हा त्यांच्या पत्नीला स्वैंपाकपाणी व घरांतील इतर

कामें हीं बिनतक्रार करावींच लागणार. पदराला हात न पुसतां टॉवेल वापरला, स्वैंपाकाचे वेळीं एप्रन घातला आणि हाऊसकोट घालून वावरलें म्हणजे घरकामाची दमणूक वाटत नाही !

कांही दिवसांपूर्वी एका समारंभाला आम्ही गेलों असतांना एका महाराष्ट्रीय स्त्रीला एका बड्या ब्रिगेडिअरबरोबर नृत्याच्या फेऱ्यांत आम्हीं पाहिलें. आमच्या नात्यांतील एका कॅप्टनची ती पत्नी होती आणि ब्रिगेडिअरने तिच्याबरोबर नृत्य करणें हा तिचा मोठाच मान होता. तिची वेशभूषा, नृत्यकौशल्य, हास्यमुद्रा, मोहकता, सौजन्य, संभाषण–चातुर्य, इत्यादींमुळे ती पुरुषांतच नव्हे तर विशेष म्हणजे स्त्रियांतहि लोकप्रिय होती. कोणालाहि न दुखवतां तिने आपलें स्वत्व राखलें होतें. तिने आपल्या पतीला अगोदर विचारून आम्हांला घरीं अगत्यपूर्वक चहाला बोलावलें.

कॅप्टनच्या त्या पत्नीचें सुसंस्कृत महाराष्ट्रीय रूपांतर बघून आम्ही आश्चर्यचकितच झालों. भिंतीवर दत्ताची तसबीर होती, तिला बकुळीच्या फुलांची माळ घातलेली होती. बूट व सँडल्स ह्यांना आंतल्या खोलींत मज्जाव होता; ती अनवाणीच वावरत होती. सिनेमाविषयक मासिकें कुठं दिसलीं नाहीत. चहाबरोबर तिने घरच्या भाजणीचें खमंग थालीपीठ आणि साबुदाण्याची खिचडी हे जिन्नस ताजे केले होते.

"तुमचा प्रकृतिस्वभाव कोणता ? नृत्यसमारंभाच्या वेळीं तुम्ही दिसलांत त्या खऱ्या, कीं आता दिसत आहांत त्या खऱ्या ?" असें मीं तिला विचारलें. तेव्हा ती म्हणाली, "देवाला स्मरून सांगायचं म्हणजे दोन्ही थोडींफार नाटकंच आहेत. पण इथली भूमिका माझ्या मूळ स्वभावाला आणि परंपरेला जुळणारी आहे. त्यामुळे ती मला अवघड जात नाही. प्रसंग पडेल तसं वागावं लागतं. ह्यांच्या आवडीला आणि अपेक्षेला मी उतरली पाहिजे अशी माझी महत्त्वाकांक्षा आहे. त्यासाठी आपलं किरकोळ थोडंसं कांही काळ बाजूला ठेवावं लागलं तर त्यांत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...22441... विः ...[illegible]...
क्रमांक ...[illegible]... नों: दि: ...[illegible]...

काय विघडलं ? माझं अगदी खरं स्वरूप मी रात्रीं निजण्यापूर्वी लिहिते त्या डायरींत प्रतिबिंबित झालेलं आढळेल. हे रिटायर झाल्यावर मी ती डायरी छापून प्रसिद्ध करणार आहें."

अशी कुशल कुलवधु ज्याच्या पाठीशीं असेल, तो भाग्यवान् पति अधिक चांगला लष्करी अधिकारीहि बनेल आणि त्याचा सुपरिणाम त्याच्या कुटुंबाच्या बाहेरील व्यापक जीवनावरहि झालेला दिसून येईल. लष्करी गृहस्थाच्या पत्नीच्या विविध भूमिकांचें हें रसदिग्दर्शन तीनहि संरक्षक दलांतील अधिकाऱ्यांच्या पत्नींना लागू पडेल, हें सांगावयास नकोच.

—उद्यम

कित्येक विवाह-मंडपांतून, "पति-पत्नी मधुचंद्रासाठी कुठे जाणार ?" ह्याविषयी हास्यविनोद सर्रास चाललेला आढळतो. विवाहानंतर लागलीच मधुचंद्रासाठी प्रत्यक्ष जाणारीं दांपत्यें वास्तविक फारच थोडीं असलीं, तरी त्याविषयी चर्चा मात्र पुष्कळच ऐकूं येते. सिनेमा, कादंबऱ्या, लघुकथा, नव-काव्य, इत्यादींतून मधुचंद्राचा अप्रत्यक्ष आस्वाद चाखावयास मिळणारांना त्याबद्दल विलक्षण आकर्षण वाटूं लागतें. मधुचंद्राला जाणें हें आधुनिकत्वाचें गमक आहे, असें कित्येक जण मानूं लागले आहेत. माथेरान किंवा महाबळेश्वर अशा ठिकाणीं मधुचंद्रासाठीं गेलेलीं जोडपीं तेथील रस्त्यांवरून भ्रमण करतात, तेव्हा त्यांचें रहस्य झाकूं शकत नाही. आदल्या दिवसापर्यंत त्यांचा एकमेकांशीं परिचय नसतांना ते एकदम लगटून चालूं लागतात तेव्हाची त्यांची बावरलेली मुद्रा मोठी मनोरंजक व चित्तवेधक असते.

मधुचंद्राची फॅशन पाश्चिमेकडून इकडे आलेली आहे. विवाहानंतर स्वतःच्या बिऱ्हाडांत राहावयास जाण्यापूर्वी पति-पत्नी जो कांही काळ जरा दूर ठिकाणीं जाऊन जोडीने एकत्र घालवितात, त्यास मधुचंद्र किंवा हनीमून असें म्हणतात. हनीमूनच्या पद्धतीचा उगम उद्बोधक आहे. अगदी पूर्वीच्या काळीं रानटी मनुष्य स्त्रीला पळवून नेई, तेव्हा तिच्या नातलगांचा त्याच्यावर साहजिकच रोष होई. त्या नातलगांना माहीत होणार नाही अशा दूर ठिकाणीं तो तिला घेऊन जाऊन तेथे कांही काळ राहात असे, अशी मधुचंद्राची उपपत्ति पाश्चात्य शास्त्रज्ञांनी लावली आहे.

लता व कुमार ह्यांचा विवाह झाला, त्या वेळीं त्या दोघांच्याही, विशेषतः लताच्या मनावर विलक्षण ताण पडलेला होता. माहेर सोडून

अपरिचित सासरीं, अनोळखी पुरुषाबरोबर संसार करावयास एकाएकी जावयाचें, ह्या कल्पनेनेच ती बिचारी रडकुंडीला आलेली होती. तिच्या विवाहाला लांबचे व जवळचे नातेवाईक व मैत्रिणी ह्यांना निमंत्रण केलेलें होतें आणि ते सर्वजण कांही दिवस राहण्याच्या बेताने आलेले होते. "अर्थोहि कन्या परकीय एव" मानण्याचा तिच्या आई-वडिलांनी किर्तीहि निर्धार केलेला असला, तरी त्यांनाहि आपली लता जितकी जास्त काळ जवळ, निदान आसपास राहील तेवढी हवी होती. अशा परिस्थितींत, त्या सर्वांना मागे ठेवून बिचाऱ्या लतेला नवऱ्यासमवेत विवाहाच्या दुसऱ्याच दिवशीं मधुचंद्रासाठी पलायन करावें लागलें. पाहुण्यांच्या मेजवानीच्या वेळीं लता-कुमार गिरिवनांतील घरट्यांत बसलेले होते आणि सत्यनारायणासाठी त्यांच्या परत येण्याची मार्गप्रतीक्षा करावी लागली. पण, त्यांची स्वतःची अवस्था मोठी हेवा वाटण्याजोगी होती, असें मात्र सांगतां येणार नाही.

लता-कुमारचें उदाहरण नवविवाहितांचें प्रातिनिधिक आहे, असें मानण्याचा आग्रह धरणें चुकीचें होईल. कारण, वधू-वरांचें विवाहाच्या वेळचें वय आता बरेंच वाढलेलें असतें आणि ते दोघेहि विवाहाच्या परवान्याची मोठ्या आतुरतेने वाट पाहात राहिलेले असतात. वधू तिच्या घरच्या मंडळींना जड वाटूं लागून, तद्विषयक त्यांचें बोचक बोलणें ऐकण्याचा तिला वीट आलेला असतो. केव्हा एकदा लग्न होईल आणि घराबाहेर पडेन, असें तिला होऊन जातें. अशा क्षुधातुरांना अक्षता पडून संधि मिळण्याचाच काय तो अवकाश असतो. तेव्हा, विवाहानंतर संधि मिळतांच त्यांचा विकार बळावून तो अनावर झाला व त्यामुळे इतरांचा विसर पडून नाजूक भावनांना वाव उरला नाही, तर त्यांत काय आश्चर्य ? म्हणूनच, कित्येक नवरे मधुचंद्राच्या परवानगीसाठी आई-वडिलांकडे वशिले लावतात आणि त्यांच्याबरोबर त्यांच्या नवऱ्या निमूटपणें पण अगदी खुषीने पसार होतात.

विवाहाच्या परिणामांची, म्हणजे विवाह झाल्यावर नव्या भूमिकेंत नेमकें काय होतें किंवा काय करावें लागतें, ह्याची अंधुक कल्पना सर्व वधू-वरांना असली तरी त्याची प्रत्यक्ष माहिती कितीजणांना अगोदर असणार? मधुचंद्राच्या वेळीं, पत्नीचा पतीशीं अगदी निकटचा असा रात्रंदिवस संबंध प्रथमच येतो. कोठल्या तरी हॉटेलांत ते दोघे उतरतात आणि एखाद्या लहानशा खोलींत नव्या नात्याच्या दाटीने राहूं लागतात. ह्या नात्याची हळूहळू सवय होण्यास आवश्यक ती उसंत त्यांना मिळतच नाही. घाईनेच सर्व कांही होतें. बिचारी पत्नी आपली भीति लपविण्याचा प्रयत्न करते, किंवा "मधुचंद्राला गेल्यावर असेंच करावें लागतें" ह्या कल्पनेने व शिकवणीने सर्व कांही प्रसंगांना धैर्याने तोंड देते. पतीसुद्धा अनभिज्ञच असतो आणि त्यालाहि प्रसंगोचित धिटाई दाखविण्याचें अवसान बळेंच आणावें लागतें; आंतून मग तो कितीका घाबरलेला असेना!

क्रिकेटसारख्या खेळांतहि खेळाडूंचें बस्तान बसायला कांही वेळ लागतो. फारच थोडे खेळाडू क्रीडांगणांत उतरल्याबरोबर आपली चमक व कौशल्य दाखविण्यास प्रारंभ करूं शकतात. सरावाची गरज नसणारे कोणत्याहि क्षेत्रांत फारच थोडे आढळणार, हें उघड आहे; आणि चांगले सराईत लोकसुद्धा नव्या वातावरणांत प्रथम गांगरून जातात, असाच अनुभव आहे. मधुचंद्राला गेलेल्या नवविवाहितांना तरी दुसरें काय प्रत्ययास येणार? जोडीने नृत्याचीं पावलें टाकण्यास शिकतांना नवशिक्यांचा गोंधळ होणें स्वाभाविक असतें. त्याचप्रमाणे, नवविवाहितांनी विवाहितांप्रमाणे एकदम रात्रंदिवस वागूं लागणें अवघडच जाणार.

ग्रामोफोनच्या तबकडीस वेग येण्यापूर्वीच तिच्यावर साउंडर ठेवला, तर बेसूर आवाज निघतो पण योग्य गति मिळेपर्यंत वाट पाहिली, तर सुमधुर गीत ऐकूं येऊं लागतें. आकर्षणाला आवश्यक

तें भ्रांत पटल घाईने दूर केलें गेलें व त्यामुळे संकोचाला वाव उरला नाही, तर मधुचंद्राची मोहिनी तरी कशी टिकणार? श्री. व सौ. च्या नव्या भूमिका नीट परिचयाच्या झाल्या म्हणजे पतिपत्नींच्या व्यवहारांना सौकर्य येतें. पण त्यापूर्वीच अनपेक्षित, अपरिचित व अहितकारक असें कांही घडणार नाहींना, ह्याची भीति दोघांना, विशेषतः पत्नीला, सतावींत राहणार हें उघड आहे. विवाहानंतर, पति बनलेल्या पुरुषाबरोबर सार्वजनिक ठिकाणीं हिंडणें वेगळें आणि त्याच्या समवेत दिवसाची रात्र करणें वेगळें !

"एकान्त हवा असला, तरी त्याच्यासाठी महाबळेश्वरच कशाला पाहिजे ?" असें बहुतेक आई-वडिलांना वाटतें, पण प्रत्यक्ष एकान्ता-बरोबर हनीमूनला गेल्याची प्रसिद्धीहि तरुण पिढीला हवी असते, हें मागील पिढींतील लोकांना कसें समजणार ? अर्थात्, कांही आईबाप आपण होऊन नवरानवरीला मधुचंद्राला जाण्याचा आग्रह करतात; मधुचंद्राला पाठविल्याची जाहिरात करण्यांत त्यांना आनंद वाटत असतो, हें सत्य आहे. कित्येक नवविवाहितांचें वागणें इतकें स्वैर, स्वच्छंदी व उच्छृंखल असतें, की ते कांही दिवस दृष्टीआड झालेले बरे, असेंहि कधीकधी वाटूं लागतें ! मधुचंद्राची पूर्वपीठिका अशी वेगवेगळी असूं शकते.

ज्यांची पहिली ओळख असेल, ज्यांचें एकमेकांवर प्रेम बसलें असेल, अशांच्या मधुचंद्राला सुसंस्कृत जीवनांत कांहीतरी अर्थ आहे. विवाह ठरलेल्या वधूवरांना एकमेकाबरोबर फिरायला जाण्याची व थोड्या गप्पागोष्टी करण्याची मोकळीक आता मिळूं लागली आहे, हें खरें आहे. पण, नियोजित वधू आणि मधुचंद्राला नेलेली पत्नी ही वस्तुतः तीच तरुणी आहे ना, हें सुद्धा कळणें सामान्यतः कठीण, अशा पद्धतीने विवाहबद्ध होणारेसुद्धा मधुचंद्राचा एवढा गाजावाजा करतात, त्याची

मोठी गंमत वाटते! मधुचंद्राला न जाणें हें मागासलेपणाचें लक्षण आहे असें मानणें, हा तर शुद्ध खुळेपणा आहे.

विवाहानंतर पहिले कांही दिवस किंवा महिने चैनींत मग्न व्हावयाचें, पण नंतर खरी परिस्थिति प्रकट झाल्यावर नाखुषी व कडवटपणा निर्माण व्हावयाचा, हें काय उपयोगाचें? विवाहाचा उत्सव आणि सांसारिक दैनंदिन जीवन ह्यांत अति मोठी तफावत न पडलेली बरी. संसार थाटायला जे पैसे उपयोगी पडावयाचे, ते हॉटेलच्या बिलांत खर्चे होऊन गेले तर नंतरच्या आवश्यक खर्चास आणि उधारी भागविण्यास वाव मिळणार नाही. मधुचंद्र हा केवळ चांदण्यावर आणि चहा-रोटीवर साजरा होणार असेल, तर गोष्ट निराळी!

पति-पत्नी झालेल्यांना एकमेकांची जवळून नीट ओळख होण्यासाठी मधुचंद्राचा चांगला उपयोग होण्याजोगा आहे. पण, त्या बाबतींत अत्यंत दक्षतेची आवश्यकता आहे. त्या वेळची दोघांचीहि, विशेषतः पत्नीची, मनःस्थिति ध्यानांत बाळगली पाहिजे. पत्नीपासून आपल्या काय काय अपेक्षा आहेत, ह्याची लांबच्या लांब यादी पतीने पत्नीला सांगून तिला भेडसावून टाकलें, तर त्याचे दुष्परिणाम दूरगामी होतील. त्याचप्रमाणे, त्याने आपल्या विवाहपूर्व जीवनाचीं किंवा आधीच्या मैत्रिणींचीं अवास्तव अथवा अनवश्यक वर्णनें पत्नीला ऐकविलीं, तर त्यामुळे निर्माण होणारी अढी, तेढ व गैरसमज हीं काय काय करवितील ह्याचा नेम नसतो. एकमेकांचे दोष सुसह्य होण्याजोगें वातावरण निर्माण होण्यापूर्वीच त्यांचें प्रकर्षाने आविष्करण होणें इष्ट ठरणार नाही.

मधुचंद्राच्या काळांतील स्वैराचारामुळे व उपभोगलेल्या स्वातंत्र्यामुळे, 'राजा-राणीला' घरच्या मंडळींची पुढे अडगळ वाटू लागते व त्यांची आबाळ केली जाते, असें कित्येक ठिकाणीं आढळतें. गरीब देशांत आणि त्यांतील गरिबांच्या संसारांत मनुष्यबळाचें महत्त्व विशेष असतें,

हें वेळींच लक्षांत आलें तर बरें. स्वतःला हवें तें साधून वरती पुन्हा आई-वडिलांची व सासू-सासऱ्यांची प्रीति संपादन करण्याची हातोटी कांहींना साधलेली असते. त्याचें अनुकरण सर्व तरुण-तरुणींनी केलें, तर किती बरें होईल?

पुनवेचा चंद्र वर्षांतून फक्त बारा वेळां येतो; बाकी सर्व काळ चंद्राच्या कला वृद्धि किंवा क्षय पावत असतात. अशा रीतीने चंद्रबिंब चंचल असतें व त्याच्याशीं नवविवाहितांच्या प्रारंभीच्या सुखद काळाची तुलना करून त्या काळाला मधुचंद्र असें नांव दिलें गेलें आहे. मधुचंद्राचें सुख टिकणारें नाही, असा अर्थ त्यांत अभिप्रेत आहे. पति-पत्नीच्या सहजीवनास प्रारंभ गोडीने व्हावा, हें रास्त आहे. पंक्तीच्या भोजनाचा प्रारंभ आपण गव्हल्याची गोड गोड खीर चाखूनच करतों की नाही? पण ती खीर किती बेताची असते? त्या नेमस्त प्रमाणांतच मधुचंद्राचें संसारांत महत्त्व आहे. पण हें लक्षांत न बाळगतां मधुचंद्राच्या सुखास चटावून जाऊन पुढील आयुष्याविषयींहि भरमसाठ अपेक्षा बाळगली तर पदरीं निराशाच यावयाची. सुरुवातीइतकी एकमेकांची जपणूक पति-पत्नी पुढे सहसा करीत नाहीत; तें बहुधा शक्यहि होत नाही. म्हणून तर मधुचंद्राच्या काळाचें महत्त्व! त्याचा उपभोग कोणी, कसा व किती घ्यावा आणि त्याची धुंदी किती टिकूं द्यावी, हा तारतम्याचा प्रश्न आहे.

— स्त्री

● ● ●

ग्रेट ब्रिटनचे पंतप्रधान विश्रांतीसाठी मधूनमधून चेकर्सच्या निवासस्थानीं जाऊन राहतात. सुमारे १,५०० एकर आवारांतील ही इमारत इतिहासकालीन असून तेथे क्रॉमवेलच्या वेळचे कांही अवशेष आढळतात. भूतपूर्व ब्रिटिश पंतप्रधान व त्यांची पत्नी, सर अँथनी व लेडी ईडन, हीं चेकर्सला नेहमीप्रमाणे गेलीं, तेव्हा तेथून त्यांना समोरच्या एक रहिवासी मिसेस् यॉर्ड बट, ह्यांचें धुणें वाळत घातलेलें एकदा दिसलें. लेडी ईडनने मिसेस् बटला बोलावून, "हे कपडे असे दिसतां कामा नयेत," अशी तिला तंबी दिली. बिचाऱ्या शेजारणीने वास्तविक नेहमीप्रमाणे आपलें धुणें आपल्या परसांत वाळत घातलें होतें. तिला लेडी ईडनची ही अरेरावी मुळीच खपली नाही.

"त्या स्वतःला समजतात तरी काय? आपले कपडे त्या परटीला देतात; मी स्वतः धुऊन वाळत घालतें, एवढेंच. त्यांना वाटलं तर पार्लमेंटांत हा प्रश्न धसाला लावूं दे!" असें ती पुटपुटली.

प्रत्येकजण आपलें धुणें आपल्या घरीं धुऊन वाळत घालीत असतो; तें काम मालक करो वा नोकर करो. अगदी श्रीमंतसुद्धा सगळे कपडे परटीला टाकीत नाहीत. दांडीवर, तारेवर किंवा कठड्यावर लोंबकळत असलेले हे लहानमोठे, धडफाटके कपडे शोभिवंत दिसतात असें मुळीच नाही. पण त्यावरून एक गोष्ट मात्र प्रत्ययाला येते. प्रत्येकाचीं लपलेलीं वैगुण्यें त्यामुळे प्रकट होऊन, सर्वजण वास्तविक सारखेच असल्याचें मनास पटतें. वरून अद्ययावत् दिसणारांचे आंतून वापरावयाचे कपडे किती तरी खराब, मळके व फाटके असूं शकतात. ज्यांचें आंतबाहेर सारखेंच असतें त्यांचें विशेष रुबाबदाराहि कांही नसतें आणि दडविण्याजोगेंहि पण कांही नसतें. पण बाहेरून ऐट दाखविणारांची आंतील बाजू दृष्टीस न पडलेली बरी, असें म्हणण्याची कधीकधी पाळी येते.

कपडे वाळत घालणें, ही एक मोठी कला आहे. कांही गृहिणींनी वाळत घातलेलीं पोतेरींसुद्धा इतर कांहींच्या धुण्यापेक्षा जास्त व्यवस्थित आढळतात! वस्त्र धुऊन झाल्यावर त्याचा पिळा नीट उलगडून, साफ करून तें झटकलें व नंतर चापचोपीने वाळत घातलें तर सामान्यतः कोणताहि कपडा दृष्टीला वाईट दिसत नाही. दर्शनी दांडीवर मोठ्या आकाराचे कपडे वाळत घालून आंतील दांडीवर बाकीचे कपडे वाळत घातल्याने हें सहज साधतें. चांगल्या उन्हांत कपडे वाळत घातले तर ते लवकर वाळतात आणि लागलीच काढून, घड्या घालून, इष्ट जागीं ठेवतां येतात.

वापरलेले कपडे अंगांतून काढून ठेवतांनाहि नीट काळजी घेतली गेली तर किती तरी बरें होईल. कित्येक पुरुषांनी काढून ठेवलेले कपडे त्यांच्या पत्नीने ते आवरीपर्यंत तसेच पडलेले राहतात. सदरा खुंटीवर ठेवतांना त्याची बाही अर्धी आंत गेलेली असणें, लोंबत्या नाड्यांवर चिलटें घुंगरणें, उलट्या कपड्यांच्या मानेवरील कळकटपणा डोळयांत व नाकांत शिरणें, पातळाचा बोंगा जमिनीवर पडणें किंवा तो लाथेने कोपऱ्यांत ढकलणें, असे किती तरी अनिष्ट प्रकार सांगतां येतील. पायतणांचीहि अशीच गत असते.

घराबाहेर जातांना घालावयाचे कपडे व घरांत वापरावयाचे कपडे ह्यांत बहुधा फरक असतो. बाहेर चांगल्या कपड्यांत वावरणारे कांही स्त्री-पुरुष घरीं कधीकधी अशा वस्त्रांत आढळतात, की इतरांनी त्यांच्या-कडे पाहण्याचीहि सोय नाही. घरांत प्रत्येकाला सोइस्कर वाटेल तसें राहण्याचें स्वातंत्र्य जरूर हवें. पण, आपल्या पत्नीला जें खपेल किंवा खपवून घेणें भाग पडेल, तेंच तिच्याकडे येणाऱ्या शेजारणींना किंवा नातलगांना कसें रुचेल ? पतीच्या अशा पोषाखाबद्दल पत्नी किती वेळां आणि किती काळ तक्रार करणार ? खुणेने किंवा शब्दाने किती सूचना देणार ? त्या बिचारीला पतीच्या पुढे हार खावी लागते.

टाचेपर्यंत पाय झाकणारा कपडा गुढघ्यापर्यंतहि न पोंचणाऱ्या कपड्यापेक्षा अधिक लाज झाकतोच, असें नाही. कपडा कसा राखला गेला आहे, ह्यावर सर्व कांही अवलंबून असतें. त्याला किती वार कापड लागलें, ह्यापेक्षा तो नीटनेटका आहे किंवा नाही, ही गोष्ट अधिक महत्त्वाची असते. ह्या प्रश्नावर कित्येक पति-पत्नींचीं व शेजाऱ्या-पाजाऱ्यांचीं भांडणें झालेलीं आहेत. म्हणून तरी निदान, पुरुषांना त्यांच्या पत्नीच्या वतीने नेटकेपणाची सूचना येथे केली, तर तें अयोग्य होणार नाही.

शाळांच्या एका इन्स्पेक्टराबाबतचा हा अनुभव आहे. त्याच्याशीं अगोदर वेळ ठरवून, दुपारीं ४ वाजतां, एक मुख्याध्यापिका त्याला घरीं भेटावयास गेल्या. तेव्हा त्यांचें 'चहा'ने हार्दिक स्वागत करणाऱ्या त्या अधिकाऱ्याच्या अंगावरील कपड्यांची बाईनाच लाज वाटून तेथून केव्हा एकदाची पळ काढतें, असें त्यांना झालें. स्वच्छतेच्या आणि कपड्यांच्या बाबतींत अशी दडपेगिरी केली जाते, ती सामाजिक जीवन सुखावह होण्यास निश्चितच पोषक नाही. व्यक्ति-स्वातंत्र्याच्या मर्यादा ओळखायला आणि पाळायला गरिबी खासच आड येत नाही.

कांही पुरुष एकटे बाहेर जातात तेव्हा त्यांच्या दाढीबद्दल किंवा कपड्यांबद्दल पत्नीचें म्हणणें ऐकून घेण्यास ते मुळीच तयार नसतात. परंतु, पूर्वयोजनेनुसार ते पत्नीबरोबर बाहेर पडले तर तिला अभिमान वाटेल, निदान कमीपणा वाटणार नाही, असा पोषाख करण्यास ते चुकत नाहीत. बाहेर पत्नीची गाठ पडली व ते दोघे मिळून घरीं आले, तर त्या वेळीं हा नियम साहजिकच लागू पडत नाही; पत्नीहि त्या-बद्दल तक्रार करीत नाही.

आंतून घालावयाचे कपडे बाहेरच्या वस्त्रांतून उठून दिसावेत अशी योजना असते, तेव्हा त्या दृष्टीने दक्षता घेतली जाते. उदाहरणार्थ,

परकरावरील नक्षीकाम दाखविण्यासाठी वरील पातळ तलम असावें लागतें. पण, परकराची मळकी किंवा फाटकी लेस ही प्रदर्शनीय बाब खास नव्हे, हें कधीकधी विसरलें जातें. त्याचप्रमाणे, भोकें पडलेल्या वरच्या वस्त्रांतून आंतील विरोधी रंगाच्या वस्त्राचें दर्शन कधीच आल्हाद-कारक होत नाही. वरून पांढरें वस्त्र वापरणाऱ्या पुरुषांनी त्या खाली रंगीबेरंगी ठळक पट्ट्यांचा कपडा चढविलेला असला, तर तें दृश्य लक्ष वेधून घेऊन किळस निर्माण करतें. पण हा प्रकार सर्रास चालू आहे. जे कपडे वापरावयाचे, त्याला अनुसरूनच सर्व योजना वास्तविक केली गेली पाहिजे.

युक्तायुक्ततेचा विचार जरा अधिक केला गेला, तर फार बरें होईल. खेळतांना खेळाडूने घालावयाचे आखूड कपडे त्या वेळीं शोभून दिसतात. पण तशा पद्धतीचे कपडे भोजनसमारंभाच्या वेळीं पाटावर बसतांना घातलेले असले तर तें कसें योग्य होईल ? आपण घर झाडीत असतांना कोणी आलें तर त्या वेळच्या आपल्या मळक्या, फाटक्या कपड्यांनिशी त्याचें किंवा तिचें स्वागत करण्यांत औचित्यभंग होत नाही. त्यांत कांहीच वावगें दिसत नाही. पण ज्या वेळीं अधिक बरें दिसण्याची अपेक्षा व आवश्यकता असते, अशा प्रसंगीं असे कपडे घालून पुढे जाणें अगदीच चुकीचें ठरतें. कुस्तीचा पोषाख आखाड्यांत ठीक आहे. पोहण्याच्या वेळीं किंवा समुद्रकिनाऱ्यावर 'बिकिनी' पोषाखाचें कौतुकच होतें. पण उघडा भाग परवडला; झाकलेल्या भागाकडे लक्ष न गेलेलें बरें; अशा प्रकारचीं चिरगुटें घरींदारीं वापरलीं, तर तीं बघणाराला लाज आणतात.

ही बाब दिसायला क्षुल्लक वाटते. पण, प्रस्तुत लेखकाने त्याविषयी मुद्दाम पाहणी केली, तेव्हा बहुतेक स्त्रियांची पुरुषांच्या ओंगळ कपड्या-विरुद्ध तक्रार असते, असें आढळून आलें. "आम्ही तक्रार करून कंटाळलों. पण, नवऱ्याने पैशाची सबब पुढे केली, की आम्हांला कांही

बोलतांच येत नाही. नाइजालाने गप्प बसावंच लागतं. ” असें कित्येक जणींनी सांगितलें. स्वतःच्या घरांत जी गोष्ट सुधारता येत नाही, खपवून घ्यावी लागते, ती मग अंगवळणी पडून जाते. पाहुणे यजमानाच्या घरीं स्वतःच्याच घरच्यासारखे वावरूं लागतात, तें दृश्यहि गृहिणीला सहन करणें भाग पडतें. नवी पिढी अशा वातावरणांतच वाढत आहे ! स्त्रिया स्वतः किती टापटिपीने राहतात, हें लक्षांत घेतलें म्हणजे त्यांना ह्या बाबतींत पुरुषांच्या विरुद्ध बोलण्याचा अधिकार आहे, हें सहज पटतें. त्यांची तक्रार वेशीवर टांगण्यासाठी हें सर्व विस्ताराने सांगितलें आहे.

कपडे कमी असण्याचा, ते वाईट कापडाचे असण्याचा, ते परटीला देण्याची ऐपत नसण्याचा हा प्रश्न नसून, असलेले कपडे नीट राखून ते प्रसंगानुरूप वापरण्याचा तो प्रश्न आहे. ह्या साध्या, बोलण्यांत सहसा न येणाऱ्या, पण स्त्रियांच्या मनांत खटकणाऱ्या प्रश्नाकडे जरा जबाबदारीच्या जाणिवेने पाहण्यांत आलें, तर दांडीवरचें धुणें आपली काळजी स्वतःच वाहील. कौटुंबिक व सामाजिक जीवनांतील गोडी वाढविण्याला आपण आपल्या रोजच्या, घरच्या कपड्यांपासून प्रारंभ करूं या.

— अमृत

● ● ●

नंदू एस्. एस्. सी. परीक्षेला बसला होता, पण इंग्रजीच्या पेपरांत नापास होणार ह्या खात्रीने त्याने पुढील पेपरांना बसण्यास नकार दिला. आई-वडिलांनी, भावाने, त्याला पुष्कळ समजावून सांगितलें; पण त्याचा कांहीहि उपयोग झाला नाही. परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर आढळून आलें, की नंदू इंग्रजींत पास झाला होता! आपण नापास होणार हें त्याने स्वतःच ठरविलें; परीक्षकांच्या तपासणीची वाट त्याने पाहिलीच नाही. बिचाऱ्याचें एक वर्ष वाया गेलें आणि सर्वांनाच हळहळ वाटली. त्याने सर्व विषयांचे पेपर लिहिले असते तर तो कॉलेजांत जाऊं शकला असता. समजा, तो इंग्रजींत नापास झाला असता, तरी पेपर लिहिण्याचा सराव त्याला झाला, ही गोष्ट पुढील परीक्षेच्या वेळीं उपयोगी पडली असती. निदान, सबंध परीक्षेला बसण्यांत नुकसान कांहीच नव्हतें.

किती तरी लोक डॉक्टरच्या तपासणीच्या भीतीने नंदूपेक्षाहि अधिक नुकसान करून घेत आहेत, विनाकारण आजारपण वाढवीत आहेत व मानसिक यातना भोगीत आहेत. डॉक्टरने आपली प्रकृति तपासली व त्या तपासणींत कांही नको तें आढळलें तर? अशी कित्येक स्त्री-पुरुषांना भीति वाटते. म्हणून, रक्त, लघवी, थुंकी, छाती, रक्तदाब, इत्यादींची तज्ज्ञांकरवी तपासणी करवून घेण्याचें ते पुढेपुढे ढकलीत असतात. डॉक्टरने करावयास सांगितलेल्या तपासण्या शक्यतों टाळावयाच्या, असेंच बहुधा चालतें. ह्या तपासण्यांची सोय इस्पितळांतून सोइस्कर रीतीने होऊं शकते, हें कित्येकांना माहीत नसतें. परवडण्याचा, न परवडण्याचा प्रश्न बाजूस ठेवला, तरी अप्रिय गोष्टीच्या गौप्यस्फोटाची भीति हीहि रोग्याला मागे ओढीत असते. तज्ज्ञांच्या तपासणीमुळे रोगांचें निदान सत्वर होऊं शकतें व पुष्कळ वेळा तर रोग्याची भीति

निराधार ठरून त्याचा कितीतरी त्रास व खर्च वाचतो, अशीं कित्येक उदाहरणें देतां येतील.

गुंडोपंतांच्या मानेखालील, पुढील व मागील कातडी पांढरी झाली होती. तिच्यावर त्यांनी घरगुती उपाय केले. नेहमीच्या डॉक्टरांनी पोटांत औषध दिलें, इंजेक्शनें दिलीं, तरी त्यांचा कांहीहि उपयोग झाला नाही. "तुम्ही त्वचारोगाच्या तज्ज्ञाला हें दाखवा", असा डॉक्टरांनी सल्ला दिला, पण त्याप्रमाणे करण्यास त्यांचें धाडस होईना. त्यांना शर्टची वरची गुंडी उघडी टाकण्यास लाज वाटूं लागली. भर उन्हाळ्यांतहि ते उघडे होण्यास धजावले नाहीत. पोहण्याचा त्यांचा आवडता व्यायाम तर त्यांना अजिबात बंद करावा लागला. आपल्याला कांही तरी मोठा रोग झाला असावा, असें त्यांच्या मनाने घेतलें. प्रत्येक-जण आपल्याकडे निरखून पाहात आहे, असा त्यांना भास होई, व आपली पुढे काय अवस्था होईल ह्या विचाराने ते मनांतल्या मनांत झुरूं लागले. अखेर, त्यांच्या एका मित्राने त्यांना बळेंच त्वचारोगाच्या तज्ज्ञाकडे नेलें.

त्वचारोगाच्या डॉक्टराने गुंडोपंतांना शर्ट काढण्यास सांगितलें व एका भिंगांतून त्यांनी त्वचेची पाहणी केली आणि "ठीक आहे, घाला कपडे." असें म्हणून आपला चष्मा जरा सावरला. इकडे गुंडोपंतांना दरदरून घाम सुटला होता! डॉक्टरांनी शांतपणें सांगितलें, "तुम्ही ह्या साध्या शिब्याकडे दीर्घ काळ दुर्लक्ष केलं आहे." त्यांनी गुंडोपंतांना एका मलमाचें नांव लिहून दिलें व तें पांढऱ्या जागीं लावण्याचा सल्ला दिला. केवळ चार-पांच दिवसांतच गुंडोपंतांना गुण आला आणि त्यांची व्यथा व चिंता कायमची दूर झाली! जी गोष्ट बारा महिन्यांत आणि शेकडो रुपयांनी साध्य झाली नाही, ती अवघ्या बारा रुपयांत साध्य झाली. तज्ज्ञाची फी १० रुपये आणि मलमाची किंमत २ रुपये! त्या मलमाची ट्यूब अजून पडून राहिली आहे.

त्वचेच्या तज्ज्ञाकडे गेल्यामुळे भलत्या रोगाच्या भीतीचें निर्मूलन होऊं शकलें. बरें, तज्ज्ञाने केलेलें रोगनिदान खरोखरच अप्रिय व भयानक असतें, तरी खरा रोग समजून आल्यामुळे त्यावर योग्य तीं योजना करतां आली असती. तज्ज्ञाच्या तपासणीला भिऊन जाण्यांत कांहीच फायदा नाही. तपासणी करवून न घेतल्यामुळे रक्तदाब उघडकीस आला नाही व तो वाढला, तर त्याचा मागाहून त्रास रोग्यालाच होणार ना ? छातीच्या क्ष किरण फोटोंत क्षयाची भावना दिसून आली, तर तिच्यावर वेळींच उपाय नाही का योजतां येणार ? एकट्या रोग्याच्या हिताचाच हा प्रश्न नसून, त्याच्या कुटुंबियांच्याहि तो हिताचा आहे; त्यांचाहि विचार नको का करायला ? स्त्रिया काय आणि पुरुष काय, त्यांनी तज्ज्ञ डॉक्टराच्या तपासणीची भीति सोडावी. व वेळींच दक्षता घ्यावी, हेंच सर्वांच्या हिताचें आहे.

डॉक्टरांना आपली प्रकृति दाखविण्यास व त्यांच्याकडून ती तपासून घेण्यास स्त्रिया तर भारीच नाखूष असतात. त्यामुळे, त्या स्वतःचें दुखणें दुसऱ्याला सांगत नाहीत आणि अगदी नाइलाज होईपर्यंत तें सोशीत राहतात. वास्तविक, स्त्रियांनी ह्या बाबतींत लाज बाळगण्याचें कारण नाही; रोग्याच्या शरिराच्या कोणत्याहि भागास व्याधि झाली असली, तरी डॉक्टरांना त्याचें कांहीच वाटत नाही; त्यांना त्याची इतकी संवय झालेली असते, की रोग्याच्या कुठल्याच दुखण्यामुळे ते आश्चर्यचकित होत नाहीत, की त्यांना धक्का बसत नाही. शरिराचा कुठलाहि भाग बिघडला असला, तरी तो बरा करणें, एवढेंच त्यांना माहीत असतें. ते जादा कुतूहल कधीच दाखवीत नाहीत. स्त्रियांना मात्र आपलीं कांही दुखणीं लपवावींत असें नेहमी वाटते, आणि म्हणून ज्या डॉक्टरांकडून औषध घ्यावयाचें, त्यांनाहि तीं कळूं नयेत असा त्यांचा प्रयत्न असतो !

आपल्या शरिराचा भाग दुसऱ्यास उघडा करून दाखविणें म्हणजे मर्यादा सोडणें आहे, अशी आपली ठाम शिकवण असते. त्या

शिकवणीचे धडे इतके बिंबलेले असतात, की स्त्रिया कोणत्याहि परिस्थितींत ते विसरूं शकत नाहीत. ह्या शिकवणीच्या मर्यादा मात्र समजावून सांगितलेल्या नसतात. तज्ज्ञ डॉक्टराला रोगाची चिकित्सा व उपाययोजना करतां येण्यासाठी शरिराचे कांही भाग दाखवावे लागले व त्यासाठी कपडे जरा सैल करावे लागले, तर त्यामुळे अब्रू कमी होण्याचें मुळीच कारण नाही. पर-पुरुषाला आकर्षण्यासाठी शरिराचें प्रदर्शन करणें म्हणजे लज्जा सोडणें होय; पण डॉक्टरी इलाजांसाठी जरुरीप्रमाणे तज्ज्ञांकडून तपासून घेणें ह्यांत कांहीहि वावगें नाही. शालीनतेच्या खोट्या कल्पनेमुळे, स्त्रिया डॉक्टराकडे जाण्यास भितात व साधीं दुखणींसुद्धा लपवितात.

लाजेच्या खोट्या कल्पनेस बळी पडून, विनाकारण यातना सहन करीत राहणें अगदी चुकीचें आहे. दवाखान्याच्या वातावरणांत, तज्ज्ञ डॉक्टरांपुढे, रोगनिवारणार्थ तपासणीसाठी व उपाययोजनेसाठी, रोगी स्त्रीने आपल्या नात्याचें मनुष्य जवळ असतांना शरिराचा जरूर तो भाग उघडा करणें म्हणजे लज्जा सोडणें नव्हे, हें लक्षांत आणून स्त्रियांनी आपलें दुःखनिवारण करून घ्यावें, हें उत्तम. त्यांच्या स्वतःच्या, पतीच्या, मुलाबाळांच्या, सर्वांच्याच तें हिताचें आहे. कासारासमोर वसून त्याच्या हाताने बांगड्या भरून घेण्यांत पडदाशीन स्त्रियांनाहि लाज वाटत नसे; उलट, त्या हौसेने डझनावारी बांगड्यांची चाळवाचाळव करून घेत असत. आता कित्येक स्त्रिया शिंप्याला अंगावर माप घेण्याचा स्वतःच आग्रह करतात; पण डॉक्टरी तपासणीची मात्र सर्वांनाच लाज वाटते. त्यांत शालीनता किती व भीति किती, हें सांगणें कठीण आहे.

—नागरी जीवन

● ● ●

# चहा-फराळाचे प्रसंगांची गोडी : १४

**कॅप्टन** मधुकरचा विवाह ठरला, त्यानिमित्त केळवण म्हणून त्याला आम्हीं कांही मित्रमंडळींनी मिळून जेवावयास बोलाविलें होतें. पांच पतिपत्नींचें मिळून, विवाहाच्या आधीं दोन-तीन दिवस, रात्रीं आठ वाजतां हें जेवण होतें आणि मधुकर व त्याची नियोजित पत्नी उषा हे पाहुणे होते. सोईसाठी विजयच्या गच्चीवर हा कार्यक्रम करण्यांत आला. पांचहि गृहिणींनी संध्याकाळीं अगोदर जमून जेवणाची संपूर्ण तयारी ठेवली होती. मधुकर व उषा हे दोघे उपस्थित झाले, तेव्हा विजयने त्यांचें हार्दिक स्वागत केलें. पण बाकीच्या यजमानांचा कोठे पत्ता होता? ते सावकाशपणें एक एक, ३०–३५ मिनिटांनी, गाणीं गुणगुणत आले. पाहुण्यांना तिष्ठत ठेवून हे सर्व यजमान उशीरा आले, तरी ह्या अनौचित्याबद्दल खेद व्यक्त न करतां, ते पाहुण्यांशीं गप्पागोष्टी करूं लागले. तेव्हा मधुकरने किंचित् विनोदाने स्वतःच ह्या गोष्टीचा उल्लेख करून स्वतःच्या झालेल्या अपमानास खुबीने तोंड फोडलें.

आपण पुष्कळ वेळा मित्रमंडळींना चहाला, फराळाला, जेवायला बोलावतों व आपणहि इतरांच्याकडे अनेक वेळा अशाच निमित्ताने जातों. अशा प्रसंगीं कित्येक बऱ्या-वाईट गोष्टी आपल्या लक्षांत येतात, पण त्या आपण लागलीच विसरून जातों. वास्तविक त्या अगदी साध्या बाबी असल्या तरी त्यांचेपासून जरा आस्थेपूर्वक बोध घेतला तर अशा प्रसंगांच्या वेळची गोडी कितीतरी वाढते.

बोलावलेली मंडळी येऊन ठेपली म्हणजे दार उघडून त्यांचें स्वागत करण्यासाठी जाणाऱ्या यजमानिणीची अवस्था मोठी अनुकंपनीय होते. इकडे चुलीवर किंवा स्टोव्हवर ठेवलेला पदार्थ जळून जाईल की काय, अशी भीति तिला वाटत असते. तिची वेणीफणी अजून व्हावयाची असते आणि पातळहि बदलावयाचें असतें, असें कितीतरी वेळा घडतें.

आलेल्या पाहुण्यांना वाट बघत ठेवून "आलें हं मी" असें म्हणत यजमानीणबाई एकदम पसार होते आणि तिला शोधायला निमंत्रित स्त्रिया इकडे-तिकडे डोकावतात. त्यांना सैपाकघरांतील 'थाट' दृष्टीस पडतो, मोरींत कपबशा व धुण्याचे कपडे अस्ताव्यस्त पडलेले आढळतात आणि अशा गडबडींतच पाहुण्या स्त्रिया "कांही काम आहे का?" असें विचारून यजमानीणबाईला सतावून सोडतात. ठरलेल्या वेळेच्या आधीच सर्व कामें आवरून आणि कपडे बदलून दरवाजाकडे लक्ष ठेवणाऱ्या गृहिणी फारच थोड्या. अशांना पाहुण्यांचें स्वागतहि मना-पासून आणि उत्साहपूर्वक करतां येतें व प्रारंभच चांगला झाल्याने पुढील कार्यक्रम यशस्वी होऊं शकतो.

मुलांची लुडबुड कशी थांबवावयाची, ह्याकडे गृहिणीने विशेष लक्ष पुरवावयाला हवें. त्यांचें कौतुक करण्याची ही वेळ नसते. शेंबडीं मुलें आईबापांना कितीहि प्रिय असलीं आणि त्यांचा दंगा व गोंधळ त्यांना कितीहि आवडत असला, तरी निमंत्रितांवर तो लादण्याचें कारण नाहीं. मुलांना अगोदर पोटभर खाऊं घालून त्यांची भूक शिल्लक ठेवूं नये. मुलांच्याजोगीं कांही कामें त्यांना सांगून त्यांना जरूर गुंतवून ठेवावें. त्यांना पाहुण्यांच्या पायाशीं लुडबुडूं दिल्याने पाहुण्यांची करमणूक होतेच असें नाही. पुष्कळ वेळा त्याच्या उलटच घडत असतें. पाहुण्यांच्या चांगुलपणाला ताण तरी किती द्यावयाचा? लहान मुलें प्रसन्न वातावरण निर्माण करतात हें खरें आहे; पण ही त्यांची नैसर्गिक देणगी आई-बापांच्या दुर्लक्षामुळे नाहीशी होऊं देतां कामा नये.

कार्यक्रमाला कोणाकोणाला निमंत्रण केलेलें आहे, ह्याची निमंत्रितांना आगाऊ कल्पना देणें इष्ट असतें. एकत्र येणारी सर्व मंडळी एकमेकांना प्रिय असली, म्हणजे ठीक. त्यांपैकी कांहींचा एकमेकांशीं अबोला असला तर मोठा कठीण प्रसंग निर्माण होतो. शेकडो लोक पानसुपारीला बोलावले असले; तर त्यावेळीं निमंत्रितांत एकमेकांचे शत्रूहि खपूं

शकतात. पण बोलाविलेल्या लहान गटांतील लोक एकमेकाशीं मिळून मिसळून वागणारे नसले तर कार्यक्रमाचा विचका होतो. म्हणून, निमंत्रण करतांनाच कोणाकोणाला बोलावलें आहे ह्याची प्रत्येक निमंत्रिताला कल्पना दिली म्हणजे त्यांपैकी ज्यांना येणें गैरसोईचें वाटेल, ते तसें स्पष्ट सांगूं शकतील.

कार्यक्रम काय आहे व किती वेळ चालणार आहे ह्याची निमंत्रितांना स्थूल कल्पना आगाऊच द्यावी. कारण, पुंष्कळ वेळा नुसता चहा, चिवडा असेल अशा कल्पनेने गेलेल्यांना पोटभर आग्रहाने खाऊं घातलें जातें, तर कधीकधी घरीं येऊन जेवावें लागणार नाही अशी अपेक्षा बाळगणारांना परत येतांना वाटेंत हॉटेलांत शिरावें लागतें किंवा घरीं आल्यावर पिठलें-भात करावें लागतें. कार्यक्रम किती वेळ चालेल हें आधी माहीत असलें म्हणजे त्याप्रमाणे घरची व परत जाण्याच्या वाहनाची व्यवस्था करतां येते. कार्यक्रम भलताच लांबला, तर योग्य वेळीं उठून जाणारा माणूसघाणा ठरतो. वास्तविक असें घडूं न देणें, हें यजमान–गृहिणी ह्यांचें कर्तव्य आहे.

चार माणसें एके ठिकाणीं जमलीं म्हणजे कांही वेळ अगदी मजेंत चर्चा चालते. पण एकाएकी सर्वजण स्तब्ध होतात आणि ही शांतता दूर करण्यासाठी काय बोलावें, हें कुणालाच सुचत नाही, असें कधीकधी घडतें. त्याचप्रमाणे, बोलण्याचा ओघ कसा वाहवत जाईल हें कांही सांगतां येत नाही. त्यामुळे बोलण्यास अनिष्ट वळण लागतें आणि वातावरण बिघडून कार्यक्रमाचा हेतु साध्य होत नाही. यजमान आणि गृहिणी ह्यांनी अशा वेळीं बोलण्याच्या ओघाला योग्य वळण लावण्याचा प्रयत्न केला पाहिजे व बहुसंख्य पाहुण्यांना ज्या प्रश्नांवर बोलायला आवडेल, असे कांही प्रश्न तयार ठेवले पाहिजेत.

निमंत्रिताने वेळेवर गेलें पाहिजे. वेळेच्या आधी ते गेले तर यजमानाची फारच गैरसोय होते. जेथे वेळेवर सुद्धा त्याचें सर्व

कांही तयार नसतें, तेथे वेळेच्या आधी पाहुण्यांनी जाणें फारच अडचणीचे होतें. उशीरा जाणेंहि चुकीचें आहे. जमलेल्या मंडळींपैकी कांही आपल्या ओळखीची नसतील तर त्यांना स्वतःची ओळख करून देऊन त्यांच्याशीं आपण होऊन बोलणें सुरू करण्यास हरकत नाही. शक्य तेवढें दुसऱ्याला बोलूं द्यावें, त्याचें बोलणें लक्षपूर्वक ऐकावें व प्रश्न विचारून त्याला प्रोत्साहन द्यावें. लोक एकत्र जमले म्हणजे पत्ते किंवा दुसरा एखादा खेळ काढण्यांत येतो. मधेंमधें बोलून कोणीच खेळ बिघडवूं नये.

कित्येक वेळा कांही निमंत्रितांना लवकर परत जाणें आवश्यक असतें. त्यांनी अशा वेळीं यजमानाला किंवा गृहिणीला आपली अडचण आरंभींच थोडक्यांत सांगावी आणि हळूच, गाजावाजा न करतां, पाय काढावा. बाकीचे सगळे गेले तरी लांबण लावून घुटमळण्याची चूक करणारे कांही आढळतात. अगदी जवळच्या मित्रांनी आवरण्याला मदत करण्यासाठी थांबणें अर्थातच योग्य होईल.

प्रसंग ओळखून प्रत्येकाने वागलें पाहिजे. जमलेल्या मंडळीपैकी महत्त्वाचा मनुष्यच जर फार दीर्घ काळ थांबला तर इतरांना उठण्याला संकोच वाटतो. म्हणून, मुख्य पाहुण्याने योग्य वेळ होतांच निरोप घेऊन उठावें व बाकीच्यांना निघण्याचा मार्ग मोकळा करून द्यावा. परत जातांना यजमानाचे व गृहिणीचे मनःपूर्वक आभार मानावे व "वेळ कसा लवकर निघून गेला, इथून कांही पाय निघत नाही" असें म्हणून पुढच्या पार्टीच्या निमंत्रणाची पूर्वतयारी करून ठेवावी.

— ज्ञानेश्वर

● ● ●

आनंद वृद्धिंगत करण्यासाठी रूढ कल्पना परिस्थितीप्रमाणे बदलून घेतल्या पाहिजेत. दिवाळीनंतर पहिलीं, खरीपाचीं पिकें निघून गेलेलीं असतात व रब्बीचा पेरा होऊन पाऊसहि पडून गेलेला असतो. थंडीला नुकताच प्रारंभ झालेला असतो. हवा अतिशय सुखदायक असते. उन्हाचा, धुळीचा त्रास नाही; पावसाची भीति नाही. म्हणजे, सर्वच दृष्टींनी निसर्गाची अनुकूलता असते. अशा वेळीं आपण सहली काढून, शरिराने व मनाने अधिक तरुण होऊं या !

दिसावयास साध्या अशा गोष्टींतून आनंद प्राप्त करून घेण्याची कला सहलींमुळे साध्य होते. झुळझुळ वाहणारा ओढा, त्यांतील वाळूंत रुतणारीं पावलें, झाडांची दाट छाया, वाऱ्याची झुळूक, पक्षांचीं घरटीं, हिरवळ, आजूबाजूला दिसणारे वेगवेगळे प्राणी, रानफुलें, इत्यादींमुळे मनुष्यमात्राला कितीतरी नवा आनंद मिळूं शकतो. नैसर्गिक वातावरणांत संकोच नाहीसा होतो; लहान-मोठा, श्रेष्ठ-कनिष्ठ, हा भेद मुळीच उरत नाही. निसर्ग सर्वांना सारखाच लेखतो. चार लोकांशीं जमवून घेण्याची हातोटी असली म्हणजे तर सहलीचा वेळ कसा निघून जातो, हें लक्षांतहि येत नाही. त्याचा प्रत्यक्ष अनुभवच घेतला पाहिजे.

सहलीची पूर्वतयारी, प्रत्यक्ष सहल आणि सहलीनंतर सहलीच्या वेळीं झालेल्या गंमतींची आठवण व त्यांविषयीच्या गप्पा, ह्यांमुळे एखादी सहलसुद्धा दीर्घ काळ आपलें मन रमवीत राहते.

सहलीची आखणी अशी करण्यांत आली पाहिजे, की प्रत्येकाला तिच्यांत भाग घेतां यावा आणि मुखदुर्बळांनाहि वाचा फुटावी; वेळेचें भान राहूं नये आणि मन हरपून जावें. ह्या दृष्टीनें कांही सूचना येथे केल्या आहेत. व्यक्ति व परिस्थितीप्रमाणे त्यांत बदल होईल, हें उघड आहे.

सहलीला जाण्याचें ठिकाण जवळचें असावें. तेथे सर्वांना जाणें-येणें सोपें व्हावें, पाण्याची सोय असावी, छाया भरपूर असावी, इत्यादि दृष्टींनी सहलीची जागा निवडावी. ही जागा प्रथम नीट बघून घ्यावी; पूर्वीच्या आठवणीवर विसंबून राहूं नये. म्हणजे जाण्याचा सोइस्कर मार्ग व वेळा, त्याचप्रमाणे तेथे गेल्यावर कोठे बसावयाचें, सैपाक व चहा कोठे करावयाचा, हें आधी ठरवितां येईल व आयत्या वेळीं गोंधळ होण्याचा संभवच उरणार नाही.

सहलीला जाणाऱ्या मंडळींत घरांतील सर्व स्त्रिया, पुरुष व मुलें ह्यांचा समावेश करावा. आपल्या मित्राचे, नातलगाचे किंवा शेजाऱ्याचे कुटुंबीयहि सहलींत सामील करून घ्यावे. सहलीला जाणारांची संख्या फार मोठी मात्र असूं नये. ही सुमारें १०–१५ मंडळी इतकी असावी.

आपण सहलीला जात आहों, तें खाण्यापिण्याच्या चैनीसाठी नव्हे हें लक्षांत ठेवावें. तेव्हा रोजचे, घरच्या पद्धतीचे जिन्नस सहलीच्या वेळीं मिळावेत असा आग्रह उपयोगाचा नाही. सहलीच्या ठिकाणीं तयार सैपाकाचे डबे वाहून नेण्यांतच आंतील जिनसांची रुचि कमी होत जाते व परत येतांना तर सामानाची अति अडचण होते.

सहलीच्या ठिकाणीं पिठलें, भात, यांसारखे मोजके जिन्नस तयार करावयाचे, बाकीचे कांही पदार्थ बरोबर न्यावयाचे, असें ठरवावें. त्या दृष्टीने साहित्य घ्यावें.

पूर्वतयारी करतांना सर्व गरजा व अपेक्षित अडचणी ह्यांचा विचार करावा. सतरंजीच्या लांबी–रुंदीपासून पायांत बोचलेला काटा काढण्या-साठी घ्यावयाच्या सुईचें टोक किती बारीक असावें इथवर, सर्वांचा तपशीलवार खल करावा. स्टोव्ह भरून घेतला, पण काडेपेटी नाहींतर पिन राहिली, तर मोठीच अडचण व विरस होतो ! सहलीचें सर्व यश पूर्वतयारीवर अवलंबून असतें हें लक्षांत ठेवावें. कोणीं, कोणत्या जिनसा,

ठाणे. स्थळप्रत.
22461 वि:
9909 नों. दि. 30/11/50

कशा आणावयाच्या, हें निश्चित करून जबाबदारी वाटून द्यावी; त्याप्रमाणे सर्व कांही झालें आहे किंवा होत आहेना, हें आदल्या रात्रीं पाहावें.

खाद्यपेयांच्या बाबतींत जिभेपेक्षा सोयीला प्राधान्य द्यावें. सहलीच्या प्रसंगीं जिन्नस बिघडला तरी तो चवदार लागतो; धुरकटलेल्या चहाची लज्जत दीर्घ काळ विसरली जात नाही. अर्थात्, फराळ साधा असला तरी त्यांत टापटीप, सुबकपणा आवश्यक आहे. विशेष काटेकोरपणा दाखविला नाही तरी निष्काळजीपणा मात्र मुळीच उपयोगाचा नाही.

वयस्क माणसें व अगदी लहान मुलें ह्यांच्यासाठी जरुरीप्रमाणे वाहनाची व्यवस्था करावी. बाकीच्यांनी शक्यतो चालावें किंवा सायकलीचा उपयोग करावा. कित्येक म्हातारे अशा वेळीं बडबड्या तरुणांना लाजवून टाकतात, हें मोठें मनोरंजक होतें.

सहलीच्या वेळीं आनंद, सोय, सुख, ह्यांसच प्राधान्य देऊन, अनुरूप कपडे घालावेत. पुरुषांना ह्या बाबतींत जी मोकळीक असते, ती स्त्रियांनाहि मिळाली पाहिजे; इतकेंच नव्हे, तर स्त्रियांची निष्कारण भीड चेपली गेली पाहिजे; म्हणून स्त्रियांना सहलीसाठी योग्य असा वेष करण्यास प्रोत्साहन दिलें पाहिजे. तरुणींनी ह्या बाबतींत जरूर पुढाकार घ्यावा.

लहान मुलांकडे विशेष लक्ष द्यावें. मोठ्यांच्या खेळांत व कार्यक्रमांत त्यांना गोडी वाटणार नाही. पण मोठ्यांना मात्र लहान मुलांच्या कार्यक्रमांत निश्चित गोडी वाटेल. म्हणूनहि लहान मुलांच्यासाठी कांही खेळ बरोबर घ्यावे व त्यांच्या कार्यक्रमास पुरेसा वेळ द्यावा.

आपल्याशीं समरस होऊं शकतील अशा कांही परजातीय, परप्रांतीय किंवा परधर्मीय मंडळींचा सहलींत समावेश करतां आला तर फार उत्तम ! अशा प्रसंगीं वृद्धिंगत झालेला स्नेह पुढेहि वाढत जातो व आपण एकमेकांच्या अधिक जवळ येतों.

सहलींतील कांही वेळ चहाची तयारी, चहापान, फराळाची तयारी व प्रत्यक्ष फराळ ह्यांत जाईल. बराचसा वेळ खेळ व करमणुकीचे कार्यक्रम ह्यांसाठी शिल्लक उरला पाहिजे. करमणुकीचे कार्यक्रम आगाऊ योजून ठेवावेत आणि त्यांत आयत्या वेळच्या कार्यक्रमांची भर घालावी.

एकाने गावयाचें व बाकीच्यांनी माना डोलवावयाच्या, ह्यापेक्षा प्रत्येकाने दुसऱ्याला ऐकविण्यांतील जम्मत खूपच अधिक असते. प्रत्येकाला ठराविक वेळ द्यावा. ह्या पांच-सात मिनिटांत प्रत्येकाने इतरांचें मनोरंजन केलेंच पाहिजे ! आजीबाई एखादें जुनें गाणें म्हणून दाखवितील, शरद् त्याच्या शिकारीच्या थापा देईल, वीणाताई नक्कल करून दाखवितील, प्राध्यापक आजूबाजूच्या वनस्पतींची माहिती सांगतील, बंडू जादूचे खेळ करील, तर लता मुरकून दाखवील.

सहलीला निघाल्यावर स्त्री-पुरुष असा भेदाभेद करून कामाची वाटणी करावयाची नाही. उलट, जीं कामें स्त्रियांचीं म्हणून समजलीं जातात, तीं पुरुषांनीच, जरूर तर स्त्रियांच्या मार्गदर्शनाखाली, करावीं. कोणत्याहि कार्यक्रमाला बसतांना स्त्रिया व पुरुष ह्यांनी वेगवेगळें बसूं नये. म्हणजे पुरुषांचे व स्त्रियांचे स्वतंत्र गट पडण्यास अवसरच मिळणार नाही.

तरुण-तरुणींची अकृत्रिम वातावरणांत ओळख होण्यास अशा सहलींत चांगली संधि मिळते. म्हणून ओळखीच्या तरुण-तरुणींना अशा सहलींत जरूर घ्यावें; त्यांचें परस्पर जमलें तर सर्वांनाच नंतर मेजवानी मिळेल !

— किर्लोस्कर

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

एका शाळेच्या तपासणीसाठी इन्स्पेक्टरबाई गेल्या असतांना, त्यांनी वरच्या इयत्तेंतील कांहीं मुलींना प्रश्न विचारला, "ह्या गावांत कितीतरी बँका आहेत; त्यांचा नागरिकांना काय उपयोग होतो?" बँक हा शब्द जरी परिचयाचा असला, तरी त्या संस्थेचा व सामान्य नागरिकाचा कांहीं संबंध असतो, अशी शंकाहि कित्येकांना आली नाहीं, तर त्यांत काय नवल? बँकेंत पैसे ठेवतात, एवढें पुष्कळांना ठाऊक असतें. परंतु, किती लोकांचीं बँकेंत खातीं असतात? फारच थोड्यांचीं. मग बँकेचा उपयोग काय? आपल्या रोजच्या जीवनास बँकांची कांहीं मदत होत असते काय? ह्यासंबंधी जरा तपशीलवार विचार केला, म्हणजे लक्षांत येईल, की बँका नसतील तर आपल्याला कितीतरी सुखसोईंना मुकावें लागेल. बँकांचा फायदा त्यांच्या गिऱ्हाइकांनाच नव्हे, तर सर्वच नागरिकांना होत असतो.

आपण पुष्कळ वेळा शेजारच्या वाण्याकडे किंवा केमिस्टकडे मोड मागण्यासाठीं जातों. आपण बंदा रुपया किंवा चलनी नोट देऊन त्याची मोड घेतों. पण दुकानदाराजवळ मोड कोठून येते? तो दररोज बँकेंतून मोड आणून ठेवीत असतो. त्यामुळे त्याचे व्यवहार सौकर्यानें चालू शकतात. असें त्याने केलें नाहीं, तर भलत्या गिऱ्हाइकांना उधार माल द्यावा लागेल. बँका मोड पुरवीत असल्याकारणानें दुकानदारांचे पैशाचे व्यवहार व्यवस्थित चालून गिऱ्हाइकांचीहि सोय होते.

आपण दुकानांतून कापड वगैरे खरेदी करतों. सोनाराकडून दागिने करून घेतों. स्टेशनरीच्या दुकानांतून माल घेतों. खरेदी झाल्यानंतर आपण पैसे देतों. परंतु दुकानदाराने मात्र त्याच्या दुकानांतील मालाची किंमत अगोदरच देऊन टाकलेली असते. म्हणजे, दुकानदाराने आगाऊ

पैसे देऊन माल भरलेला असतो आणि विक्रीची रक्कम मात्र कालांतराने त्याच्या हातीं येते. ह्या मधल्या वेळांतील त्याची गरज बँक भागविते. म्हणजे, बँकेच्या मदतीमुळे दुकानदार गिऱ्हाइकांच्या अपेक्षित मागणीस योग्य असा माल आणून ठेवूं शकतो. बँकेच्या मदतीचे अभावीं, गिऱ्हाइकांची उत्कृष्ट सेवा दुकानदार करूं शकलाच नसता. पण गिऱ्हाइकांना मात्र हें कळूं शकत नाही. कांही कांही माल तर परदेशांतून आयात करावा लागतो; ह्या व्यवहारासहि बँकांचें साहाय्य असतें. म्हणून, आपल्या गावीं जगांतील कोणत्याहि ठिकाणचा माल आपणांस मिळूं शकतो.

आपलें रोजचें वर्तमानपत्र घ्या. तें काढणाराला त्यासाठी छापखाना लागतो, कागद घेऊन ठेवावा लागतो. म्हणजे दररोज सकाळीं वर्तमानपत्राची किरकोळ विक्री करून एकएक आणा जमविण्यापूर्वीच त्याच्या खर्चाची व्यवस्था झालेली असते. वर्तमानपत्राच्या छापखान्याची यंत्रसामुग्री घेण्यासाठी बँक कर्ज देऊं शकते. त्याचप्रमाणे कागदाचा साठा करून ठेवण्यासाठी बँक पैसे देते. त्यांतून वापरासाठी कागद पाहिजे त्याप्रमाणे छापखानदार घेऊं शकतो; त्या प्रमाणांत बँकेचे पैसे भरून तो कागद फक्त सोडवून घ्यावयाचा, म्हणजे झालें.

कित्येक पगारदार लोकांचा पगार निश्चित असला, तरी त्यांत अनपेक्षित खर्चास वाव नसतो. शस्त्रक्रिया, बाळंतपण, लग्नकार्य, इत्यादीसाठी एकदम मोठी रक्कम लागते आणि ती एखाद्या महिन्याच्या पगारांतून भागविता येणें अशक्यच असतें. बँका अशा वेळीं मदत करूं शकतात आणि पगारदार नोकर त्या कर्जाची फेड पुढे सोइस्कर हप्त्यांनी करूं शकतात. अशी सोय नसती, तर मध्यम वर्गातील कितीतरी कुटुंबांचे हाल झाले असते. बँकांच्या सेवेची ही उपयुक्तता पुष्कळांच्या परिचयाची आहे.

आपल्या गावांत गिरण्या व कारखाने आहेत. त्यांत काम करून कितीतरी लोकांचें पोट भरत असतें. ह्या गिरण्या व कारखाने चालू राखण्यासाठी त्यांच्या पाठीशीं बँका उभ्या असाव्या लागतात. सूत मागवून तें गुदामांत ठेवावयाचें, तर मोठी रक्कम अडकून पडते. बँका त्यासाठी कर्ज देतात व गिरण्यांवरील आर्थिक ताण कमी करतात. गिरणीचा माल तयार होऊन त्याची विक्री होईपर्यंतच्या मधल्या काळांत गिरणीस बँका मदत करून त्यांना खेळतें भांडवल पुरवितात. साखर किंवा गूळ ह्या बाबतींतहि असेंच घडतें. म्हणजे, जीवनोपयोगी जिनसांच्या उत्पादनासाठी, ते गिऱ्हाइकांना उपलब्ध होण्यासाठी, त्याचप्रमाणे लोकांना रोजगार मिळण्यासाठी बँकांचें सतत साहाय्य होत असतें.

आज आपल्याला वीज स्वस्त मिळूं शकते. परंतु खोपोली येथे विजेचा कारखाना उभारणें, लोणावळयाजवळ पाण्याच्या साठ्यासाठीं धरणें बांधणें, खोपोलीहून मुंबई-पुणें येथे वीज वाहून नेण्याची व्यवस्था करणें, तेथून तिचें घरोघर वाटप करणें, ह्या सर्वांच्या पूर्वतयारीस कोट्यवधि रुपये लागले. आपण वीज वापरल्यावर महिनाअखेर त्याचे तीन-चार रुपये बिल देणार. पण ती वीज प्रत्यक्ष उपलब्ध होण्यापूर्वीच्या साहसी उपक्रमास बँकांचें पाठबळ नसतें, तर आज विजेचा दिवा व पंखा आपणांस मिळूंच शकला नसता; ट्रामगार्डीहि दिसली नसती आणि रेडिओहि इतक्या सोईने ऐकावयास मिळाला नसता. गावोगावच्या विजेला बँकांचा असाच आधार असतो.

आता पुष्कळांनी सहकारी हौसिंग सोसायट्यांचे द्वारा घरें बांधलीं आहेत. कित्येकांनी मोठ्या सहकारी इमारतींत पैसे भरून ब्लॉक घेतले आहेत. ज्यांना स्वतःच्या मालकीचें बिऱ्हाड मिळण्याची कधीहि आशा नव्हती, असे लोक आता घरमालक किंवा ब्लॉकमालक बनले आहेत.

पंधरा हजार रुपयांच्या घराच्या किंमतीपैकी आज दोन–तीन हजार रुपये द्यावयाचे, बाकीची रक्कम दरमहा हप्त्याने द्यावयाची व मालकीहक्क मिळवावयाचा, अशी ही योजना असते. पण कंत्राटदाराची रक्कम घर बांधतां क्षणींच द्यावी लागते. बँका पुढे येऊन, तो खर्च भागवितात आणि सोसायटीच्या सभासदास सोइस्कर व्याजाने व हप्त्याने घर मिळूं शकतें. बँकांची ही मदत आहे, म्हणून आज कितीतरी मिळवते पुरुष सहकुटुंब राहूं शकत आहेत. सामाजिक स्वास्थ्यास बँकांचें होणारें हें साहाय्य केवळ पैशाने मोजून भागणार नाही.

पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशनने कांही वर्षांपूर्वी सुमारे ४५ लक्ष रुपयांचीं कर्जें उभारलीं. शहरांतील रस्त्यांची शास्त्रशुद्ध सुधारणा, संभाजी पूल रुंद करणें, मुठा नदीचें पात्र सुधारून आरोग्याच्या सुखसोयी वाढविणें, नवीन मार्केटस् बांधणें, पाणीपुरवठ्याची योजना सुधारणें, कॉर्पोरेशनच्या मालकीच्या बस्–सर्व्हिसचा प्राथमिक खर्च करणें, इत्यादि मोठ्या व भांडवली खर्चाच्या योजनेसाठी हीं कर्जें काढण्यांत आलीं. "हीं कर्जें लोकांनी दिलीं नाहीत, तर आम्ही देऊं" अशी अंडरराइटिंगची हमी पुण्यांतील अग्रेसर बँकांनी दिली होती. त्यामुळे, जनतेसहि विश्वास वाटून कॉर्पोरेशनला कर्जें अल्प व्याजाने मिळूं शकलीं. जंगली महाराज रोडने बसमधून संभाजी पार्कमध्ये फिरावयास जाणाऱ्या नागरिकांच्या सौख्यास बँकांनी महत्त्वाचा हातभार लावलेला आहे. संभाजी पुलावरील वहातुकीची गर्दी कमी झाली, त्याच्या पाठीशींहि बँका आहेतच. सोमवार पेठेंतील पोहण्याचा तलाव बँकांच्या अप्रत्यक्ष साहाय्यामुळेच झाला. शहरवासीयांच्या सुखांत व सोयींत अशा रीतीने लोकांना न कळत बँकांनी भर घातलेली आहे. पुणें शहरांतील लोकांच्या परिचयाची ही गोष्ट असल्याने तिचा जरा विस्ताराने उल्लेख केला आहे; इतर कित्येक शहरांसंबंधींहि असेंच सांगतां येईल. अशाच तऱ्हेची मदत कित्येक बँका ठिकठिकाणीं, वारंवार, सतत करीत असतात.

युद्धकाळांत जीवित धोक्याचें झालें होतें, तेव्हा बँकेच्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टमध्ये मौल्यवान् जिनसा व कागद्पत्र नेऊन ठेवण्याच्या सोईचें महत्त्व बऱ्याच लोकांना तात्काळ पटलें. आता, घरीं दागदागिने न बाळगतां ते बँकेंत नेऊन ठेवणें कित्येकांना नित्याचें होऊन बसलें आहे. उन्हाळ्यांत गच्चीवर किंवा अंगणांत निजले किंवा कुलूप लावून सिनेमा–नाटकाला गेले, तरी दागिने चोरीस जाण्याच्या भीतीचें निवारण सहज होऊं शकते. अगदी किरकोळ मोबदल्यांत बँका रक्षणाचें हें काम करतात. जरूर लागेल, तेव्हा सेफ डिपॉझिट व्हॉल्टमध्ये जाऊन पांच मिनिटांत आपण हवे ते जिन्नस आणूं शकतों व काम झाल्यावर ते परत नेऊन ठेवूं शकतो. ह्या सोईमुळे कितीतरी स्वास्थ्य लाभूं शकतें. दागिन्याप्रमाणे विमा पॉलिसी, रोखे, इत्यादि कागदपत्रांचें जतनहि असें करतां येतें. मोठाल्या ट्रंकाहि सील लावून तेथे ठेवतां येतात.

कित्येक लोक आपले पैसे विशिष्ट हेतूसाठी रोख्यांत किंवा ठेवींत गुंतवितात. पण हे लोक आपली इच्छा नीट साध्य व्हावी, अशी योजना मात्र करून ठेवीत नाहीत आणि त्यामुळें भलत्याच्या हातीं पैसे जातात, ते खर्चून जातात किंवा बुडतात. विश्वस्त म्हणून बँकांची जी उपयुक्तता आहे, त्याची माहिती अद्याप फार लोकांना झालेली नाही. पैशाचा विनियोग कसा करावयाचा आहे, तें ठरवून टाकून पुढील व्यवस्था बँकेकडे सोपविली तर सर्व गोष्टी सचोटीने वक्तशीर व सूत्रवत् होऊं शकतात.

बँकांची उपयुक्तता समाजाच्या परिस्थितीवर अवलंबून राहते. पुढारलेल्या देशांतील बँकांची सेवाहि अधिक विविध प्रकारची असते, आणि आपल्याला कल्पनाहि येणार नाही, अशा गोष्टी तेथील बँका करीत असतात. उदाहरणार्थ, अमेरिकेंतील बँका आपल्या गिऱ्हाइकांना, पाऊस पडूं लागला कीं घरीं नेण्यासाठी छत्र्या पुरवितात, सिनेमाचीं

तिकिटें काढून देतात, आगगाड्यांतील जागांचें रिझर्वेशन करतात. बँकांच्या आवारांत प्रदर्शनें भरविलीं जातात.

आपल्या इकडील बँकाहि आपली उपयुक्तता वाढवीत आहेत. माथेरानसारख्या हवा खाण्याच्या ठिकाणीं जाणारांच्या सोईसाठी एक बँक मोसमापुरती तेथे शाखा उघडीत असते, हें त्याचेंच निदर्शक आहे. विजेचीं बिलें शेजारच्या बँक कचेरींत भरतां आलीं, म्हणजे वीजकंपनीच्या कचेरींत जाऊन बारींत उभें राहावें लागत नाही. पेन्शनर लोकांच्या पेन्शनची वसुली बँका करून देतात. बँकांच्या कामगिरीची सविस्तर यादी देण्याचा येथे उद्देश नाही; इतकेंच नव्हे तर कित्येक महत्त्वाच्या कार्यांचा येथे उल्लेखहि केलेला नाही. उदाहरणार्थ, शेतकऱ्यांना बँका कशा मदत करतात, तें येथे मुळीच सांगितलेलें नाही. सामान्य नागरिकांच्या जीवनास बँकांचा कसा मोठा परंतु अदृश्य आधार असतो, एवढेंच दाखवून देण्याचा हा प्रयत्न आहे. बँकिंगची संवय लोकांना जेवढी लागेल, तेवढ्या प्रमाणांत त्यांच्या कार्यांची उपयुक्तताहि वाढेल. तेव्हा, पुरुषांप्रमाणे स्त्रियांनी व मुलां-मुलींनीहि बँकांशीं व्यवहार करण्याची संवय लावून घेऊन त्यांना हातभार लावला, तर समाजाच्याहि सोईत व सौख्यांत भरच पडेल.

— भगिनी

जिन्नस रोख किंमत देऊन घेणें कित्येकांना जमत नाही. त्यामुळे उधारीचा अवलंब करणें भाग पडतें. पण, दुकानदार तरी किती जणांकडे, किती उधारी ठेवणार, ह्यालाहि मर्यादा आहे. प्रत्येक गिऱ्हाइकाची ऐपत लक्षांत घेऊनच, तो उधारीविषयी निर्णय घेतो; ठराविक रकमेपलीकडे येणें राहूं न देण्याची तो दक्षता बाळगतो.

कांही दिवसांपूर्वी, एका कापडाच्या दुकानांत खालील संवाद ऐकूं आला :

"आमच्या वाड्यांतल्या वेणूताईंनी तुमचे पैसे बुडवले; त्याचा राग आमच्यावर कां काढतां ? वेणूताईंनी दूधवाला, वाणी, कोळसेवाला, घरमालक, सर्वांनाच चकवलं. पण आम्ही इथं कायम राहणारे; तेव्हा आम्हाला तुम्हीं सवलत दिली पाहिजे."

"वेणूताईंनी माझे पैसे बुडवले, असं मी तरी कांही म्हणणार नाही. त्यांच्याकडं येणं राहिलं आहे, हें मात्र खरं आहे. कोणत्याच गिऱ्हाइकाचा हेतु, घेतलेल्या मालाचे पैसे देण्याचं टाळण्याचा कधीच नसतो. त्याला सवड होत नाही, आणि त्यामुळं अगदी जरुरीचीं देणीं आधी भागवलीं जातात आणि इतरांचीं राहतात, एवढंच."

"वेणूताईंची बाजू उगाच नका घेऊं ! सगळ्यांचा विश्वास संपादन करून आणि सगळ्यांचीं देणीं करून त्या कुठं पसार झाल्या, कुणास ठाऊक ! नवरा आफ्रिकेंत असतो म्हणतात; त्याला तरी माहीत आहे की नाही, कोण जाणे !"

"मी त्यांची बाजू घेत नाहीं आणि तुम्हीहि त्यांना दोष देऊं नका. माझे पैसे आल्याखेरीज राहायचे नाहीत."

दुकानदाराचा विश्वास खरा ठरला; त्याची माणसाची पारख चुकली नव्हती. दुर्दैवच आड आलें होतें. वेणूताईंचे यजमान आफ्रिकेंत

नोकरीला होते, आणि वेणूताई इथे मुलांच्या शिक्षणासाठी राहिल्या होत्या. कांही अनपेक्षित घडामोडींमुळे त्यांना तातडीने आफ्रिकेला जावें लागलें. कोणालाहि भेटण्यास त्यांना वेळ नव्हता आणि त्यांची मनः-स्थितीहि नीट नव्हती. आफ्रिकेला गेल्यावर एक-दीड महिन्यांतच त्यांचेवर मृत्यु ओढवला. पांच वर्षांनी त्यांचे यजमान येथे आले व त्यांनी सर्वांचीं देणीं देऊन टाकलीं. वेणूताईंनी एका लहानशा कागदावर लिहून ठेवलेल्या तपशीलाप्रमाणें, त्यांच्या यजमानांनी सर्व घेणाऱ्यांना भेटून त्यांना चकित करून सोडलें !

वेणूताईंच्या मृत्यूची कुणाला कल्पनाहि नव्हती. त्यांच्या मृत्यू-नंतरहि त्यांच्या पतीने आपण होऊन देणीं भागविण्यांत जी निष्ठा दर्शविली, ती खरोखर दुर्मीळच असणार. कापडवाल्याने गिऱ्हाइकाची अजमावलेली पत आणि शेजारणीने चालविलेली नापत, ह्यांत किती अंतर पडलें !

इतरांच्या कृत्याविषयी मत व्यक्त करतांना, आपण त्याच्या परि-स्थितीचा विचारहि करीत नाही व त्यामुळे त्याचेवर अन्याय होत असतो. त्याकारणाने, गैरसमज पसरून, त्या बिचाऱ्याची अब्रू कमी होते. कोणावरहि टीका करतांना, त्याच्या वर्तनाची पार्श्वभूमि समजावून घेतली पाहिजे. वेणूताईंचेंच उदाहरण पाहाना. त्यांचेकडे कांहीहि दोष नसतांना, त्यांच्या चारित्र्यावर केवढा मोठा ठपका आला आणि तो किती निराधार ठरला ! म्हणून, नेहमीच इतरांच्याकडे दोषैक दृष्टीने न पाहतां सहानुभूतीच्या दृष्टीनेच पाहिलेलें बरें. एखाद्याचें कामांत लक्ष नसलें किंवा तो एखादी गोष्ट करण्यास विसरला, की "आज जेवला नाहीस वाटतं ? जेवायला नाही कधी विसरायचास ?" असें कधीकधी म्हटलें जातें. खरोखरच, अशा मनुष्याला जेवण मिळालेलें नसण्याचा संभव असतो !

इतरांच्या चुका काढण्यासाठी आपण इतके टपलेले असतों, की आपला विवेक पार नाहीसा होतो. विवाहाच्या वेळीं वराचे वडील दिसले नाहीत, की त्यांना विवाह पसंत नाही असा आम्ही निष्कर्ष काढणार. ते खरोखरच हजर होते, नाही, ह्याची आम्हीं चौकशीहि नाही करणार. घरांतील एखादी वस्तु हरवली, की मोलकरणीला चोर ठरवणार; मग ती वस्तु आपणच स्वत: गबाळेपणाने हरवलेली असेना का!

मी एकदा पुणें स्टेशनावर एका नातेवाइकास उतरून घेण्यास गेलों होतों. त्याने दिलेलें सामान मीं खाली काढलें व तो डब्याच्या बाहेर येईपर्यंत सामानाजवळ उभा राहिलों. इतक्यांत, दुसऱ्या उतारूने तें सामान उचलून नेण्यासाठी हमालाला सूचना केली. "सामान आमचं आहे" असें मीं म्हणतांच त्याने माझ्याकडे मी चोर असल्याच्या मुद्रेने पाहून मला दम देण्यास प्रारंभ केला. "तुम्ही लोक नेहमीं असंच सामान पळवता" असें तो म्हणाला व आपलें सामान घेऊन जाऊं लागला. हा सर्व प्रकार आजूबाजूचे लोक पाहात होते; त्याने तर मला शरमल्यासारखें झालें. इतक्यांत माझा नातेवाईक डब्याच्या खिडकींतून ओरडला, "तें सामान आपलं नाही; आंतच आहे अजून आपलं; थांब, मी घेऊन येतों." आता, ह्या प्रकरणांत, मला त्या उतारूने शिव्या दिल्या, त्यांत त्याचें काय चुकलें? गैरसमजाचाच तो परिणाम नाहीं काय? म्हणून, बोलतांना जरा हातचें ठेवणें पुष्कळ वेळां हिताचें ठरतें.

कोणत्याहि गोष्टीबद्दल कारण नसतांना ठाम मत देणें किंवा विधान करणें आवश्यक नसतें. "नक्की, खास, नि:संशय, खात्रीने," अशा शब्दांचा वापर करण्याऐवजी "मला वाटतें, माझी अशी समजूत आहे, माझ्या आठवणीप्रमाणे," असे शब्दप्रयोग करणें योग्य असतें. म्हणजे, चुकीची दुरुस्ती करण्यास सवड सापडते, माघार घ्यावी लागत नाही, चूक गळ्यांत येत नाही. दुसरा सांगत असेल, तें चुकीचें असलें, तरी ती चूक स्पष्टपणें न दाखवतां, "माझी माहिती अपुरी असेल" असें

म्हणून किंवा "तुमचें म्हणणें बरोबर आहे, पण माझा समज जरा थोडा वेगळा झाला" असें म्हटल्याने वाद होत नाही. "तूं बोललाच नाहीस", ह्यापेक्षा "मीं ऐकलं नाही" ही वृत्तीच श्रेयस्कर होय.

जेथे अगदीच जरूर असेल, तेथे आपलें म्हणणें जोराने मांडून आपल्यासारखें केलेंच पाहिजे, हें उघड आहे. उदाहरणार्थ, एखादी सायकल कोणी पळवूं लागला आणि ती सायकल आपली असली, तर त्याबाबत 'अहो, मला वाटतं ती सायकल माझी असावी. जरा थांबतां का? मी घरींच ती आहे का, तें बघून येतों' अशा पद्धतीने बोलणें अर्थातच मूर्खपणाचें होईल.

कधीकधी, पुढच्या हिताच्या दृष्टीने, गैरसमज होऊं देणें योग्य ठरतें. सुधाबाईंच्या मुलाला नोकरी लागली, तेव्हा त्या त्याच्याकडून एकसारखे पैसे मागून घेऊं लागल्या. मुलगाहि आपल्या विधवा आईला नाखूष न करतां, शक्य तेवढे पैसे पाठवी. पैशाची त्यांची नड कधीच संपली नाही, आणि त्यामुळे त्यांच्यांत व मुलांत खटका उडण्याची पाळी आली. पुढे, मुलाची नोकरी गेली, तेव्हा सुधाबाईंनी सर्व पैशाचा हिशेब त्याला सांगितला. मुलाच्या नांवाने बँकेंत खातें होतें, त्यांत त्यांनी सर्व पैसे भरले होते! मुलापुढे त्यांनी पासबुक ठेवलें व त्याचे पैसे त्याच्या अडचणीच्या वेळीं त्याला उपलब्ध करून दिले. आपल्या अडचणींचें कारण पुढे करून, त्यांनी मुलाला न साधणारी गोष्ट, म्हणजे पैशाची बचत, घडवून आणली होती. मुलाची कांही काळ अप्रीति झाली, तरी ती त्यांनी सहन करून त्याचें खरेंखुरें हित पाहिलें. शुद्ध हेतूने राहूं दिलेले किंवा केलेले गैरसमज आणि निर्बुद्धपणें अथवा दुष्टपणे पसरविलेले गैरसमज, ह्यांत असा फरक आहे!

— ज्ञानेश्वर

• • •

## रेडिओ आणि पुस्तकें : १८

रेडिओचा प्रसार दिवसेंदिवस वाढत आहे आणि अधिकाधिक लोक रेडिओवरील संगीताप्रमाणेच भाषणें, बातम्या, इत्यादि कार्यक्रम ऐकूं लागले आहेत. ज्यांना ज्ञानग्रहणाचें दुसरें साधन उपलब्ध नाही, अशांना तर रेडिओचा उत्कृष्ट उपयोग होत आहे. खेडोपाडीं रेडिओचा प्रसार करून व तेथील लोकांसाठीं उपयुक्त असे कार्यक्रम करून जनतेच्या ज्ञानांत भर घातली जात आहे.

हें सर्व योग्यच आहे. परंतु वाचनाच्या सवयींवर रेडिओचे होणारे परिणामहि लक्षांत घेणें आवश्यक आहे. पुस्तक वाचतांना आपण जितकी एकाग्रता करतों, तेवढी एकाग्रता रेडिओच्या श्रवणास आवश्यक नसते, आणि इतर व्यवहार चालू ठेवूनहि कान तेवढे रेडिओच्या बाजूकडे आपण ठेवूं शकतों. ऐकणाराची ही प्रवृत्ति लक्षांत घेऊनच कार्यक्रमाचा दर्जा व मांडणी हीं ठरविलीं जातात.

आरामशीर बसून आपण रेडिओवर भाषणें व चर्चा ऐकूं शकतों; तेव्हा पुस्तकें वाचण्याची जरुरीच नाही, अशी वृत्ति आता फैलावत चालली आहे. त्यामुळे, जें विवेचन पुस्तकांतूनच करतां येणें शक्य आहे व जें काळजीपूर्वकच वाचलें पाहिजे, असें विवेचन लोकांपर्यंत पोचणारच नाही, अशी परिस्थिति निर्माण होऊं पाहात आहे. रेडिओमुळे नवे नवे लेखक व वक्ते तयार होत आहेत हें खरें आहे; पण त्यांच्या विवेचनाचा प्रयत्न ऐकणाऱ्याला रंजविण्याचाच अधिक असतो; त्याला संतुष्ट करण्याकडेच त्यांचा रोख असतो. पुस्तकांचे लेखक अधिक तत्त्वनिष्ठ असतात; वाचकाची मिजास संभाळण्यापेक्षा स्वतःचे विचार मांडण्याची त्यांची तळमळ अधिक असते.

रेडिओचें हें स्वरूप विचारवंतांच्या लेखनास नाउमेद करणारें ठरतां कामा नये, अशी कांहीतरी व्यवस्था झाली पाहिजे. टेलिव्हिजनचा

प्रसार झाला, म्हणजे तर अधिकच अडचण निर्माण होणार आहे. साक्षर लोक वाढले पण ‘वाचन’ करणारे मात्र कमी झाले, तर त्याचा काय उपयोग? रेडिओ ऐकला की वाचनाची गरज नाही, ही चुकीची समजूत नष्ट झाली पाहिजे; वाचनाचें शिक्षणामधील स्थान अबाधित आहे, हें विसरतां कामा नये.

ग्रेट ब्रिटनमधील नॅशनल बुक लीगच्या वार्षिक दिनानिमित्त भाषण करतांना सर विम्यम हॅले ह्यांनी करून दाखविलेल्या हिशेबाप्रमाणे, मनुष्याने ६० वर्षें सतत वाचन केलें, तर त्याचीं फार तर ९,००० पुस्तकें वाचून होतात. असे लोक अगदी विरळा आढळतील. शिवाय ह्या पुस्तकांनी सबंध वाङ्मयाचा एक कोपरासुद्धा भरणार नाही. अशा परिस्थितींत, वर्षांतून चार-पांच पुस्तकें वाचणारेहि रेडिओमुळे त्यांचें वाचन सोडून देऊं लागले, तर भलतेंच वळण लागेल. रेडिओच्या प्रसारामुळे पुस्तकांचें वाचन कमी होतां कामा नये.

— सह्याद्रि

●●●

जेवतांना दोन घास कमी खावेत, असें आपण नेहमी म्हणतों. अगदी पोटभर न जेवतां थोडें कमी जेवावें म्हणजे पोटास तडस लागत नाही; अन्न चांगलें पचतें व जेवण सुखावह होतें. पण हा साधा, हितकारक नियम बहुधा पाळला जात नाही. उलट चार घास जेवण अधिकच होतें आणि त्याचा परिणामहि काय व्हावयाचा तो होतो. अन्न हें जीवनास आवश्यक असतें व सकस अन्न तर शरिराचें पोषण चांगलें करतें. पण त्याचा अतिरेक झाला तर तें विष बनतें.

चांगल्या गोष्टीसुद्धा मर्यादेपलीकडे जाऊं देतां कामा नयेत; त्या मर्यादेच्या आंतच राखल्या पाहिजेत. एखादा उत्कृष्ट वक्ता असला व त्याचें भाषण श्रोते लक्ष लावून ऐकत असले, तरी त्याने किती वेळ बोलावें ह्याला मर्यादा असते. त्याचें भाषण लांबलें, तर श्रोते कंटाळून जातात व भाषणाचा सुपरिणाम नाहीसा होतो.

आपण दुसऱ्याकडे भेटावयास गेलों असतांना आपण किती वेळ तेथे थांबावें ह्याच्या आकलनावर सर्व कांही अवलंबून असतें. दुसऱ्याची अपेक्षा आपण ध्यानांत आणली पाहिजे व त्यापलीकडे न ताणण्याची दक्षता घेतली पाहिजे. प्रारंभीं अगदी अगत्यपूर्वक स्वागत होतें, नंतर कांही वेळ मनमोकळेपणाने बोलणें चालतें. नंतर पाहुण्यानेच बोलणें वाढवा-वयाचें; यजमानाने इकडे जांभया द्यावयाच्या किंवा बोटांनी आवाज करावयाचा, अशी पाळी येऊं नये. "आणखी बसाना" हेच शब्द आपण परत निघतेंवेळीं आपल्या कानावर आले पाहिजेत. कित्येक वेळा आपण दाराबाहेर पडतों आणि लागलीच आंतून शब्द ऐकूं येतात, "हं बाळ्या, आटप आता. उशीर झाला आहे भारी" किंवा "बरे गेले एकदाचे !" आपण फार वेळ घेतला; केव्हा उठायचं तें आपल्याला

कळलें नाही, ह्याची ही निशाणी आहे. जेवायला बोलाविले म्हणजे दुपारच्या चहाला नाही थांबायचें !

लग्नकार्यांत पाहुणे जमतात, तेव्हा माहेरवाशिणींनीच स्वगृहीं जाण्याचें लवकर योजिलें म्हणजे गर्दी कमी होण्यास मदत होते. समारंभापूर्वी कांही दिवस आधी आल्याने मदत होते, पण समारंभ संपला म्हणजे पाहुणे जास्त दिवस राहिल्याने अडचण वाटूं लागते. काम करणारांना शीण आलेला असतो; मनानें व शरिराने ते दमलेले असतात व त्यांनाच विश्रांति हवी असते. अगदी जवळचे नातेवाईक हालले, म्हणजे बाकीच्यांनाहि लवकर पाय काढावा लागतो.

खेळाच्या, व्यायामाच्या बाबतींतहि हाच नियम लागूं आहे. अगदी आडवें पडण्याची पाळी येईपर्यंत खेळणें घातुक ठरतें. एखादा सामना आपण जिंकण्याच्या बेतांत असलों तरी शरिराने धोक्याची सूचना दिली की तावडतोब खेळ बंद करावा, सामना आपण हरल्याचें जाहीर करावें, प्रतिस्पर्ध्याचें अभिनंदन करावें, पंचांचे आभार मानावे व सरळ बाहेर जाऊन विश्रांति घ्यावी. मधेमधे थांबत खेळणाऱ्याने सामना जिंकला तरी प्रेक्षकांचें समाधान होत नाही. आपण खेळाचे अलिखित नियम मोडून दुसऱ्याच्या सौजन्याचा फायदा घेणें खेळाडू वृत्तीस धरून नाही.

पत्नी पतीला कित्येक वेळा अप्रत्यक्ष रीतींने कांही सूचना करीत असते. अशा सूचनांचा अतिरेक झाला तर त्यांचा दुष्परिणाम दिसूं लागतो. पति नाखूष होतो, पत्नीच्या आग्रहीपणाचा त्याला तिटकारा येऊं लागतो व अगदी योग्य सूचनासुद्धा तो झिडकारूं लागतो. पति लक्ष देत नाही हें सिद्ध झाल्यावरहि तीच तीच गोष्ट उगाळीत बसण्याने फायदा न होता तोटाच होतो. ह्याउलट, पतींहि पत्नीला एकसारखा बोलूं लागला तर तेंहि चालत नाही. कोठे थांबावयाचें, तें दोघांनाहि समजलें पाहिजे.

कित्येक लोक नोकरांना व मोलकरणींना टाकून बोलतात; काढून टाकण्याचा धाक दाखवितात; पण प्रत्यक्ष हातून तसें घडूं शकत नाहीं. जें आपण करूं शकूं तेवढेंच बोलणें श्रेयस्कर असतें. नोकराला काढून टाकण्याची भाषा वापरणाराला तेवढी धमक हवी. एकदा मालकाचें पाणी नोकराने ओळखलें, म्हणजे मालकाने कितीहि शिव्या किंवा धमक्या दिल्या तरी त्याचा उपयोग होत नाही; कटुता मात्र वाढते.

सून सैपाक करते, तेव्हा सासू तिच्यावर उगीचच एकसारखी देखरेख करीत असते. मार्गदर्शन आणि व्यत्यय ह्यांतील फरक लक्षांत ठेवला जाणें आवश्यक आहे. कित्येक म्हातारीं माणसें जातां येतां चौकशा करीत असतात, मधेमधे बोलतात, किरकोळ गोष्टींहि अगदी त्यांच्या मनाप्रमाणे व्हाव्यात अशी अपेक्षा बाळगतात. कुठवर आपण लक्ष घातलेलें चालेल त्याची मर्यादा ओळखून तिचें अतिक्रमण सहसा न झालेलें श्रेयस्कर.

दुसऱ्याच्या चांगुलपणाचा किती फायदा घ्यावयाचा ह्यालाहि मर्यादा असते. उसनें किती वेळा आणावें, पैसे किती वेळा मागावे, दुसऱ्याच्या मोटारींतून किती वेळा जावें, ह्या सर्वांच्या बाबतींत मनोनिग्रह हवा. आपली पत संभाळण्याचा प्रश्न येथे निर्माण होतो. विवक्षित रेषा ओलांडली, की नकार मिळूं लागतो; आणि हा नकार न येऊं देण्यांत खरी हुशारी आहे.

बँकांतून कर्ज घेणारे लोक नकार नेहमी टाळीत असतात. नकाराचा होकार होणें अवघड जातें; म्हणून नकार मिळेपर्यंत आग्रह तडीस न नेणें योग्य ठरतें. होकार मिळाला नाही तरी नकार टाळावा लागतो व त्यासाठी युक्तीने माघार घ्यावी लागते. आज जमलें नाही तर उद्या कदाचित् जमतें, असा अनुभव सांगतो.

कुठे थांबायचें हें कळण्याचे, न कळण्याचे प्रसंग पदोपदीं येतात. सिगारेटचे आणखी दोन झुरके मारण्याच्या प्रयत्नांत बोटांना चटका

बसतो. खोबरें शेवटपर्यंत किसण्याच्या प्रयत्नांत बोटेंहि किसलीं जातात. चहा गाळतांना अगदी शेवटचा थेंबसुद्धा मिळविण्याच्या खटपटींत चहाची पत्तीच खाली पडते किंवा किटलीचें झाकण पडून फुटण्याचा संभव असतो. कपडा अगदी फाटेपर्यंत वापरण्याचा मोह केव्हा व कुठे दगा देईल हें सांगतां येत नाही. सिनेमा पाहतांना थोडी कुजबूज केलेली खपून जाते; पण मोठ्यांदा बोलूं लागल्याने इतरांची 'शुक् शुक्' ऐकण्याची पाळी येते.

वय क्षणाक्षणाला वाढत जातें आणि मनुष्य दररोज थोडथोडा वयस्क होत जातो. कांही वयापर्यंत त्याचा उत्साह व शक्ति वाढत जातात; पुढे हळूहळू तीं उताराला लागतात. पण, ही गोष्ट लक्षांत राहात नाही आणि संवयी बदलत नाहीत. मनुष्य पूर्वीइतकेंच खात राहतो आणि मेहेनत करतो; मग अन्नपचनाबद्दल आणि दमल्याबद्दल तक्रार सुरू होते. ठराविक वयानंतर आपल्या संवयी त्या त्या परिस्थितीशीं जुळत्या करून घेतल्या पाहिजेत. काल मी पांच मैल सायकलीवर गेलों, म्हणून आजहि जाऊं शकेन असें नाही. केव्हा थांबावें लागेल ह्याचा अभ्यास करून त्याप्रमाणे वागलें पाहिजे; तरुण-पणच्या पराक्रमांचा म्हातारपणीं आठवण म्हणून उपयोग झाला, तरी झिजलेल्या शरिराला त्यावेळची बरोबरी करतां येणार नाही.

काल पन्नास बोरें खाऊनहि मला खोकला आला नाही; पण आज चाळीस बोरें खाऊनहि खोकला आला अशी चंदूने केलेली तक्रार येथे उद्बोधक होईल. काल पन्नास बोरें खाल्लीं, म्हणूनच खोकला येण्याला आज चाळीस बोरें पुरलीं, हें लक्षांत यावयास पाहिजे. भरल्या गाडीला सुपाचें सुद्धा ओझें होतें आणि तेवढ्या शेवटच्या वजनाने बैलाची कंबर मोडते, हा नित्याचा अनुभव आहे. सायकलीवरून किती ओझें वहाव-याचें, हमालाच्या डोक्यावर किती बोजकीं द्यावयाचीं, जाग्रणें किती करावयाचीं, ह्या सर्वांना हा नियम लागूं आहे. बसमध्ये किती माणसें

बसावयाचीं हें ठरविलेलें असतें; त्यापेक्षा पांच जास्त लोक घेण्यास हरकत नसते; पण नेहमीच अवास्तव ओझें झालें, तर बसचें आयुष्य कमी होईल हें उघड आहे. आज चालून जातें, म्हणून तें नेहमीच चालणार नाही. सुरक्षिततेची मर्यादा पाळलीच पाहिजे.

पैशाची गरज कधीच संपत नाही आणि कितीहि पैसा मिळविला तरी तो पुरा पडत नाही. म्हणून पैसा मिळवीत राहणें अपरिहार्यच होतें. पण किती मर्यादेपलीकडे जावयाचें नाही, हें काळजीपूर्वक ठरविलें नाही, तर अहितच साधलें जातें. काम झेपत नसतांनाहि, कुटुंबपोषणा-साठी एखाद्याने ताकदीबाहेर सतत काम केलें, तर तो काम करण्यास अजिबात असमर्थ होतो किंवा त्याला मृत्यूहि येतो; आणि मग कुटुंबाचा आधार सर्वस्वी नाहीसा होतो, अशीं कित्येक उदाहरणें आढळतील. अर्थात्, अतिशयच चांगल्या हेतूने केलेल्या परिश्रमांचा हा विपरित परिणाम झालेला असतो. पण त्यांत कुटुंबाचें खरें हित साधलेलें नसतें. म्हणून एकाच माणसाने किती ठिकाणीं नोकरी करावी, किती शिकवण्या कराव्या, किती जादा तास काम करावें, एक-दोन आणे वाचविण्यासाठी शरिराचे किती हाल करावे, हें सर्व विचारपूर्वक ठरविलें गेलें पाहिजे.

अपत्यांच्या संख्येच्या बाबतींतहि थांबतां थांबतां गाडीं फार पुढे जाते, असे कित्येक कुटुंबांतून घडलेलें आढळतें. निसर्गाच्या आहारीं किती जावयाचें व लगाम केव्हा घालावयाचा, हें ज्याने त्याने योग्य वेळीं ठरविलें पाहिजे. प्रत्येक दांपत्याच्या प्रकृतीचा व आर्थिक परिस्थितीचा हा प्रश्न आहे. सर्वांनाच मुलगा हवा असतो. पण ओळीने मुलीच होत गेल्या तर मुलाची वाट किती मुली होईपर्यंत पाहावयाची, हा एक प्रश्नच असतो. त्याचा नीट विचार होणें अवघड जातें आणि पुत्रप्राप्तीसाठीं वाट पाहात असतांना कितीतरी कन्यांची भर पडत जाते. शर्यतीला गेलेले विवेकी लोक, घोड्यावर किती पैसे लावावयाचें हें निघतांनाच

ठरवून जातात. ठराविक पैसे लावून झाले, की ते प्रेक्षकाची भूमिका पत्करतात किंवा घरीं परततात; बहुधा ते एकाच शर्यतींत सर्व पैसे घालवीत नाहीत; कांही शर्यतींना टाळा देऊन नियोजनपद्धति अमलांत आणतात.

लहान मुलाचे किती पापे घ्यायचे, ह्याला सुद्धा मर्यादा आहे! जास्त पापे घेतले तर मूल नाखूष होतें. त्याच्याशीं खेळतांना त्याला किती चिडवावयाचें, हेंहि कळलें पाहिजे. नाहीतर तें रडकुंडीला येतें. पत्नीच्या मागे मागे किती हिंडायचें आणि पतीच्या गळ्यांत किती पडायचें, ह्याचाहि विवेक राहायला हवा. प्रेमी पति-पत्नींना सुद्धा ठराविक मर्यादेनंतर गंमत वाटेनाशी होते, आणि एकमेकांपासून थोडें दूर राहण्यांत कांही काळ आनंद वाटतो. अतिशय लगट केली, तर तिची गोडी कमी कमी होत जाते. "तरुण पति-पत्नी इतका वेळ सान्निध्यांत काढतात, की त्याची चवच उरत नाही. पूर्वीच्या स्त्रियांना कमी वेळा अशी संधि मिळे, पण त्यामुळे तिची गोडी विशेष होती." असें एक सासूबाई नेहमी म्हणत असतात. पक्वान्नावर पक्वान्न खाण्यांत आलें, तर नाही का त्याच्यावरील वासना उडून जात?

मोठ्या शहरांतून, वाहतुकीचें नियंत्रण करण्यासाठी चौका-चौकांत हिरवे-तांबडे दिवे लावलेले असतात. हिरवा रंग म्हणजे 'जा' व तांबडा रंग म्हणजे 'थांबा' अशी ती निशाणी असते. तांबड्या रंगाचा दिवा लागला, की त्या रस्त्याची वहातूक थांबते. तांबड्या रंगाच्या दिव्याची प्रत्येक वेळेसच कां आवश्यकता असावी? धोक्याचा दिवा दुसऱ्यानेच दाखविला पाहिजे, असें थोडेंच आहे? सुरक्षितपणाकडे लक्ष पुरविणारे मोटारवाले चौक जवळ आला की मोटारची गति कमी करतात; वळण आलें की गाडी हळू चालवितात, इतर मोटारींना खुशाल पुढे जाऊं देतात. पण, सुरक्षितपणास जपतात; गर्दीमध्ये मोटार न घुसवितां, वाट मिळण्याची प्रतीक्षा करतात.

स्थलप्रत.
अनुक्रम ... वि: ...

दुसऱ्याच्या जांभया, हाता-पायांच्या हालचाली, चेहऱ्यावरील हावभाव, ह्यांपासून आपण असाच बोध घेऊन आटोपतें घेण्यास शिकलें पाहिजे. निसर्गाच्या ताकिदीस मानलें पाहिजे व धोक्यापासून दूर अंतरावरच थांबलें पाहिजे. म्हणजे शारीरिक व मानसिक अशा दोन्ही सुखांत कितीतरी भर पडेल. "आणखी पाहिजे" अशी मागणी असतांनाच थांबणें आपल्या हिताचें असतें. त्यांत बोज राहतो, पत राहते, प्रकृतीहि राखली जाते. अर्थात्, आपला आवेश किंवा वेग एकदम आखडतां घेणें अवघड असतें. पण एकदा त्याची आवश्यकता पटली म्हणजे त्यांतील अडचण दूर होऊं लागेल.

संवयीनें आपण आपोआप सुरक्षित अंतर सोडून थांबण्यास शिकूं. थोड्या वेळांत काम आटपतां आलें पाहिजे, व दुसऱ्याचें समाधानहि झालें पाहिजे. अशी कला आत्मसात् केली म्हणजे सर्व कांही सोपें आहे. बराच वेळ किंवा पैसा खर्च केल्यानें केवळ काम साधत नाही. त्यांचा व्यय कार्यक्षमतेने करावा लागतो आणि नेहमी थोडा हातचा ठेवावा लागतो. म्हणूनच म्हणतों की, थोडें आधी परता. थोडें आधी आटपा.

— चित्रमयजगत्

●●●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ९४४५
REFBK-0009455

SIR RAGHUNATH P. PARANJPYE POONA 4.

ता. १४-११-५३

क ण आणि क्ष ण

"कण आणि क्षण" हें पुस्तक मीं समग्र वाचलें. तें वाचून फार समाधान वाटलें, व हें पुस्तक लिहिल्याबद्दल मी तुमचें मनापासून अभिनंदन करितों. पुस्तकांत सर्वत्र अत्यंत मार्मिक निरिक्षण दिसून येतें. सकृद्दर्शनीं क्षुल्लक दिसणाऱ्या गोष्टींचें संकलन करून तुम्हीं मोठें काम केलें आहे. तुमच्या लिखाणांत नाजूक व मार्मिक विनोद क्षणोक्षणीं दिसून येत आहे. असेंच आपण पुढे लिहाल, अशी आशा बाळगितों.

---

ता. ९-१०-५७

पु ढे पा ऊ ल

"पुढे पाऊल" ह्याहि पुस्तकांत पहिल्याप्रमाणेच संसारांतील घरगुती गोष्टीविषयक मनोरंजक आणि सुबोध चर्चा केलेली आहे. हेंहि विवेचन नेहमीच्या व्यवहारांतील विषयांवर असून, पुस्तक अत्यंत उपयोगी आहे. त्यांतील निबंधात्मक लेख लोकांना आवडतील, ह्यांत शंका नाहीं.